न. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. १७६८



# केशवसुत दृष्टिकोन

REFBK-0016624

प्रा. मु. गो. देशपांडे

## प्रा. देशपांडे यांची इतर पुस्तके

### (१) पाश्चात्य प्रतिभा – होमर ते हेमिंग्वे

मान्यवर विद्वानांनी वाखाणलेले, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना अत्यंत उपयुक्त ठरलेले मराठीतील अद्वितीय पुस्तक. शंभराहून अधिक प्रतिभावंतांच्या कार्याचा व्यासंगपूर्ण व रसीला परिचय.

### (२) प्रो. विजापूरकर यांचे लेख

मराठी ग्रंथ संभारात विष्णु गोविंद विजापूरकर यांच्या शैक्षणिक, राजकीय, सामाजिक व वाङमयीन विषयावरील महत्त्वाच्या लेखांची ग्रंथरूपाने प्रथमच भर घालण्याची महत्त्वाची कामगिरी, लेखकाने परिश्रमपूर्वक केलेल्या संपादनाने आणि विजापूरकरांनी ना. गोखले यांना लिहिलेली काही अत्यंत महत्त्वाची पत्रे परिशिष्टांत देऊन, उत्तम रीतीने बजावलेली आहे. सत्यकथेपासून नागपूरच्या तरुण–भारतपर्यंत सर्व नियतकालिकांनी गौरविलेले पुस्तक.

## (३) माझे विद्यार्थी-जीवन

इतिहासाचार्य राजवाडे यांच्या शिक्षणविषयक आत्म-कथनाचे दुर्मिळ पुनर्मुद्रण. अमेरिकेतील जगप्रसिद्ध लायब्ररी ऑफ दि काँग्रेस या लायब्ररीने मुद्दाम या पुस्तकाच्या अनेक प्रती आपल्या संशोधन विभागासाठी ठेवल्या आहेत हे सांगितले म्हणजे लेखकाने हे संपादन किती कसोशीने केले आहे ते आपोआपच समजते. "परिश्रम आणि मार्मिक अभ्यास यांचे विलोभनीय दर्शन घडविणारे संपादकांचे ५६ पानी विस्तृत प्रास्ताविक ........." केसरी ता. २१-१२-६६

## (४) इंग्रजी कसे शिकवावे?

(कै. रियासतकार सरदेसाई यांनीं ऑक्सफर्डमध्यें सुमारे सत्तर वर्षापूर्वी आत्मसात केलेल्या परकीय भाषा शिकविण्याच्या नव्या पद्धतीची ओळख करून देणाऱ्या निबंधाचे साक्षेपी संपादन)

## ५) स्त्रियांशी हितगुज

महात्मा गांधींच्या स्त्रीजीवनविषयक इंग्रजी लेखांचा व भाषणांचा अनुवाद; स्वतंत्र विवेचनात्मक प्रस्तावना (शिल्लक नाही.)

मराठा ... ग्रंथसंग्रहालय, ठाणे.

**सूचना** :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

26 FEB 1977

6 FEB 1977

[क्र. मा. प.]

# केशवसुत

## काही दृष्टिकोन

लेखक

मु. गो. देशपांडे

प्रस्तावना

कविवर्य कुसुमाग्रज

महाराष्ट्र ग्रंथ भांडार कोल्हापूर

REFBK-0016624

प्रकाशक :
गोविंद वामन कुलकर्णी,
महाराष्ट्र ग्रंथ भांडार,
महाद्वार रस्ता, कोल्हापूर–२

© मुरलीधर गोपाळ देशपांडे
प्रथमावृत्ती : २२–१०–६८
दीपावली शके १८९०
**किंमत पाच रुपये**

मुद्रक :
गोविंद वामन कुलकर्णी,
सेवा मुद्रणालय, १६७ बी,
विद्यापीठ रस्ता, कोल्हापूर

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ग्रंथालय
अनुक्रम ७०१९७ वि: निबंध
क्रमांक १७६८ नों. दि. 24-5-६८

आचार्य शं. द. जावडेकर

व

सौ. कुसुमावती देशपांडे

या दोन श्रेष्ठ

केशवसुत समीक्षकांच्या

स्मृतींस

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम.......................... दि: ..........................
..................................... नों: दि: ..........................

# अनुक्रम


प्रस्तावना : कविवर्य कुसुमाग्रज ७

निवेदन ११

## विभाग १ ला

समकालीन कवीवरील प्रभाव १

बाळकृष्ण अनंत भिडयांना दिसलेले केवशसुत २१

केशवसुतांचे व्यक्तिमत्त्व ३१

केशवसुतांच्या कवित्वाची काही वैशिष्ट्ये ३९

केशवसुतांच्या तीन कविता ५२

## विभाग २ रा

गेल्या साठ वर्षांतील केशवसुतविषयक
टीका लेखन (१९०६ ते १९६६)

१) 'यांची कविता बरी आहे' ७६

२) केशवसुत समीक्षेचे पहिले पर्व १९१७-२६ ७९

३) केशवसुत समीक्षेची पुढची पर्वे
१९२६ ते १९४१ ९०

१९४२ ते १९५६ १०३

१९५६ ते १९६६ ११४

# प्रस्तावना

केशवसुतांसंबंधीचे हे आणखी एक पुस्तक. आपल्या हयातीत आणि नंतरही कित्येक वर्षं, समीक्षकांच्या दिवाण-ई-खास मध्ये दुर्लक्षित असलेल्या केशवसुतांच्या काव्यावर पुढील काळात बरेच अनुकूल-प्रतिकूल लेखन झाले आहे. जन्मशताब्दीच्या उत्सवामुळे केशवसुतांच्या अभ्यासाला आणखी बरीच चालना मिळाली. हे पुस्तकही जन्मशताब्दीच्या वर्षात निदान त्याच्या अस्तप्रकाशात बाहेर पडावे अशी इच्छा होती. बऱ्याच वेगळ्या स्वरूपात. परंतु काही अनिवार्य कारणामुळे वेळही साधता आली नाही आणि पुस्तकाची मूळ योजनाही बदलावी लागली.

प्रा. मु. गो. देशपांडे हे साहित्याचे एक व्यासंगशील आणि रसज्ञ अभ्यासक आहेत. आजूबाजूला फारसे न पाहणारे, आपल्याच विचारांच्या तंद्रीत राहणारे, एखादे 'वेगळेच' काम हातात घेऊन त्यात संपूर्णतः बुडून जाणारे. एकदा प्रो. विजापूरकरांवर त्यांचे प्रेम

जडले. समर्थ विद्यालयाच्या संस्थापकांचे विविध विषयांवरील प्रातिनिधिक लेखन ग्रंथरूपाने प्रकाशित व्हायला हवे असे त्यांच्या मनाने घेतले. दोन तीन वर्षे अनेक वाचनालयात जाऊन त्यांनी जुन्या मासिकपत्रांचे उत्खनन केले आणि चारशे पानांचा लेखसंग्रह उजेडात आणला. इतिहासकार सरदेसायांचाही एक विस्मृतप्राय प्रबंध या ग्रंथालयातील संशोधनात त्यांच्या हाती लागला होता. तो, मला वाटते, स्वतःच्याच खर्चाने प्रस्तावनेसह त्यांनी छापून प्रसिद्ध केला. ' पाश्चात्य प्रतिभा ' आणि ' माझे विद्यार्थी जीवन ' हे राजवाड्यांच्या शिक्षणविषयक विचारांचे पुस्तक या ग्रंथासाठीही त्यांनी बरीच शोधाशोध आणि खटपट केली. अशी अभ्यासाची आणि जुन्यातून नवे शोधण्याची सवय जडलेले प्रा. देशपांडे केशवसुतांच्या बाबतीत काही करणार नाहीत हे संभवनीय नव्हते.

या संबंधात त्यांनी जे करावयाचे ठरविले होते ते, केशवसुतांवर मनःपूर्वक प्रेम करणारा एक वाचक या नात्याने मला खूप आवडले होते. कल्पना अशी होती की, केशवसुतांच्या हयातीपासून त्यांच्यावर जेवढे समीक्षात्मक लेखन प्रकाशित झाले त्याचे काही निवड करून संकलन करावे, केशवसुत विषयक लेखांबरोबर काव्यातील परिवर्तनाचा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 60919 वि: निबंध
क्रमांक 1658 नों. दि. 27-5-68
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

विचार करणारे काही तत्कालीन लेखही त्यात असावेत; या संकलनास एक दीर्घ प्रस्तावना लिहावी ( अर्थात् त्यांनीच ) आणि केशवसुतकाव्य-विचाराचे एक समग्र चित्र, पूर्वोत्तर संदर्भासहित, वाचकांना उपलब्ध करून द्यावे. आपल्या स्वभावानुसार वर्षा-दीड वर्षाचा काळ त्यांनी या कामाला अव्यभिचारी भक्तीने वाहून दिला. अनेक ठिकाणी जाऊन, शोधाशोध करून बरेच लेख मिळविले, टिपणेटाचणे केली आणि ग्रंथाची सिद्धता केली. परंतु तेवढ्यात अशाच स्वरूपाचे दुसरे एक पुस्तक प्रसिद्ध होऊन बाजारात आले आणि एकच विचार अनेक ठिकाणी उद्‌भवू शकतो असे तात्पर्य काढून देशपांडे स्वस्थ बसले. पण पुढे, होडी बुडाली तरी काही ऐवज वाचवावा या भावनेने त्यांनी काही टिपणांचे व मिळालेल्या लेखांचा परामर्श घेणाऱ्या लेखाचे एक छोटे पुस्तक काढावे असे ठरविले. तेच हे ‘ दृष्टिकोन.’ अर्थात हे पुस्तक निघाले तरी पूर्वीच्या नियोजित पुस्तकाची आवश्यकता नाहीशी होते असे मला वाटत नाही. केशवसुतासंबंधीचे नजरेआड झालेले किंवा दुर्मिळ साहित्य प्रा. देशपांडे यांच्या संकलनात समाविष्ट असल्याने तेही केव्हा तरी प्रकाशात येणे जरूर आहे.

या पुस्तकात बरेचसे लेख टिपणांच्या स्वरूपाचे म्हणजे सुचलेले विचार फारसा विस्तार न करता नमूद करणारे आहेत व काही थोडे

अधिक सविस्तर लिहिलेले आहेत. साठ वर्षातील केशवसुतविषयक टीका लेखन हा लेख सर्वात मोठा आणि संपादित मजकुराचा उपयोग करून लिहिलेला असा आहे. एकूण पुस्तकात लेखकांनी काढलेले निष्कर्ष, प्रगट केलेले अभिप्राय सर्वसंमत होतील असे नाही. तसे होण्याची अपेक्षा वा गरजही नसते. पण केशवसुतांच्या आकलनाला व आस्वादाला या पुस्तकाचे नक्कीच सहाय्य होईल असे मला वाटते. काव्याचा रसास्वाद घेण्यासाठीं काव्याच्या पलीकडे जाणे जरूर असते की नाही, कोणास ठाऊक. पण कवीचा संपूर्ण अभ्यास करताना त्याच्या प्रेरणांची उगमस्थाने, समकालीन विचारांशी असलेला त्याचा संबंध, समकालीनांची प्रारंभिक प्रतिक्रिया इत्यादि गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. ‘ नवा शिपाई ’ या काव्यासंबंधी प्रा. देशपांडे यांनी प्रयत्नांनी जमविलेली माहिती आणि त्यावरून काढलेला निष्कर्ष ही मला तरी खूपच नवीन व चिंतनीय वाटली. अन्य लेखातही असे विचाराला, चर्चेला चालना देणारे, वेगळ्या दृष्टिकोनाचा व अभ्यासाचा प्रत्यय आणून देणारे पुष्कळच आहे. म्हणून मला वाटते, हे पुस्तक केशव-सुतांच्या अभ्यासाला केवळ पूरक नव्हे तर आवश्यक ठरेल.

– वि. वा. शिरवाडकर

## निवेदन

पुस्तकातील दुसरा विभाग हे या पुस्तकाचे जे मुख्य अंग त्याविषयीचा खुलासा प्रथम करणे जरूर आहे.

केशवसुतांच्या कवितेवर जेवढी चर्चा लेखरूपाने, ग्रंथरूपाने आणि काव्यविवेचनाच्या व इतर काही कवींच्या विवेचनाच्या निमित्ताने झाली आहे तिचा विचार केल्यास आणि या मूल्यमापनात सतत महत्त्वाची भर पडत जाणार आहे हे ध्यानी घेतल्यास या सर्व टीकेचा आढावा घेण्याकरिता विस्तृत ग्रंथाचीच आवश्यकता आहे. जर सुमारे साठ पानात हा आढावा घ्यायचा असेल तर टीकालेखांच्या संख्येकडे केवळ कौतुकाने पाहून व प्रत्येकाची नोंद करून मनाचे समाधान करून घ्यावे लागेल. तसे करण्याऐवजी "गेल्या साठ वर्षांतील केशवसुत विषयक टीकालेखन" या दीर्घ लेखात ज्या गोष्टी साधण्याचा यत्न केला आहे त्या अशा :

१) जे लेख दृष्टीसमोर नव्हते वा केशवसुत विषयक लेखांच्या यादीत नोंदले गेले नव्हते परंतु जे यादीतील इतर कित्येक बारीकसारीक लेखांपेक्षा खात्रीने सरस होते. त्यांचा चिकित्सकांना परिचय करून देणे;

२) केशवसुतांच्या कवितेतील चैतन्य व प्रतिभा ओळखणाऱ्या वा. ब. पटवर्धन, बालकवि ठोमरे, नारायण वामन टिळक, आ. रा. देशपांडे (कवि अनिल) आणि आचार्य जावडेकर इत्यादींच्या यासंबंधीच्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष लेखनाची या समीक्षा–इतिहासात जाणीव करून देणे ;

३) केशवसुतांच्या 'झपूर्झा' सारख्या कवितांविषयी प्रारंभीच्या तांबे प्रभृति टीकाकारांपासून मा. त्रिं. पटवर्धनापर्यंत जी अप्रीति काही नामवंतांना वाटत होती तिची ओळख करून देणे ;

४) मा. त्रिं. पटवर्धन आणि माडखोलकर यांच्या टीकेचा बराच बोलबाला झाला आहे. त्या टीकेमागची लेखकांची विचारसरणी अधिक स्पष्टपणे समजावून देता आल्यास ती, कवितेने काय साधले जावे असे या टीकाकारांना वाटत होते त्याची फोड करून, समजावून देणे;

५) केशवसुत समीक्षेची जी पर्वे होतात असे मला आढळून आले त्या पर्वांचा स्थूल परिचय करून देऊन प्रत्येक पर्वातील अतिशय ठळक अशा केशवसुत समीक्षेसंबंधी जेवढे विस्तारपूर्वक लिहिता येईल तेवढे लेखाच्या एकंदर मर्यादेचा विचार मनाशी ठेऊन वाचकांच्या पुढे मांडणे.

बहुतांशी सर्व विचारात घेण्यासारख्या लेखनाचा परामर्ष घेतला असला तरीही काही नांवे या लेखात यावयास पाहिजे होती ती श्री. ना. बनहट्टी, श्री. के. क्षीरसागर व वा. ल. कुलकर्णी यांची विशेषे-करून होत.

हा लेख हस्तलिखित स्वरूपात असतांना दि. के. बेडेकर यांना मुद्दाम वाचण्याची विनंति केली होती. त्यांनी तो वाचून केशवसुतसमीक्षेची पुढची दिशा कोणती असावी हे मी सूचित करावे असे मला सांगितले होते. स्वतःच्या काही कल्पनाही त्यानी थोडक्यात मांडल्या होत्या. त्यांच्या मते केशवसुतांच्या रोमॅन्टिसिझम् विषयी पुरेसा ऊहापोह झालेला नाही. त्याचप्रमाणे समकालीन काव्येतर वाङ्मयप्रकाराचा व गद्याचा आणि कवितेचा संबंध तपासला पाहिजे. वास्तविक वा. ब. पटवर्धन यांच्या 'काव्य आणि काव्योदय' या पुस्तकाचा, विविधज्ञानविस्तारातील वाङ्मयविवेचनाचा आणि आगरकरांच्या व इतर लेखकांच्या गद्याचा या कवितेशी असलेला संबंध थोडक्यात का होईना माझ्या या दीर्घ लेखात मी दाखवलेला आहे. परंतु त्यांना आपस्यांच्या कादंबऱ्या आणि केशवसुतांची कविता यांचाही अन्योन्य संबंध अभिप्रेत असावा. त्यांच्या या म्हणण्यात जो तथ्यांश आहे त्याचा अल्प भाग 'निद्रामग्न मुलीस' व 'गुलाबाची कळी' या दोन कवितांविषयी थोडक्यात दुसऱ्या एका लेखांत माझ्याकडून सूचित केला गेला आहे असे मला वाटते. ते कसेही असो.

केशवसुत-समीक्षेचा हा आढावा घेताना दोन गोष्टी मला जाणवल्या. त्या अशा की या समीक्षेमध्ये केशवसुत ज्या काळापासून कविता लिहू लागले त्या काळांतील इतर कवींच्या कविता कशा होत्या याचा विचार जवळ जवळ मुळीच झाला नाही आणि दुसरे म्हणजे केशवसुतांच्या काळांतील ज्या सामाजिक चळवळींची व सामाजिक जीवनाची चांगली माहिती असणे अवश्य आहे त्या माहितीचे प्रत्यंतर कोणत्याही लेखांत प्रकर्षाने दिसून आले नाही. जसजसे केशवसुतांच्या काळापासून आपण दूर चाललो आहोत तसतशी ही सामाजिक परिस्थितीची जाणीव मनात ठेवणे अधिकाधिक कठीण होत चालले आहे. त्यातच नव्या टीकेपैकी एका पंथाला वाङ्मयाचा सामाजिक परिस्थितीशी असलेला संबंध मान्यच होण्यासारखा नाही. तथापि, केशवसुतांच्या अभ्यासाला उपयुक्त ठरणाऱ्या या दोन दिशा आहेत असे मला निखालस वाटते. केशवसुतांच्या बरोबर कविता लिहीत असलेल्या इतर कवींच्या कविता पुन्हा एकदा निवडून संग्रहरूपाने मराठी वाचकांपुढे ठेवल्या गेल्या पाहिजेत म्हणजे मगच केशवसुतांचे नवेपण आणि त्यालाच अस्तर म्हणून चिकटलेले त्यांचे सांकेतिक वळण यांचा आपल्याला चांगला प्रत्यय येईल. हे दर्शविण्यासाठी या पुस्तकातील पहिले दोन टिपणवजा लेख मी लिहिले आहेत. त्यांचा विस्तार होणे अवश्य होते. परंतु तेवढी सवड मिळाली नाही आणि त्या बाबतीतल्या माझ्या अधिकाराबद्दलही मला शंका आहे.

'केशवसुतांच्या तीन कविता' या लेखांत विशेषेकरून 'रूढि, सृष्टि आणि कलि' व 'नवा शिपाई' या केशवसुतांच्या कवितांचा मला जाणवणारा सामाजिक संदर्भ उलगडून दाखवण्याचा मी प्रयत्न केला आहे. माझ्या समजुतीने इतक्या स्पष्टपणाने हा संदर्भ दाखवण्याचा केशवसुतसमीक्षेतील हा पहिलाच उपक्रम आहे.

'केशवसुतांचे व्यक्तिमत्व' आणि 'केशवसुतांच्या कवित्वाची काही वैशिष्टये' हे दोन लेखही वास्तविक आहेत त्यापेक्षा अधिक वाढवून व सांगोपांग विवेचन करून लिहायला पाहिजे होते. उदाहरणार्थ, 'स्फूर्ति' ही सबंध कविता एका विलक्षण कैफात लिहिलेली आहे.

तिच्याविषयी ‘कवित्वशक्तीची वैशिष्ट्ये’ या लेखात अधिक विवेचन करतांना हे दाखविता आले असते की ‘काठोकाठ भरू द्या पेला, फेस भराभर उसळू द्या’ या पहिल्या चरणापासून जो या कवितेत जोष उत्पन्न होतो तो पुढे तीव्रतेने वाढतच जातो. जगाचे रंग क्षणोक्षणी बदलत आहेत, या पेयाच्या उष्णतेने द्यावा पृथ्वी वेगाने मिसळत आहेत, रुढीचे दास या बदलामुळे खवळणार आहेत, या कैफाच्या योगे आकाशातील तारकारत्ने गरीब पृथ्वीकडे फेकण्याची आणि त्याकरिता देवांशीही झगडण्याची अतिमानवी शक्ती प्राप्त होत आहे, अखेरीस जुल्माचे तुकडे तुकडे करण्याची हिंमत निर्माण होऊन ‘मारा किंवा मरा’ अशी रणगर्जना करण्याची रौद्रता निर्माण झाली आहे–ही सारी बेभान वेग–लय उत्स्फूर्त अवस्थेचे लक्षण आहे.

परंतु सांगोपांग विवेचनाचा हेतु बाळगून हे लेख लिहिले नव्हते. पुस्तकाच्या प्रारंभीच्या स्वरूपाविषयी आपल्या प्रस्तावनेत कविवर्य कुसुमाग्रजानी योग्य ते स्पष्टीकरण केलेले असल्याने मी त्याची द्विरुक्ति करीत नाही.

‘स्वदेश’ साप्ताहिक कुसुमाग्रज चालवीत होते तेव्हा जानेवारी १९४७ च्या एका आठवड्याच्या अंकात ‘गोविंदाग्रजांची कविता कोणत्या मनोभूमिकेतून उद्‌भवलेली आहे?’ या विषयींची चर्चा करणारा व त्यानिमित्ताने गोविंदाग्रजांच्या ‘हुरहूर’ या कवितेतील

बुद्धीला जिरवीन भावजलि का आशा न माते दुजी

या ओळीवर लक्ष केंद्रित करणारा माझा लेख त्यानी प्रसिद्ध केला होता. त्यावेळपासून त्यांच्या प्रोत्साहक स्नेहभावाचे अमोल ऋण मी वागवीत आलो आहे. माझ्या या आधीच्या काही पुस्तकांच्या प्रकाशनाच्या वेळी त्यांच्या सौहार्दाची व आपुलकीच्या प्रयत्नांची शिदोरी माझ्या पाठीशी होतीच. माझ्या आग्रहास्तव त्यानी या पुस्तकाला प्रस्तावना लिहून दिली याबद्दल मी त्यांचा अधिकच ऋणी आहे.

**मु. गो. देशपांडे**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम.............................. दि: ....................
क्रमांक .............................. नों: दि: ....................

# विभाग १ ला

# शुद्धि-पत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २७ | ३ | चिरनि | चिरवि |
| ३१ | ७ | घरघोर | घनघोर |
| ३२ | १ | त्यांना | त्यांना किंवा वा. ब. पटवर्धनांना |
| ३५ | १६ | उहापोह | ऊहापोह |
| ३९ | १२ | वैशिष्ठ्ये, वैशिष्ठ्य | वैशिष्ट्ये, वैशिष्ट्य |
| ४२ | ७ | वैशिष्ठ्य | वैशिष्ट्य |
| ४२ | २२ | ,, | ,, |
| ४२ | शेवटची | ,, | ,, |
| ४३ | २० | ,, | ,, |
| ४४ | १९ | सहत | सहन |
| ४७ | २ | ,, | चुकून पडले आहे |
| ४७ | ३ | एका पत्रांत इंग्रजी | एका इंग्रजी पत्रात |
| ४९ | १ | मनाच्या | शब्द चुकून पडला आहे |
| ४९ | १२ | वैशिष्ठ्य | वैशिष्ट्य |
| ६१ | १२ | काढण्याची | काढण्यात |
| ६२ | १९ | इतरही ओळी खिस्ती | इतरही ओळी वाचतांना खिस्ती |
| ६९ | १८ | त्या कवितेमुळे | त्या कवितेचा; |
| ७७ | १७ | | स्वर्गात शब्द पुन्हा नको |
| ८० | ४ | | बहुतेक शब्द गाळावा |
| ८७ | १२ | Luvelace | Lovelace |
| ८९ | ९व१० | ' हे लेखन आहे ' | अवतरण चिह्न चुकून पडले आहे |
| ९१ | २६ | केलात्तरी | केला तर |
| ९८ | १९ | गेल्या | तत्पूर्वीच्या |
| १११ | १८ | हरपलेले | हरपले |
| ११६ | २७ | टीकालेखांमुळे | टीकालेख |
| ११९ | १३ | फार | फार. |
| १२२ | ७ | फ्रेंच कवितेत | फ्रेंच प्रभावाने निर्माण झालेल्या कवितेत |

# केशवसुतांची कविता :
# समकालीन कवींवरील प्रभाव

दा. क्र. १६६२४
शाखा (स्थळ प्रत)

केशवसुतांच्या कवितेने जे क्रांतिकारित्व प्रगट केले आहे ते कवितेच्या अन्तर्बाह्य स्वरुपातच असून सामाजिक दृष्ट्या केशवसुतांची कविता क्रांतिकारी ठरली असे म्हणणे म्हणजे तिच्या अंगी नसती शक्ती कल्पिणे होय, ही प्रा. जोग यांची भूमिका आहे. वाङ्मयाने क्रांती घडून येते या विचाराबद्दल जोगांना शंका आहे आणि जरी वाङ्मयसेवकांच्या लेखनामुळे तशी क्रांती झाली असे मानले तरी ज्यांची कविता अगदीच थोड्या लोकांकडून त्या काळात प्रशंसिली गेली व वाचली गेली त्या कवीला सामाजिक क्रांती घडवणारा असे मानण्यात अतिशयोक्तीचा फार मोठा भाग आहे असे जोगांना वाटते. म्हणून केशवसुतांनी क्रांती केली हे खरे असले तरी ती क्रांती काव्य प्रांतापुरतीच मर्यादित आहे आणि त्या काव्य प्रांतात मात्र केशवसुतांनी फार मोठा फरक घडविला असे प्रतिपादन जोग करीत असलेले आढळतात.

कवीचे लेखन वाचणाऱ्यांची संख्या अधिक नसेल तर ते लेखन क्रांतिकारक मानणे अप्रयोजकपणाचे आहे हे म्हणणे मुळातच तर्कविसंगत आहे. ज्यांच्या लेखनामुळे क्रांतीचे स्फुल्लिंग पेटले असे सर्वजण

कबूल करतात त्या व्हॉल्टेअर व रूसोचे लेखन मर्यादित संख्येच्या वाचकांनीच वाचले. बहुसंख्य फ्रेंच जनता तेव्हा साक्षर नव्हती. क्रांतीचा फैलाव करणारे वाङ्मय म्हणजे लाखोंच्या संख्येने वाटली जाणारी गुप्त पत्रकेच तेवढी होत अशी या लोकांची समजूत दिसते. ज्या वाङ्मयात क्रांतीचा ध्येयवेडेपणा आहे, नवीनाची ओढ आहे, जीर्ण व निरुपयोगी निःसत्व बंधनांची चीड आहे, न्यायावर व समतेवर आधारल्या जाणाऱ्या प्रगतिपर समाजाच्या स्थापनेची भविष्यवाणी आहे ते वाङ्मय क्रांतिकारी म्हणून गणले जाणे यात कांहीच चूक नाही. काव्यात ते येण्याच्या आधी केशवसुतांचे गुरु आगरकर व आगरकरांच्या कालातले इतर श्रेष्ठ विचारवंत व देशप्रेमाने भारलेले व वाघिणीच्या दुधावर वाढलेले लेखक यांच्याही वाङ्मयांत ते येऊन गेले; याचा अर्थ केशवसुतांनी केवळ प्रतिध्वनी उमटवले असा होत नाही. जेवढ्या आत्मसामर्थ्याने आगरकरानी लिहिले तेवढ्याच बंडखोरीने व आत्मसामर्थ्याने केशवसुतांनीही लिहिले आहे, याकडे आपण डोळेझाक करणे हे अक्षम्य आहे. आगरकरांनी जे विचार मांडण्याचे साहस दाखविले ते विचार समाजाने आत्मसात केलेले नव्हते. अजूनसुद्धा त्या विचारातील दाहकता आपणास जाणवते. अशा स्थितीत त्या विचारांचा आणि त्या विचारसरणीच्या अनुषंगाने कविमनाला प्रतीत होणाऱ्या क्रान्तीचा उद्‌गाता होणे ही सामान्य गोष्ट नाही. म्हणून जोगांच्या मुख्य प्रतिपादनाशी विचारी माणूस सहमत होईल असे वाटत नाही. केशवसुतांच्या कवितेतील क्रान्तिकारकता ही सामाजिक नसून ती केवळ काव्यप्रान्तातील क्रान्तिकारकता आहे असे आजचे जोगांसारखे विद्वान मानतात हे केशवसुतांच्या आत्म्याला कळल्यास त्याला किती वेदना होतील त्याची कल्पनाच करवत नाही! मनोरंजनार्थ लिहिणारे कवी निशाणाची प्रशंसा करणार नाहीत; परंतु जे रसरसत्या भावनांनी जगाला कलाटणी देण्याला सिद्ध झालेले आहेत ते निशाणाची प्रशंसा अवश्य गातील, असे केशवसुतांनी म्हटले तेव्हां आपण कोणत्या जातीचे कवी आहोत याविषयी त्यांनी खरा अभिप्राय सूचित केलाच आहे. पण मुख्य मुद्दा जोगांच्या मूळ प्रतिपादनातील निस्तेज वृत्ती व

आकलनाचा अभाव वाचकांच्या ध्यानी आणून देण्याचा नाही. तर काव्यप्रान्तातील केशवसुतांच्या क्रान्तिकारकत्वाविषयी त्यांनी जो अभिप्राय व्यक्त केला आहे तो तपासण्याचा आहे.

केशवसुतांच्या समकालीन कवींनी केशवसुतांच्या काव्यशैलीचे, रचनाप्रकाराचे आणि कविता विषयांचे अनुकरण कितपत केले ते पाहाणे या संबंधात बोधप्रद होईल. जोगांचा विचार गोविंदाग्रज, माधव ज्यूलियन आ. रा. देशपांडे, कुसुमाग्रज, मर्ढेकर, विन्दा करंदीकर, वसंत बापट प्रभृति कवींनी केशवसुतांना जी मानवंदना दिली आहे त्यावर आधारलेला आहे हे उघडच आहे. पण केशवसुतांचे कवी म्हणून जाणवलेले हे महत्त्व त्यांच्या पश्चात् जवळजवळ वीस वर्षांनी प्रथम जाणवले गेले आहे. गोविंदाग्रज आणि रेंदाळकर सोडले तर केशवसुतांच्या काळानंतर लगेच येणाऱ्या पुढच्या कवींपैकी कोणाला त्यांच्या काव्यशैलीची मोहिनी पडली किंवा त्यांच्या नव्या विचारांचा स्वीकार करावासा वाटला असे दिसत नाही. समकालीनावर केशवसुतांचा प्रभाव फारच कमी पडला असे आपल्या ध्यानी येईल. तेच थोडे विस्ताराने सांगण्याचा हेतु आहे. कारण त्यामुळे केशवसुतांनी जी क्रांती केली ती काव्याच्या अन्तर्बाह्य स्वरूपात केली असे म्हणण्याऐवजी केशवसुतांनी सामाजिक क्रांतीचा डंका वाजविला, मनुष्याला ऐहिकतेची शिकवण दिली, आत्मिक जाणीव तीव्रतेने जागृत केली आणि नव्या जीवनाशी समांतर राहील अशी कविता निर्माण करण्याचे प्रोत्साहन दिले हे म्हणणेच अधिक सयुक्तिक होईल हे पटेल. त्यांच्या समकालीन कवींपैकी काहींनी रचनाप्रकारातील नावीन्य दाखविले आहे, काहींनी स्पष्टपणाने 'आत्मलेखन' ज्याला म्हटले जाते असे स्वतःच्या दुर्दैवाचे वा दुर्दशेचे वर्णन केले आहे, परंतु केशवसुतासारखी नव्या युगाची जाणीव दाखविणारा कवी यात कोणीच आढळत नाही.

हे पाहाण्यासाठी १९०५ची 'काव्यरत्नावली' आणि १९१६ची 'काव्यरत्नावली' या दोन वर्षांच्या अंकातील कविता मी निवडल्या आहेत. १९०५ ची अशासाठी की, त्या वर्षाच्या अखेरीअखेरीला केशवसुत

निवर्तले. तेव्हा केशवसुतांचे वीस वर्षांचे काव्यलेखन तत्कालीन कविमंडळीसमोर असताना केशवसुतांच्या हयातीच्या अखेरच्या वर्षी त्यांच्या कवितेचा परिणाम इतरांवर कितपत झाला होता ते पाहिले म्हणजे त्यांनी इतरांवर कविता रचनेच्या बाबतीत किती प्रभाव पाडला ते ठरविता येईल. १९१६ ची काव्यरत्नावली अशासाठी की, १९१७ साली बहुधा जानेवारीतच केशवसुतांचा कवितासंग्रह ह. ना. आपटे यांनी प्रसिद्ध केला आणि वीणामंडळाने त्यांच्या निवडक कविता छापल्या व नंतर पारडे फिरले. केशवसुतांवर लगेच विस्तृत परीक्षणे आणि लेखमाला येऊ लागल्या व कवी म्हणून ते नव्या कविमंडळीसमोर आदर्शरूपाने अवतीर्ण झाले. परंतु त्यांची कविता संग्रहरूपाने येण्याच्या आधी म्हणजे १९१६ अखेरपर्यंत मराठी कविता कोणत्या आवर्तात रुतली होती व तिच्यावर केशवसुतांचा प्रभाव जवळ जवळ शून्यवत कसा होता तेही पाहाण्याजोगे आहे. पुढच्या विख्यात कवींनी केशवसुतांची थोरवी ओळखली. परंतु खुद्द केशवसुतांचे समकालीन जी काव्यरचना करीत होते ती कशी होती व केव्हा केव्हा प्रत्यक्ष केशवसुतांना देखील आपल्या त्रुटित चुटक्यापेक्षा त्या काळी लिहिल्या जाणाऱ्या दीर्घ कवितेचे महत्त्व किती तीव्रतेने जाणवत होते हे आपण ध्यानी घेतले म्हणजे जोगांच्या प्रतिपादनातील असमर्थनीयता दिसून येते.

१९०५ च्या काव्यरत्नावलीत विनायक, माधवानुज, श्रीपाद नारायण मुजुमदार, विहंगम, बा. ल. अंतरकर, भृंग, विष्णु गणेश नेने, केशवसुत, बा. सी. जोशी, मल्हार खंडेराव चिटणीस, चंद्रशेखर, बाळकृष्ण अनंत भिडे, चक्रवाक, कै. बळवंत जनार्दन करंदीकर, मोरो गणेश लोंढे, प. त्र्यं. धर्माधिकारी, पांडुरंग बाळकृष्ण दडकर, गोविंद पांडुरंग देवधर, रंगनाथ एच. अधिकारी, विष्णु बाबाजीराव कुलकर्णी, राजहंस, वनवासी, दातार, वा. वा. गद्रे, शंकर कृष्ण आणि चिंतामण माधव पिपळसकर अशा सत्तावीस कवींच्या कविता आहेत.

यातील अंतरकर यांनी ‘मेघदूतच्छाया’ या नावाची कविता मेघदूताचे समश्लोकी भाषांतर म्हणून लिहिली असून प्रस्तावनेत कालिदासाच्या कवित्वाविषयी आणि कालनिर्णयाविषयी ऊहापोह

करून मराठी व संस्कृत यांतील यमक व निर्यमक कवितेसंबंधीही लिहिले आहे. अंतरकरांच्या या धर्तीच्या कवितेवरून केशवसुताबद्दल त्यांना काही आत्मीयता दिसत नाही. माधवानुजासारख्या त्यातल्या त्यात सरस कविता लिहिणाऱ्याने या अंकांत कांही अन्योक्ती छापल्या आहेत. त्यातील प्लेगाच्या त्या दिवसांत उंदरालाही माहात्म्य लाभले व जो तो त्याला भिऊ लागला याबद्दलचीही एक आहे व असले विनोदी आणि कवितेची प्रतिष्ठा कमी करणारे कांही केशवसुतामध्ये आढळणे अतिशय कठीण. 'खानावळीतील घृतधारा' सुद्धा कांहीतरी कवित्वगुण अंगी असणारी अशी लहानशी कविता आहे. माधवानुजांचे दुसरे काव्य म्हणजे मेघनादवध हे होय. त्याचे ३ रा व ४ था असे दोन सर्ग या वर्षीच्या 'रत्नावली'त आहेत. हीही रचना केशवसुतांच्या प्रभावाचे अस्तित्व मुळीच दाखवीत नाही.

विनायकांच्या या वर्षीच्या कवितांपैकी कृष्णाकुमारी, वीरमती, शिवसंदेश, मोहानंतर, ध्यास तो भास, गणिकोद्धार ही खंडकाव्येच म्हटली तरी चालतील. 'नदी आणि कवी' व 'नागपंचमी' या त्यांच्या दोन लहान कविता. त्यापैकी नदी आणि कवी ही थोडीफार केशवसुतांच्या धर्तीची मानली तरी नागपंचमी ही आशयाच्या दृष्टीने केशवसुतांच्या मनोवृत्तीपेक्षा फारच वेगळ्या मनोवृत्तीची निदर्शक आहे. चंद्रशेखर यांच्या कवितेचे नाते केशवसुतांच्या कवितेशी आहे असे कोणीच मानीत नाही. मोरो गणेश लोंढे यांची 'मनोवृत्ती' ही कविता मदनाची बाधा नखरेबाजालाच होते आणि इतरांना होत नाही असे थोडेच आहे असे विचारणारी असून मनोवृत्तीच जिंकल्या पाहिजेत व यत्नाने मनोनिग्रह केला पाहिजे असा उपदेश करणारी आहे. इतर कवींच्या कवितांचे स्वरूप कळण्यासाठी काही नमुन्याच्या ओळी मुद्दाम देतो :

> आगपेटि गे! तूज पाहुनी । कल्पना किती येती मन्मनीं;
> व्यक्त वाणिने त्या करावया । व्हावि आजि वाग्देविची दया ॥

—आगपेटीस या ३० श्लोकी
कवितेतील पहिला श्लोक.

तुझीच जगदंबिके चरणपद्मसेवा घडो ।
जडो सुयशवर्णनी मम मती, अहंता झडो ।
स्वधर्म सुख दे बहू करि कृपा अशी या जनी ।
नमो प्रणवरूपिणी हृदयवासिनी स्वामिनी ॥

—श्री गायत्रीवंदन, नववा श्लोक.

देती वृक्ष फळे सदैव दुभती धेनू किती ह्या अहा !
पृथ्वी सर्व चराचरां शिरि धरी साहूनि भारा महा,
हा साराच परार्थ न स्वहित हे शोधा मनी, सज्जना–
स्वार्थी प्रीति नसे परार्थंच रुचे अत्यादरे तन्मना ॥

—भृंग कवीची सज्जनांची थोरवी
ही कविता ९ वा श्लोक.

आहे दुःस्थिति माजि राष्ट्र पडले फारा दिसापासुनी
गेले लोक म्हणोनिया बहुत हे मद्देशिंचे कावुनी
त्यांना उत्तम बोध हाच कथितो मेवाकडे जा पहा
तेणे जाइल निश्चये घडिमधी नाशाप्रती ताप हा –

—मेवास उद्देशून कवितेतील
शेवटचा ११ वा श्लोक.

थांब पतंगा ! ' थांब न करि बा तू ऐसा अविचार
स्वस्थ रहा क्षण ऐकुनि घेई गोष्टी बरव्या चार
मूर्खा ? करिसी अज्ञत्वे हा किमर्थ जीवित घात ?
आत्मघात हा बरा नसे बा सौख्यलेश नच यात–

—पतंगास ( दिव्यावर उड्या टाकताना पाहून )

अर्धांगी सातव्याने परमशुभ तुला घालितो मी करंजी
मिष्टान्नासक्त लोकां करित बघ जिचे आतले सत्त्व राजी !
शुद्ध ज्ञानास तैशी हृदयिं धरुनिया पूर्ण सत्वान्विता हो,
तेणे विद्वज्जनांच्या मुखि तव विलसो कीर्तिचा दिव्य लाहो !

—वराने वधूला घातलेले दहा घांस.

आदेश हा धर्म व शास्त्र यांचा । हा आमुचा बा! उपदेश साचा ॥
हे सर्व वेदांतील सार पाहे । ही ईश्वराज्ञा सकलांस आहे ॥

— वेदाध्ययनानंतर शिष्यास गुरु उपदेश करितात.
आर्या १९ वी.

परंतु मति पांखरा, मम शिरे तुझ्या चिंतनी,
भय प्रबल जे करी विकल चित्त अन्यक्षणीं;
म्हणाल वपु हे तुझे परम सुंदर प्राणिया !
कृतांत खरपाश सज्ज असतीच ओढावया !!

— बागेतील फुलपाखरास. शेवटचा आठवा श्लोक

जेवि लगाम तुरंगा, हस्तीते साकळी करी रुद्ध
या वारयोषिताही पुरुषा करिती क्षणामध्ये बद्ध.

वेश्या — आर्या १७ वी.

क्रीडा करीत असता जणु कंदुकाने
उड्डाण घेऊनि बसे अजि येथ माने
की प्रीतिराग सखिचा निजमूर्तिमंत
ये येथ एकवटुनी समयी प्रशांत.

तारका — श्लोक ४ था.

जे मंदमंद विहरे कुल कोकरांचे
कर्णा सुहर्षकर ते ध्वनि पावसांचे
ते भृंग—गुंजन तसे सरिता—प्रपात
याचे करी मधुर चिंतन मी मनांत.

( निद्रा — वर्डस्वर्थ कवीच्या Sleep या कवितेच्या आधाराने )
— पहिला श्लोक.

ईर्षा असे खरुज विज्वर मच्छराने
हा ग्रस्त दद्रुममता धरि या मदाने
की कुष्ट दुष्ट कुटिलाई करीत ताप
तो गर्वही अडकवीत तनू सपाप

निदान—श्लोक ३ रा.

मंदिल केला मनुजा। त्वां परि शिर केले कोणी?
कापड विणिले तूंच खरें, परि कापुस ये कुठुनी?
पाऊस पडतो कैसा, कळते घमंड ही धरिसी;
मग वेळी जर न पडे तरि कां हांका मारिसी?
नरा! दुर्बला व्यर्थ मारिशी फुशारकी कां रे?
बल तव लव बा, वर्ण्य कवीला दौर्बल्यचि सारे!

—मानवी दौर्बल्य

साकी १, १० व शेवटची १२ वी

अंगे रंगे भरवुनि, दंगे रस्तोरस्ती कां करितां?
शिष्ट म्हणवुनी, दुष्ट कृतीने नष्टचर्य का अनुसरतां

—होळी

दशम तो विजयादशमी दिन, । करिति लोक जमूनि शिलंगण,
प्रमुख पूजिति ते शमी आपटा । म्हणति 'वित्त' परस्पर 'या लुटा'.

—शरल्लीला

या अवतरणावरून केशवसुतांच्या बरोबरच ज्यांची कविता प्रसिद्ध होत होती त्यांची आंतरिक श्रद्धा, त्यांची सामाजिक दृष्टि, त्यांच्या सामान्य भावना, त्यांचे मानसिक दौर्बल्य, त्यांचा दैववाद व निष्प्रभ व्यावहारिकता आणि केशवसुतांच्या कवितेतील गांभीर्य, औदासीन्य, त्वेष, मानवी जीवनाच्या श्रेष्ठतेची कल्पना, दुर्दम्य उत्साह यांतील विरोध चटकन् जाणवतो. विशेष म्हणजे या वर्षीच्या काव्यरत्नावलीतच केशवसुतांच्या चिरवियुक्ताचा उद्गार, नवा शिपाई, मयूरासन आणि ताजमहाल, प्रीती व हरपले श्रेय या कविता प्रसिद्ध झाल्या आहेत.

१९१६ सालच्या काव्यरत्नावलीत केशव नारायण वैद्य, अनंततनय, आनंदीरमण, धूर्जटी, यशोधन, अनंत विठ्ठल चित्रे, दत्तात्रेय तुकाराम पणशीकर, भालचंद्र, गिरीश, विठ्ठल भगवंत लेंभे, ग. स. जोशी, के. ल. टेंभुर्णीकर, श्रीधर, सीताकांत, नीळकंठ, पी. एस. प्रभुदेसाई, रेंदाळकर, केशव विश्वनाथ फणसे, विश्वनाथ नारायण रेडे, म. कृ. गोळवलकर, गोविंदानुज सुरली, सुमंत, दु. आ. तिवारी, विहंग, नरहर

शंकर रहाळकर, अनंतसुत, महादेव भिमाजी कुलकर्णी, एम्. ज्युलियन, माधव गोविंद भिडे, नारायण केशव बेहरे, ग. म. वैद्य, सौ. शांताबाई फणशे, सौ. स. भि. त्र्यंबकसुत, र. बा. जामनेरकर, मंजुबाळ, रामचंद्र विष्णु किणीकर, केशवकुमार, रामचंद्र बाळाजी वडगांवकर, किरात, विष्णु बाळकृष्ण जोशी, पारुजी नारायण मिसाळ, वसंतविहार, रमाकांत, साधुदास, सुमंतकांता, कालिकिंकर, लक्ष्मण जगन्नाथ अकूत व कृष्णानुज कालेकर असे कवी आहेत. यातले कांही तेव्हाचे किंवा पुढील काळातले प्रसिद्ध कवी म्हणजे अनंततनय, आनंदीरमण, गिरीश, लेंभे, श्री. बा. रानडे (श्रीधर), रेंदाळकर, सुमंत, तिवारी, रहाळकर, माधव ज्यूलियन, बेहरे, किरात आणि साधुदास हे होत. तेव्हा प्रथम यांच्या कविता या वर्षीच्या काव्यरत्नावलीत कोणत्या आल्या ते पाहिले पाहिजे. अनंततनयांची अंतर्विद्धकलिका ही दीर्घ सामाजिक कविता असून मानापमान व शारदा नाटकातील चाली त्यांनी आपल्या पद्यांसाठी घेतल्याचे संपादकांनी सांगितले आहे. जी वागणूक पुरुषाच्या बाबतीत पापी मानली जात नाही तीच स्त्रीच्या बाबतीत मात्र पापमय ठरते या पुरुषी न्यायातील अन्याय चव्हाट्यावर मांडण्यासाठी अनंततनयांनी ही कविता रचिली असावी असे वाटते. परंतु ती इतकी भेसूरपणाने भरलेली आहे की, केशवसुतांच्या स्त्रीदाक्षिण्याच्या कल्पनेला ती जवळची वाटणारी मुळीच नाही. आनंदीरमण या कवीने मोठ्या अगत्याने आणि आदराने केशवसुतांकडून कविता लेखनाबद्दल शिकवणूक मिळण्याची इच्छा व्यक्त केली होती खरी. परंतु या कवीने पुढे केशवसुतांची कांहीच स्मृती उमटणार नाही असली निष्प्रभ कविता लिहिली. या वर्षीच्या अंकात आनंदीरमण यांची वीरदुहिता ही कविता (तीन सर्ग) आली आहे. गिरीश हे तेव्हा नवेच कवी होते. लेंभे यांच्या कलहान्तरिता, कवीचा अर्ज व भग्नमनोरथ या तीन कविता या वर्षीच्या रत्नावलीत प्रसिद्ध झाल्या. पतीशी थोडेसे रुसावे आणि मग पतीचे प्रेम जिंकावे अशा विचाराने एका दयितेने पतीवर रोष धरला त्याचे पर्यवसान म्हणजे ती पतीच्या प्रेमाला पूर्णपणे पारखी झाली म्हणून ती आता शोक करीत आहे, अशी मध्यवर्ती कल्पना कलहान्तरिता या कवितेत आहे. कवीचा अर्ज

ही कविता देवाला विसरून आजपर्यंत आपण अनंत कवने केली, परंतु देवभक्तीमध्ये रममाण झालो नाही यास्तव पश्चात्ताप व्यक्त करणारी आहे.

धिग्धिक् कवित्व मम हे त्रिजगन्निवासा
झाले ! अहा ! विसरलो तुजलागि कैसा ?

असे कवी म्हणतो. भग्नमनोरथ या कवितेत शुकाच्या तीव्र इंद्रियसंयमापुढे पराभूत झालेली रंभा आपल्या सखीला आपल्या दुर्दैवाची कहाणी सांगत आहे. या कवितेत केशवसुतांच्या देवयानीची आर्तता आढळत नाही. सुमंत यांच्या वसंतकाल, आहे आणि नाही व छायागीत या तीन कविता नव्या प्रवृत्तीच्या द्योतक आहेत. परंतु तरीही

'ईशकृपा घडली, जयावरि, ईशकृपा घडली;
बहु कष्ट जाहले तरी तयाची कवण गोष्ट नडली ?

हे वसंतकाल या कवितेतील पदाचे अखेरचे शब्द, आहे आणि नाही या कवितेतील त्रिभुवन व्यापून राहिलेल्या ईश्वरतत्त्वाची जाणीव व छायागीतमधील

प्रभुपदाब्जी लीन दासी । दीन नमवी निजपदासी ॥
हंसुनि गाली चुंबणारी । मधुकरी गीत गाणारी ॥

या मध्यवर्ती कल्पनेच्या सूचक ओळी केशवसुतांचा प्रभाव दाखविणाऱ्या मुळीच नव्हेत. तिवारींच्या तारापतन या कवितेत सर्वजण मर्त्य आहेत असे सूचित केले आहे. एक तारा स्वर्गातील चंद्र-चांदण्याचा खेळ तसाच टाकून लुप्त झाली. ती स्वर्गही नको व पृथ्वीही नको अशा विटलेल्या भावनेने मध्येच कुठेतरी नाहीशी झाली. मानवी जीवन असेच आहे असे कवी सुचवितो. रहाळकर हे स्वाभाविकच केशवसुतांचे अनुयायी आहेत म्हणून माझे गाणे व पलीकडे या त्यांच्या दोन्ही कवितांमध्ये केशवसुतांची छटा दिसण्याची शक्यता होती. तथापि माझे गाणे या कवितेत ती केवळ दिसते इतकेच. नाहीतर केशवसुतांच्या ओळी पुन्हा अवतरतात व माधव ज्यूलियन यानी जो दोष केशवसुतांच्या

निसर्ग कवितेत दाखविला आहे तोच या ओळीत रहाळकरांनी पुन्हा गिरविला आहे. त्या ओळी अशा :

वर्षतो गान
वरुनी चंडोल
गान नच, जादूचा लोळ !

परंतु पलीकडे या कवितेत विरक्ती दाटून आली असून तांब्यांच्या वृत्तीचा आविष्कार तेथे घडला आहे. माधव ज्युलियन किंवा बेहरे हे नवेच कवी तेव्हा होते व त्यापैकी बेहरे हे केशवसुतांची श्रेष्ठता ओळखणारेच होते. किरात हे केशवसुतांचे जवळजवळ समकालीन व त्यांनीच केशवसुतांवर मनोरंजनात मृत्युलेखही लिहिला. त्यांची कविता वीर राम ही आहे व ती पूर्णपणे भक्तिप्रधान आहे. साधुदासांची बरीचशी रचना ऐतिहासिक दीर्घ कवितेची आहे. परंतु त्यानी केशवसुतांची महती ओळखली होती हे त्यांच्या काव्यचर्चा या पुस्तकातील छोट्या लेखावरून कोणालाही कळतेच. मात्र रत्नावलीच्या या अंकातील त्यांची कविता त्याना कोणीतरी कविवर्य म्हणून संबोधले असताना त्यांच्या मनाला त्यांच्या विनयी स्वभावामुळे व स्वतःच्या अल्प शक्तीची जाणीव असल्यामुळे जी कुचंबणा वाटली ती व्यक्त करणारी आहे. हे बारा-तेरा कवी ठळक म्हणून त्यांच्या कवितांचे स्वरूप आधी पाहिले. उरलेले छत्तीस कवी १९१६ साली कोणत्या तऱ्हेची कविता लिहीत होते ते पाहणे क्रमानेच आले. तापी नदीवर एक प्रदीर्घ वर्णनात्मक कविता पांच प्रसंगांत एका कवीने गुंफलेली आहे. कवी अशी ग्वाही देतो की, ‘ ह्या कवितेस संस्कृत किंवा इंग्रजी लेखाचा मुळीच आधार नाही. ’ ह्या नदीचा जो बराच भाग पाहण्यात आला त्याजवर ही कविता रचली आहे. ’ दुसऱ्या एका कवीने घोर प्रतिज्ञा केलेली दिसते की, वसुधा दुभंग झाली, झंझावात सुटला, ज्या घोर वनात लवमात्र पाणी नेत्रांना लावायला नाही अशा ठिकाणी राहावे लागले, विद्युत्पात झाला, माझ्या शिरावर आकाश कोसळले तरीही मी चारुगात्री कवितेचा वियोग सहन करणार नाही. कविता ही माझी दयिता आहे. तिला सोडून मी राहावे असे म्हणता, परंतु ते कसे शक्य आहे ? या कवीची ही प्रतिज्ञा ऐकून

स्वाभाविकच हा कवि कोण याची थोडीशी उत्सुकता वाचकांना वाटेल. परंतु कवितेने त्याला कसलेही स्थान लाभू दिले नसल्यामुळे तो कोण ते सांगण्याची तसदी मीही देत नाही. आणखी एका कवीने वेदातील काव्य म्हणून ऋक्संहिता अष्टक १ अध्याय ४ सूक्त ५० वे यातील ऋचांचा श्लोकमय अनुवाद दिला आहे. परमेश्वर प्रार्थना या कवितेत कवी म्हणतो की, कामलोभादि रिपू देवाची नित्य सेवा करण्याच्या आड येतात, म्हणून देवाने या दीन लेकराला कृपाळूपणे आपल्या सर्वशक्तित्वाची खरी जाणीव करून द्यावी. माणसे व्यर्थ संसाराची काळजी करीत राहातात; परंतु पक्ष्यांना चारा कोण घालतो ? पशूंना रोज ताजे कसे मिळते ? पक्ष्यांनी कुठे कोठार केले आहे ?

असे मानवा काळजी संसृतीची
खगांना मृगांना नसे भीति तीची
मति श्रेष्ठ हा व्यर्थ तोरा नरांचा
वनीचा बरा संघ तो वानरांचा. (११ वा श्लोक)

आणखी एक कवी प्रतिभादेवीने वेगाने कवीला संस्करण कार्यात मदत करण्यास धावावे अशी अपेक्षा व्यक्त करतो. जीवनकलहामुळे कवितेकडे काही लक्ष्य देता येत नाही आणि काही वेळा आळसामुळेही तसे होते ! खंडकाव्ये किंवा कथनस्वरूपाची वा ऐतिहासिक पार्श्वभूमीवरील कविता याही वर्षाच्या अंकात आहे. वीरदुहिता हे एक उदाहरण, गीतांजलि हे दुसरे उदाहरण. राजा मुचकुंदकृत श्रीकृष्णस्तुति, द्वादश जोतिर्लिंग, श्रीहनुमचरित अशा लहानमोठ्या कविताही या वर्षीच्या रचनेत आहेत. डेथ् द लेव्हलर या कवितेची मध्यवर्ती कल्पना घेऊन लिहिली असावी असे वाटणारी मृत्यूचा इशारा ही कविता मुळासारखी परिणामकारक उतरावयास पाहिजे होती, परंतु ती तशी झालेली नाही. आणखी कितीतरी सामान्य कविता आहेत त्याचा तपशील देत बसण्यात स्वारस्य कांहीच नाही. या सर्व कवितांमध्ये एकही सुनीत नाही हे पुन्हा लक्षात घेण्याजोगे आहे.

'काव्यरत्नावली'चे धोरण निव्वळ नव्या धर्तीच्या कविता छापण्याचे नव्हते. तिच्यात जुन्या आणि नव्या कवींना आश्रय मिळत असे. त्याचे

प्रमाण पाहिल्यास कदाचित वामन दाजी ओक आणि हरि माधव पंडित यांना आवडणाऱ्या व त्यांच्या पसंतीचा शिक्का मिळविणाऱ्या कविता केशवसुतांच्या कवित्वशैलीच्या तेवढ्याशा नसतील असेही कदाचित म्हणता येईल. १९०१ सालच्या जूनच्या विविधज्ञानविस्तारात 'एका अर्वाचीन कवीचा गर्वच्छेद' ही कविता आली आहे. या कवितेत एकंदर २२ कडवी असून वाल्मीकि, व्यास, कालिदास, भवभूति, भट्ट नारायण, शूद्रक, भट्टि, कबीर, ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, वामन, रामदास, मुक्तेश्वर, श्रीधर, रघुनाथ पंडित, महीपति, आनंदफंदी, रामजोशी व मोरोपंत इतक्या कवींच्या काव्यश्रेष्ठतेची ठळक लक्षणे श्लोकबद्ध करून त्यात मांडली आहेत. अशा श्रेष्ठ कवींची बरोबरी तू करशील काय असे अर्वाचीन कवीला वारंवार या कवितेत विचारलेले आहे. त्यांच्याबरोबर सामना करण्यास अर्वाचीन कवी धजेल काय ? 'वास्तविक त्यांच्यापुढे लोटांगण घालणे हेच तुला योग्य वाटत नाही काय ?' असा प्रश्न कवीने या पद्यात अर्वाचीन कवीस विचारला आहे. एक नमुना म्हणून पुढील श्लोक पहा.

भुलूनि ज्याच्या करुणाष्टकांवर
"खरा सुखी मी, विबुधेश पामर–"
असे वदे वाचक आपुल्या मना,
तयासि तूं देशिल काय सामना ? (रामदास)

या कवितेतील अर्वाचीन कवीचा गर्वच्छेद म्हणजे कोणा एका कवीच्या गर्वोक्तीला अनुलक्षून असेल तर तो केशवसुतांच्याच कवितेतील गर्विष्ठ भासणाऱ्या उद्‌गारांबद्दल असावा असे वाटते. मात्र त्यांची प्रसिद्ध 'आम्ही कोण ?' ही सुनीत रचना नोव्हेंबर १९०१ ची आहे. परंतु त्याखेरीज त्यांच्या आधीच्या काही कविता अशा गर्वोद्‌गाराच्या होत्या. तथापि मुख्य मुद्दा असा की विविधज्ञान विस्तार किंवा काव्यरत्नावली मासिकातून प्रसिद्ध होणाऱ्या कविता नवीनाच्या जेवढ्या समर्थक होत्या, त्यापेक्षाही जुन्याच्या अधिक समर्थक होत्या.

काव्यरत्नावलीत एकंदर किती कविता आपण प्रसिद्ध केली याची त्रोटक माहिती डिसेंबर १९०० च्या अंकात संपादकानी दिली आहे.

(जून) १८८७ पासून १९०० पर्यंत एकूण १४८१२ श्लोक किंवा कडवी होतील एवढी कविता रत्नावलीने छापली. त्यापैकी रत्नावलीच्या १० व्या वर्षी कृष्णाजी केशव दामले यांची ७७ एवढी संख्या दाखविणारी कविता रत्नावलीत आली. डिसेंबरच्या याच अंकात केशवसुत कवींची चार प्रकरणे त्या वर्षीच्या रत्नावलीत आली असे नमूद केले असून ज्या कविता निर्देशिल्या आहेत त्या 'कर्तव्य आणि प्रीति', 'तिने जाता चुंबिले असे याते', 'विद्याप्रशस्ति' व 'रुष्ट सुंदरीस' या होत.

खुद्द रत्नावलीकार आपले निवेदन सालअखेर करीत असताना म्हणतात की, आर्थिक झीज सोसून रत्नावली चालली आहे. अनियमितपणाने ती चालली आहे यात कवींचा दोष नसून दोष स्वतःचाच आहे, आता कविमंडळींनी आपल्या कामाला लागायचे आहे. म्हणजे काय करायचे याची जी थोडीशी फोड रत्नावलीकार करतात ती तेव्हाच्या काव्यविषयक दृष्टीची कल्पना देण्यास समर्थ आहे. आणि तिच्यावरून केशवसुतांची कविता समोर असुनसुद्धा तिची नवता किंवा सामर्थ्य ओळखण्याच्या कामी तेव्हाची कविमंडळी एकंदरीने कशी अपुरी पडली तेच दिसून येते. रत्नावलीकार म्हणतात की आता, संस्कृतात पुष्कळ प्रकरणे अद्याप भाषांतर न होता पडली आहेत. तेव्हा कविमंडळींनी किरात कवीसारख्या संस्कृत कवीच्या एकेक सर्गाचे एकेकाने भाषांतर करण्याचे ठरविले तर बरे होईल. ऋतुसंहाराच्या धर्तीवर राधारमण कवीने ऋतु वृत्त लिहिले आहे याचा उल्लेख करून श्रीमद्‌रत्नसिंह या मोठ्या काव्याचे कर्ते शिरसाळकर हे ते काव्य दहा सर्गापर्यन्त मोठे होईल असे म्हणत असल्याचेही त्यांनी सांगितले आहे. शिवाय 'आर्य स्त्रियांची चरित्रे गाण्यात रचावयाची राहिली आहेत.'

खुद्द केशवसुतांची कविता जेव्हा रत्नावलीत प्रसिद्ध होई तेव्हा रत्नावली लोकप्रिय होती असे जरी नसले तरी पुढे तिची किंमत मुळीच उरली नाही हे स्पष्ट दिसते. १९१६ साली रत्नावलीच्या मागील बाइंड केलेल्या पुस्तकांची स्थिति काय होती ते त्याच वर्षीच्या मलपृष्ठावर छापले आहे. "रत्नावलीची मागील बाइंड केलेली पुस्तके रद्दीच्या

भावाने विकण्याचा प्रसंग आला आहे. ही सर्व अनुक्रमाने घेतल्यास प्रत्येक पुस्तकास आठ आणे. फुटकळ पुस्तकास दहा आणे. टपाल व्ही. पी. खर्च मुळीच नाही." वास्तविक रत्नावलीची किंमत १। रु. होती. परंतु दोन प्रतींना १॥ रु., तीन प्रतींना १॥। रु. व चार प्रतींना दोन रुपये असा दर संपादकानी या पुस्तकावर जाहीर केलेला होता. आणि असल्या कविता छापणाऱ्या मासिकाला बरे दिवस येतील अशी कल्पना तरी करणे कसे शक्य आहे ? केशवसुतांच्या अस्सल चांगल्या कवितांचे पुस्तक सुद्धा बारा आण्याला विक्रीला ठेवण्याचे हरिभाऊ आपट्यांनी ठरविले तरीही त्याची विक्री तेव्हा फारच मंद होती. मग या कवितांचे नाते केशवसुतांच्या कवित्वाशी फारच दूरचे असतांना त्यांचे चहाते कितीसे असणार ?

काव्यप्रांतात केशवसुतांनी जी क्रांती केली तिचे स्वरूप आपण आता व्यवस्थितपणाने मांडून दाखवतो व पुढच्या कवींनी या अन्तःप्रेरणा प्रगट केलेल्या आहेत हेही मान्य करतो. परंतु केशवसुतांच्या कवितेचा परिणाम समकालीनावर फारसा झालाच नाही. त्याना महत्त्व आहे ते त्यांच्या प्रगतिपर विचारसरणीमुळे, व्यक्तित्वसंपन्नतेमुळे आणि बंडखोरीमुळे. ती दीपशिखा सामाजिक जीवनाला चाटून जाणारी आहे. केवळ कविता लेखनापुरतीच ती मर्यादित नाही. किंबहुना ती तशी सर्व रसिकांना स्फूर्तिप्रद वाटली म्हणूनच कविता या दृष्टीने तिचे महत्त्व.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.......................... विः ......................
क्रमांक .......................... नोंद दि.....................

# परिशिष्ट

## काव्यरत्नावलीतील बारा वर्षांत प्रसिद्ध झालेली वेगवेगळ्या कवींची कविता संख्या

[ डिसेंबर १९०० च्या अंकावरून ]

| वर्ष १ ले | कविता संख्या |
|---|---|
| मोरो गणेश लोंढे | १२५९ |
| विठ्ठल भगवंत लेंभे | १०५८ |
| कै. सदाशिव मोरेश्वर भिडे | १०५३ |
| कै. केशव सदाशिव रिसबूड | ८६५ |
| एकनाथ गणेश भांडारे | ६२८ |
| कै. बापूसाहेब पटवर्धन, कुरुंदवाडकर | ५०० |
| केशव वामन पेठे | ४४५ |
| कै. वामन दाजी ओक | ४३३ |
| कै. बळवंतराव कमळाकर | ४१७ |
| बळवंत जनार्दन करंदीकर | २६२ |
| वासुदेव वामनशास्त्री खरे | २४६ |
| गणेश अनंत दारवेकर | २३३ |
| गोविंद गोपाळ टिपणीस | २२२ |
| गोपाळ गणेश रानडे | २१३ |
| नारायण नरसिंह फडणीस | १८८ |
| विष्णू गणेश नेने | १४८ |
| गणेश बळवंत मोडक | १३६ |
| परशुराम नारायण पाटणकर, एम. ए. | १२१ |
| कै. गणेशशास्त्री लेले | ९८ |
| माकंद कवि | ५९ |

| | | |
|---|---|---|
| | शंकर दाजी शास्त्री-पदे | ४८ |
| | कै. वंटय्या नायडू | ४३ |
| | शंकर गणेश देशपांडे | २७ |
| | अण्णा देशपांडे | २७ |
| | त्रिंबक बळवंत दाणी | २५ |
| | वसंतराव विजयकर | ८ |
| | | ८७६२ |

### वर्ष २ रे

| | | |
|---|---|---|
| १ | अनंत नारायण पंडित | १०५० |
| २ | लक्ष्मण गणेश लेले | २२९ |
| ३ | कै. धर्मराज नारायण गांधी | ८५ |
| ४ | गोविंद वासुदेव कानिटकर | ६४ |
| ५ | नारायण अनंत चिटणीस | ४९ |
| ६ | विष्णुपंत सरवटे | ३ |
| | | १४८० |

### वर्ष ३ रे

| | | |
|---|---|---|
| १ | सदाशिव शंकर पारगावकर | ३०७ |
| २ | तर्खडकर | ४८ |
| ३ | गोपाळ गोविंद सोमण | ४१ |
| ४ | गणेश बाळकृष्ण जोशी | २७ |
| ५ | माधव कवि | २५ |
| ६ | नारायण पांडुरंग नाखरे | १२ |
| | | ४६० |

### वर्ष ४ थे

| | | |
|---|---|---|
| १ | चिंतामण नारायण माडीवाले | २३ |
| २ | रामचंद्र कृष्ण देवासकर | ९ |
| ३ | व्यंकोबा देसाई | ८ |
| | | ४० |

## वर्ष ५ वे

| | | |
|---|---|---|
| १ | केशव नारायण वैद्य | २५८ |
| २ | एक अबला | १२ |
| | | २७० |

## वर्ष ६ वे

| | | |
|---|---|---|
| १ | विनायक जनार्जन करंदीकर | ३०८ |
| २ | दत्तात्रय पांडुरंग दोंदे | ४ |
| ३ | गोविंद् काशिनाथ चांदोरकर | ३ |
| | | ३१५ |

## वर्ष ७ वे

| | | |
|---|---|---|
| १ | नारायण गणेश शिरसाळकर | ५२८ |
| २ | लक्ष्मण गणेश नावेलकर | २७४ |
| ३ | चिंतामण वासुदेव कानिटकर | १८१ |
| | | ९८३ |

## वर्ष ८ वे

| | | |
|---|---|---|
| १ | नारायण कृष्ण गद्रे | २९० |
| २ | विष्णु बाबाजीराव कुलकर्णी | १२५ |
| ३ | कै. जगन्नाथ धोंडू भांगले | १०४ |
| ४ | नारायण रघुनाथ अनगळ | १०० |
| ५ | गोपाळ कृष्णाजी जाधव | १७ |
| | | ६३६ |

## वर्ष ९ वे

| | | |
|---|---|---|
| १ | कोणी एक कवि | ४९ |
| २ | आत्रेय कवि | ४१ |
| | | ९० |

## वर्ष १० वे

| | | |
|---|---|---|
| १ | कृष्णाजी पांडुरंग लिमये | २१५ |
| २ | हरी काशिनाथ मोडक | २०४ |
| ३ | नरहर शंकर रहाळकर | १७२ |
| ४ | मोरो भिकाजी आगाशे | १२३ |
| ५ | रामचंद्र कृष्ण वैद्य | ९९ |
| ६ | पुरुषोत्तम भास्कर डोंगरे | ८९ |
| ७ | कृष्णाजी केशव दामले | ७७ |
| ८ | बाळकृष्ण अनंत भिडे | ६१ |
| ९ | भास्कर रामचंद्र तांबे | ४६ |
| १० | रमाधव कवि | ४५ |
| ११ | नारायण श्रीनिवास | ४२ |
| १२ | दत्तात्रय कोंडो घाटे | ३८ |
| १३ | पुरुषोत्तम शिवराम पुसाळकर | ३५ |
| १४ | नारायण मल्हार देशमुख | २९ |
| १५ | कै. पुरुषोत्तम गोपाळ वैद्य | २८ |
| १६ | त्रिंबक अवधूत देऊळगावकर | २६ |
| १७ | सदानंद पांडुरंग करंदीकर | १५ |
| १८ | स. बा. का. | ९ |
| | | १३५३ |

## वर्ष १२ वे

| | | |
|---|---|---|
| १ | गंगाधर गोविंद दामले | १०६ |
| २ | पांडुरंग रामचंद्र नंदुरबारकर | ९८ |
| ३ | बा. सी. जोशी | ६२ |
| ४ | पांडुरंग बाळकृष्ण दडकर | ४६ |
| ५ | सदाशिव धोंडो तांबे | २८ |
| ६ | विद्यावनविहारी | २४ |
| ७ | पांढरकर | २३ |
| ८ | केशव बाबाजी न्यायाधीश | २१ |

| | | |
|---|---|---|
| ९ | यशवंत त्र्यंबक धर्माधिकारी | ९ |
| १० | विष्णु बळवंत थोरात | ६ |
| | | ४२३ |

एकूण कविता संख्या १४८१२

या परिशिष्टावरून केशवसुतांची कविता प्रसिद्ध होत होती त्या वेळी कोणकोणत्या कवींच्या कविता मासिकांची पाने विस्तारपूर्वक अडवीत असत हे जसे समजते त्याचप्रमाणे केशवसुतांनी काव्यरत्नावलीत १९०० साली ज्या चार कविता प्रसिद्ध केल्या त्यांच्याखेरीज त्या वर्षापूर्वी त्यांची जेवढी काव्ये प्रसिद्ध झाली त्यांची पद्यसंख्या किती होती हेही निःसंशय रीत्या समजते. त्यामुळे भ. श्री. पंडित यांनी संपादित केलेल्या 'समग्र केशवसुत' या कवितासंग्रहाशी हा आकडा ताडून पाहाण्याचे एक अस्सल साधन उपलब्ध झाले आहे. आणि या निर्देशाप्रमाणे ताडून पाहता पंडितांच्या हातून काव्यरत्नावलीतील कवितांची नोंद पूर्णपणे झालेली नाही असे वाटते. काव्यरत्नावलीत प्रसिद्ध झालेल्या केशवसुतांच्या कविता दुसरीकडेही प्रसिद्ध झालेल्या आहेत आणि दुसरीकडे प्रसिद्ध झालेल्या काव्यरत्नावलीतही पुन्हा प्रसिद्ध झाल्या आहेत हे खरे. तथापि पंडितांचे काव्यरत्नावलीतील प्रकाशना-बद्दलचे जे उल्लेख १९०० पूर्वीचे आहेत ते अपुरे आहेत एवढे या संख्या कोष्ठकावरून कोणालाही खात्रीपूर्वक म्हणता येईल. या खेरीज या परिशिष्टाचा तिसरा उपयोग म्हणजे यात वर्ष ९ वे येथे 'कोणी एक कवि' असा जो मोघम उल्लेख आहे तो केशवसुत विषयक आहे असे मानता येणार नाही. कृष्णाजी केशव दामले यानी 'केशवसुत' म्हणून आपली कविता छापण्यापूर्वी ते 'कोणीतरी' किंवा 'कोणी एक कवि' अशा नावाने कविता पाठवीत असत व या नावावरच्या कविता त्यांच्याच असाव्यात असे मानण्याकडे काही संशोधकांची प्रवृत्ति होते. त्या प्रवृत्तीला या यादीमुळे पाठिंबा न मिळता 'कोणी एक कवि' हा केशवसुतापेक्षा वेगळाच कोणी कवि असला पाहिजे हेही उघड दिसणारे आहे.

♧ ♧ ♧

# बाळकृष्ण अनंत भिड्यांना दिसलेले केशवसुत

केशवसुतांपेक्षा फक्त आठ वर्षांनी लहान असलेले बाळकृष्ण अनंत भिडे या शतकाच्या पहिल्या दशकांत स्वतः नव्या कवितेचे एक पाईक आणि प्रभावी समर्थक होते. केशवसुतांच्या कविता प्रसिद्ध होत असताना भिड्यांच्याही काही कविता त्याच अंकातून प्रसिद्ध झाल्या आहेत. दोहा हे वृत्त नवीन होते, निदान मोरोपंतापर्यंत तरी ते कोणी वापरले नव्हते व पुढेही ते बाजूलाच पडले होते त्याचा अंगीकार करून केशवसुतांनी जशी रचना केली तशी भिड्यांनीही त्या वेळी केली आहे. कवि म्हणून ते तेव्हा स्वतःच्या संवेदनांचा तत्कालीन काव्यप्रणालीला अनुसरून अविष्कार करीत होते, तेव्हा त्यांच्यासमोर अनेक नव्या कवींची रचना होती. या सर्व नव्या प्रेरणांचा विचारपूर्वक स्वीकार करणारी समर्थकाची भूमिका घेऊन नव्या कवितेला अधिष्ठान मिळवून देण्याचे कार्य त्यांच्या काळात त्यांनी जिद्दीने पण प्रतिष्ठितपणाने केले आहे. आजगावकरा-सारख्या टीकाकारानी नव्या कवितेवर तेव्हा जे काही गंभीर आणि काही अगदीच पोरकटपणाचे आक्षेप घेतले होते त्यांची वाजवीपेक्षा जास्त गांभीर्याने दखल घेऊन त्यांनी नवीन कवितेची तरफदारी केली. त्यांच्या या

गांभीर्याचे आज थोडेसे हसू येते. परंतु साठ वर्षांपूर्वीच्या त्या नवीनाच्या बाजूने उभ्या राहाणाऱ्या शिलेदाराचे ते गांभीर्य होते हे लक्ष्यांत घेतले व विशेषतः त्यांनी कवितेच्या स्वरूपाची चर्चा करितांना तेव्हांच्या महत्त्वाच्या इंग्रजी टीका विचारांचा परिपाक आपल्या वाचकांना उपलब्ध करून दिला व तो निव्वळ उसनवारी न करतां स्वतःची उदाहरणे व स्वतःचे आकलन यांच्या मिश्रणानें करून दिला हेही लक्ष्यांत घेतले म्हणजे हे हंसू जिरून जाते.

'काव्यदोहन' या पुस्तकाला भिड्यानी जी प्रस्तावना लिहिली आहे तिचा पहिला भाग तेव्हा थोडे नवीनच असलेले पुस्तक Judgment in Literature यातील ललितकलाविषयक विचारसरणीवर आधारलेला आहे हे सहज समजून येते. यानंतर भिड्यानी नवीन कवितेच्या वतीने लेखणी चालविली आहे. आणि अशा अर्वाचीन कवींच्या कृतींची ठळक ओळख करून देणाऱ्या काव्यदोहन या कवितासंग्रहाची तुलना परशुरामपंत तात्या यांच्या नवनीताशी त्यानी केली आहे.

अर्वाचीन कवींच्या या संग्रहात राधारमण, शि. रा. नित्सुरे, ना. धों. खांडेकर, विठ्ठल भगवंत लेंभे, परशुराम तात्या गोडबोले, बा. सी. जोशी, पांडुरंग शास्त्री पारखी, मोरो गणेश लोंढे, गणेशशास्त्री लेले, माधवराय, केशवसुत, वासुदेव वामनशास्त्री खरे, न. शं. रहाळकर, सदाशीव मोरेश्वर भिडे, पांडुरंग वेंकटेश चिंतामणि पेठकर, माधवानुज, वि. मो. महाजनी, मणि, कृ. ना. आठल्ये, कृष्णशास्त्री चिपळूणकर, चंद्रशेखर, बा. अ. भिडे, टिळक, विद्याधर वामन भिडे, श्रीपाद नारायण मुजुमदार, गं. रा. मोगरे, कार्ष्णि, बा. ल. जोशी, मार्गण, नंदुरबारकर, राजहंस, गोपाळ अनंत ओगले, ल. वि. परळकर कविता वनविहारी, द. कों. घाटे, त्र्यंबक, किरात, भा. रा. तांबे, म. मो. कुंटे, ना. ल. खांबेटे, केशव वामन पेठे, गो. गो. टिपणीस, गणेशसुत गुणे, म. ना. काळे, वा. दा. ओक, गो. वा. कानिटकर, अनंततनय, माकंद, लक्ष्मण गणेश लेले, वि. कों. ओक, ग. ज. आगाशे, दंडी, गो. ए. गोसावी, शं. प. जोशी, सुमंत, का. र. कीर्तीकर,

श्री. गणपतराव पटवर्धन, सत्यभामा, कृ. शा. राजवाडे, भा पा. पाळंदे, का. शि. मुळे, धुंडिराज गणेश बापट, आ. मो. छत्रे, ए. ग. भांडारे, ज. रा. टुल्लू, गो. कृ. जाधव, सरस्वतीरमण, म. पां. ओक, वा. आ. मोडक, इतक्या कवींच्या कविता असून त्यापैकी अनेकांच्या एकाहून अधिक आहेत. यांतील केशवसुतांच्या कविता संध्याकाळ, दिवाळी, तुतारी, थकलेल्या भटकणाराचे गाणे, व कवितेचे प्रयोजन या पांच आहेत.

काव्यदोहन हे पुस्तक १९०७ सालचे आहे. केशवसुतांच्या मृत्यूनंतर दोन वर्षांच्या आंतच या नव्या कवितेच्या 'नवनीतांत' त्यांच्या पांच कविता राधारमण व कृष्णाजी गोविंद किनरे यांनी निवडलेल्या या संग्रहांत आल्या. विशेषतः त्यांची तुतारी ही कविता या संग्रहांत आली. आणि त्यांच्या मृत्यूनंतर टिळकानी लिहिलेली भावनोत्कट बिलापिकाही यात आली. परंतु बाळकृष्ण अनंत भिडे यांना कृष्णशास्त्री राजवाडे, कृष्णशास्त्री चिपळूणकर, चिंतामणि पेठकर, म. मो. कुंटे, वि. मो. महाजनी, वासुदेवशास्त्री खरे यांच्या कविता, आणि मोगरे, लोंढे, लेंभे, चंद्रशेखर, टिळक, माधवानुज, किरात, घाटे, पाळंदे, सुमंत यांच्या कविता समोर दिसत असल्याने केशवसुतांच्या कवितातील वेगळेपण स्पष्टपणे दिसून येणे तेव्हां कठीण होते.

केशवसुतांच्या कविता संग्रहरूपाने अद्यापि अवतरल्या नव्हत्या आणि ज्या मासिकातून केशवसुतांच्या कविता येत असत, त्याच मासिकांतून त्यांच्या समकालीनांच्या कविताही येत असल्याने केशवसुतांच्या कवितांची एकूण ठेवण लक्ष्यांत यावयाला नारायण वामन टिळकांसारखा किंवा वासुदेव बळवंत पटवर्धनासारखा समानधर्मा अवश्य होता. उदाहरणार्थ, एका कवितेच्या विषयसाधर्म्याचा विचार करायचा तर भिड्यांना जे केशवसुत दिसले ते 'संध्याकाळ' ही कविता लिहिणारे. याच विषयावर लेंभे यांनी कविता लिहिली होती आणि राधारमण यानीही लिहिली होती. केशवसुतांच्या कवितेत आत्मप्रतीति आहे, स्वतःच्या भावनेचा आविष्कार आहे कदाचित् तो इंग्रजी भावकवितेपैकी सोळाव्या शतकाच्या अखेरीस शेक्सपिअर प्रभृति

जे कवि अशी रचना करीत होते त्यांच्या अनुकरणाने आलेलाही असेल–परंतु एक आत्माविष्कार उघड स्वरूपाचा आहे हे आज आपल्या लक्षात सहजपणाने येते. त्या वेळी हाच या कवितेचा विशेष वाटण्याऐवजी ‘ संध्याकाळ ’ हा विषयच काव्याला अनुकूल ठरवणे ही गोष्ट अर्वाचीनत्वाची द्योतक असल्याने राधारमण, लेंभे आणि केशवसुत यांना भिड्यांनी एकमेकांसारखे मनांतून कल्पिले असणे अगदी शक्य आहे. अशा विषयावर आधुनिक कवी लिहू लागले व त्यामुळे वासुदेवशास्त्री खरे यांची ‘ चंद्रोदय ’ ही कविता किंवा ‘मध्यरात्र’ ही कविता, लोंढ्यांची ‘ सूर्योदय ’, गणेशशास्त्री लेल्यांची ‘ प्रातःकाल ’, माधवराय यांची ‘ माध्याह्नकाळ ’ या साऱ्या कविता भिड्यांना एक-मेकांच्या जवळच्या वाटणे स्वाभाविकच होते. आणि तसे पाहिले तर केशवसुतांच्या कांही कविता तरी तत्कालीन काव्यसंकेताला अनुसरून निर्माण झालेल्या आहेत हे उघडच दिसण्यासारखे आहे. परंतु या गोष्टीचा ऊहापोह करण्यापूर्वी भिड्यांना केशवसुतांच्या कविता आणि इतर तत्कालीन कवींच्या कविता नात्याच्याच कशा वाटत होत्या हे आणखी थोड्या कवितांच्या उदाहरणाने पाहू.

किरातांची ‘ स्वप्नांत पाहिलेले शारदा मंदिर ’ ही कविता ‘ काव्य-दोहना ’त आहे. या कवितेतील भावार्थ असा की कवि एकदा स्वप्नसृष्टीत विहार करीत असताना इंद्रधनूंची तोरणे लटकली आहेत, दिव्यचंद्र झळकत आहेत अशा नगरीतील एका हर्म्यतलावर येऊन समोर दिसणाऱ्या प्रासादाच्या द्वारांत जातो, तोच भव्याकृती अशा द्वारपालांनी त्याला हटकले व या मंदिरांत निःशंक घुसणारा तू कोण. इथे सर्वांना मज्जाव आहे असे सांगितले. त्यांच्या हटकण्यामुळे भयकंपित होऊन कवी पाहातो तो ते मंदिर पृथ्वी सोडून वर गेले! आणि त्या सुंदर भुवनाच्या द्वारी एक बिंबाधरा अप्सरा आली. ती म्हणाली ‘ असा शंकित का होतोस? मी शारदा आहे. तू नवी काव्ये रच. या मंदिरांत ये. ’ म्हणून कवीने तिचे आधाराने हात धरून अंबरांत प्रवेश केला. तिने आपले मंदिर दाखवले, तेथील कविमंडलही दाखविले आणि मग ती म्हणाली, हे कवे आता सध्या तुझे येथील कार्य झाले आहे. तू

आता परतून पृथ्वीवर जा. जेव्हा तुला पात्रता येईल तेव्हा तू सुखाने मंदिरात पुन्हा ये. मंदबुद्धि कवी हे माझ्या दारचे द्वारपाल आहेत. प्रत्येकाला भिवविणे हे दानवी काम ते करतात. मात्र जे कवी दिव्य प्रतिभा असलेले आहेत ते अंबरगामी होतात आणि सरळ माझ्या मंदिरात येतात. तुला जेव्हां अशी प्रतिभा येथे आणील तेव्हां तू ये.' एवढे बोलून शारदेने मला पुन्हा पृथ्वीवर सोडले, आणि माझी ती सृष्टि भंग पावली.

या कवितेशी केशवसुतांच्या 'शब्दानो मागुते या', 'दिव्य ठिणगी' इत्यादि कवितांचे थोडेसे साम्य आहे हे कबूलच कले पाहिजे.

रहाळकरांनी केशवसुतांच्या कवितेची महती ओळखून १९०२ सालीच त्यांच्या कविता संग्रहरूपाने केव्हां रसिकांना मिळणार असे स्वतःच्या कवितेत म्हटले आहे. आणि रहाळकरांवर केशवसुतांच्या कवितेतील विषयांचा आणि भावसौंदर्याचा परिणाम आधी तरी बराच झाला आहे. याचबरोबर खुद्द रहाळकरांचाही परिणाम केशवसुतांवर थोडासा झाला असे म्हटले असता कोणाला आश्चर्य वाटू नये. केशवसुतांनी आईच्या निधनानंतर जी कविता लिहिली ती रहाळकरांच्या तशाच कारणाने आधी लिहिलेल्या कवितेच्या धर्तीवर पण अधिक आटोपशीर आहे. रूढीवर प्रहार करणारी कविता केशवसुतांनी लिहिली तशीच – फार प्रखर भासणारी नसली तरी रूढीच्या जुलुमाची व त्यामुळे होणाऱ्या नाशाची जाणीव करून देणारी कविता गणेश जनार्दन आगाशांनी तेव्हां लिहिली आहे. भृंग, फुलपाखरू, समुद्र, वारा, सह्याद्रि, हिमालय, स्वग्रामप्रीति, झरा, खेडे, प्रातःकालपासून मध्यरात्री पर्यंतच्या साऱ्या घटका, शिशिर, वसंत इत्यादि ऋतू आणि समाजजीवनांतील रूढी, सण, न्याय, अन्याय, या सर्व विषयांचा परामर्श केशवसुतांप्रमाणेच इतर तत्कालीन कवींनी आपापल्या कवितामधून आपापल्या कवित्वशक्तीप्रमाणे व मनाच्या ठेवणीप्रमाणे घेतलेला असल्याने काव्यदोहनाच्या प्रस्तावनेत कोणा एका कवीविषयी विशेषेकरून न लिहिता भिड्यांनी अर्वाचीन कवींना लागू पडणारे सर्वसामान्य

विवेचन केले. त्यांचे प्राचीन आणि अर्वाचीन कवींच्या कामगिरीचे तौलनिक मापन या प्रस्तावनेत अतिशय मार्मिक झालेले आहे यांत शंकाच नाही. "कथा लांबते म्हणून मनाला खळबळून सोडणारे व काव्यदेवतेला अत्यंत प्रिय असेही प्रसंग (प्राचीन कवींनी) त्यांनी संपुष्टांत आणले आहेत. उलटपक्षी कित्येक ठिकाणी कारण नसता नीरस गोष्टींचा पाल्हाळही केलेला आहे." हा त्यांचा अभिप्राय जितका निर्भीड आहे तितकेच अर्वाचीन कवितेचे विशेष स्वरूप सांगताना मानवस्वभाव लेखन, रसात्मक प्रसंगाची जाणीव, "सृष्टीचे स्वरूप, निरनिराळे भव्य, गंभीर, शांत, भयानक किंवा प्रेमळ असे निसर्गातील देखावे; प्रत्येक पशु, पक्षी, कीटक किंवा वनस्पती यांत रसिक अंतःकरणाला दिसून येणारे सर्वव्यापी असे गूढ तत्त्व, इतिहासप्रसिद्ध स्थळे; मनुष्यावर वारंवार कोसळणारे सुखदुःखाचे प्रसंग ह्या व अशा तोलांच्या अन्य गोष्टींनी अंःतकरणाला चलन मिळून जे उधान येते त्यांचे स्वरूप अर्वाचीन काव्यांत चमकताना दृष्टीस पडते." हा त्यांनी केलेला निर्देश त्यांच्या मर्मग्राही प्रज्ञेचा द्योतक आहे.

'काव्यदोहन' या कवितासंग्रहात अजिबात न आलेले तेव्हाचे कवि विनायक यांची केशवसुतांच्या कविताप्रकृतीशी जरी भिन्नता असली तरी भिड्यांनी केलेल्या विवेचनात विनायकांच्या कवितेचाही अंतर्भाव होतो. या कवितासंग्रहानंतर महत्त्वाचा असा दुसरा जो संग्रह प्रसिद्ध झाला तो वासुदेवराव पटवर्धनांच्या 'काव्य आणि काव्योदय' या प्रख्यात निबंधाच्या प्रकाशनाच्या वर्षीच म्हणजे १९०९ साली प्रसिद्ध झाला. या संग्रहाचे नाव अभिनव काव्यमाला भाग पहिला असे आहे. तो लक्ष्मण गणेशशास्त्री लेले यांनी संपादिला होता. याच्या प्रास्ताविक निवेदनात आणखी काही कवितासंग्रहांचे जे उल्लेख आहेत तेही जाता-जाता नमूद करणे येथे इष्ट वाटते. 'काव्यमाधुर्य' 'अर्वाचीन कविता' 'कुसुमगुच्छ' व 'काव्यदोहन' यांचा उल्लेख लक्ष्मणशास्त्र्यांनी केला आहे. यापैकी 'अर्वाचीन कविता भाग १ ला' या संग्रहाचा उल्लेख काव्यदोहनाच्या प्रस्तावनेत भिड्यांनीही केलेला आहेच. या १९०९ च्या कवितासंग्रहात केशवसुतांच्या एकूण अकरा कविता घेतलेल्या

आहेत. सतारीचे बोल, कल्पकता, भाव, मूर्ति आणि कवीचा आत्मा, रांगोळी घालताना पाहून, फुलपाखरू, थकलेल्या भटकणाराचे गाणे, कविता आणि प्रीति, भृंग, दिवस आणि रात्र, मनोहारिणी व चिरनियुक्ताचा उद्‌गार या त्या कविता होत. भिड्यांना जे केशवसुत दिसले तसेच केशवसुत या संग्रहाच्या संपादकाला दिसले असे म्हणावयास हरकतत नाही. ' काव्य आणि काव्योदय ' या आपल्या निबंधात पटवर्धनांनी केशवसुतांच्या ' समुद्र, ' ' म्हातारी ' इत्यादि कविता सर्वोत्तम ठरविल्या होत्या तरी १९०९ सालची सर्वमान्यपणे प्रतिनिधिक ठरणारी रसिकता ' म्हातारी ' किंवा ' नवा शिपाई ' किंवा ' स्फूर्ति ' या कवितांना अग्रभागी ठेवीत नव्हती हेच यावरून दिसते. इतकेच नव्हे तर १९०७ च्या संग्रहात घेतलेली ' तुतारी ' ही कविताही यावेळी लक्ष्मणशास्त्र्यांना घ्यावीशी वाटलेली दिसत नाही. ' थकलेल्या भटकणाराचे गाणे ' हे मात्र त्यातील नादबद्धतेमुळे व त्याच्या पदाच्या चालीमुळे जनमनाची पकड घेणारे ठरलेले दिसते.

१९०९ सालच्या या संग्रहात कृष्णशास्त्री चिपळूणकर, कान्होबा रणछोडदास कीर्तिकर, वि. मो. महाजनी, ग. ज. आगाशे, कोऽपि, गोविंद वासुदेव कानिटकर, विद्याधर वामन भिडे, महादेव हरी मोडक, नारायण वामन टिळक, कृष्णाजी केशव दामले, सौ. लक्ष्मीबाई टिळक, काशिनाथ हरी मोडक, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, न. चिं. केळकर, बा. अ. भिडे, दत्तात्रय कोंडो घाटे, श्रीमती हिराबाई पेडणेकर व बालकवि लक्ष्मीनंदन एवढे कवी आहेत. यातही विनायक नाही हे आश्चर्य आहे. आणि केळकर, आगाशे, कोल्हटकर, कानिटकर, भिडे इत्यादींची आता कवि म्हणून गणना करणे कदाचित् हास्यास्पद ठरेल अशी भीति वाटते; हे खरे असले तरी साठ वर्षांपूर्वी यांची कवि म्हणून असलेली ख्याती विनायकापेक्षा किंवा चंद्रशेखरापेक्षा नक्कीच अधिक होती हे पाहून रसिकतेचा आलेख बेभरवशाचा असतो असे म्हणावेच लागते. पण मुद्याची गोष्ट ती नाही. मुद्याची गोष्ट अशी कीं केशवसुतांच्या बरोबरचे हे कवी बऱ्यांच कवितांमधून केशवसुताप्रमाणेच अभिव्यक्ति करीत आहेत. केशवसुत हे आपल्या विशिष्ट

व्यक्तिमत्त्वामुळे, त्वेषामुळे, प्रगतिपर विचारसरणीमुळे अधिकाधिक बलिष्ठ ठरत गेले. पण ज्या हवेत त्यांची कविता लिहिली गेली किंवा पहिल्याने वाचली गेली ती हवा कोणत्या रीतीने भारली गेली होती याचे दर्शन घडविणारा हा एक संग्रह आहे. 'नारळीच्या झाडातील चांदणी', 'रानजाई', 'रूढिमहिमा', 'काल, कीर्ति आणि विस्मृति' 'प्रियेचे अश्रु', 'काजव्यास निमंत्रण' अशासारख्या कविता प्रत्यक्ष वाचल्या म्हणजे त्या केशवसुतांच्या असणे शक्य नाही असे खात्रीने वाटले तरी त्यांची प्रकृति केशवसुतांच्या कवितेच्या एकंदर काळाशी पूर्णपणे सुसंगत अशीच आहे. म्हणून केशवसुतांनी कवितेत क्रांति केली असे म्हणणाऱ्यांना बाळकृष्ण अनंत भिडे यांचे उत्तर 'उत्क्रांति' हे होते. केशवसुतांच्या व्यक्तिमत्वाला माधवानुज किंवा स्वतः बा. अ. भिडे यांच्या विनोदी कवितांचे पूर्णतः वावडे होते. 'आमची मांजरी' असली कविता ते लिहू इच्छित नव्हते. कवितेच्या गंभीर प्रयोजनाने सुरुवातीपासून अखेरपर्यंत ज्यांची कवित्वशक्ति भारली गेली होती अशा कवीपैकी केशवसुत होते खरे; आपली हिणकस वाटणारी कविता त्यांनी पुढे जाळून टाकली; जी काही असली कविता श्रीधरपंताकडे आधी असतांना किंवा बालवयात त्यांनी लिहिली असेल ती कवितेच्या खऱ्या उद्दिष्टाला पोषक नाही असा त्यांचा दृढ समज होता. तरीही त्यांच्या वेगळेपणाची जाणीव होण्याला दहा वर्षे जावी लागायची होती.

'झपूर्झा' कवितेचा तर या संग्रहांत कोणी विचारच केलेला नाही. काव्यदोहनाच्या टीपामध्ये एके ठिकाणी टिळकांच्या केशवसुतांवरील कवितेत हिचा उल्लेख आला म्हणून तेवढा खुलासा केला आहे. हरि नारायण आपट्यांनी तर ही कविता छापतांना 'झपूर्झा' हे काय प्रकरण आहे ते न: समजल्यामुळे 'झपूर्झा गडे झपूर्झा' ही प्रत्येक कडव्याच्या अखेरची ओळ गाळलीच होती असे कोणी तरी नमूद करून ठेवले आहे. तांब्यांनी या कवितेवर बरीच टीका करून तिच्यातील गूढ गुंजनावर १९१३ साली हल्ला चढविला होता. 'झपूर्झा' या कवितेचे रसग्रहण किंवा 'हरपले श्रेय' या कवितेचे रसग्रहण खुद्द नारायण वामन टिळकांनी आपल्या 'अभिनव काव्यमाला भाग दुसरा' यांत केले

आहे किंवा काय हे मी अद्यापि तपासू शकलेलो नाही. परंतु टिळकांच्या या संग्रहांत केशवसुतांच्या कोणत्या कविता आहेत ते जरी आज सांगता आले नाही तरी केशवसुतांच्या प्रतिभेचा हा पैलू १९२० पासून पुढे अधिकाधिक रसिकपणाने जाणवला गेला आहे असे म्हणता येईल. अभिनवकाव्य मालेचा दुसरा भाग प्रसिद्ध होण्याला बराच वेळ लागला तरी तो १९१५ च्या सुमारासच प्रसिद्ध झाला असला पाहिजे.

केशवसुतांच्या काव्याच्या ज्या प्रमुख दोन बाजू आहेत त्या 'नवा शिपाई' 'तुतारी' 'गोफण' 'स्फूर्ति' यासारख्या कवितांमधून आणि 'झपूर्झा' 'हरपले श्रेय' 'दिव्य ठिणगी' 'वातचक्र' या व या धर्तीच्या इतर कवितांमधून समजून येतात. या दोन्ही बाजूंचे रसग्रहण त्या वेळी विस्तृत प्रमाणांत होऊ शकले नाही याची कारणे केशवसुतांचे समकालीनाशी बऱ्याच बाबीत असलेले साधर्म्य, केशवसुतांनी आपल्या काव्यामधून थोड्या प्रमाणांत का होईना व्यक्त केलेली त्या वेळची प्रचलित सांकेतिकता आणि विषयांची केलेली सर्वसंमत निवड, व केशवसुताहूनही अधिक लोकप्रियता लाभलेले तेव्हाचे आधुनिक कवि यामध्ये शोधता येतील. मात्र अगदी विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून त्यांच्या कवितेची महती ओळखणारे व प्रसिद्धपणे तिची महती गाणारे निघाले आहेत. त्यांची संख्या तेव्हा थोडी असेल पण ते या कवीला श्रेष्ठ मानीत होते, शिरोधार्यसुद्धां मानीत होते. त्यांनी क्रांती केली असे ते म्हणाले नसतील पण कवितेला चैतन्य आणण्याच्या कामी, समाजातील सर्व थरांची एकात्मता साधण्याच्या कामी आणि मनुष्याला इहलोकनिष्ठ बनविण्याच्या कामी या कवींने बजावलेल्या कामगिरीचे त्यांनी गुणवर्णन केले आहे. 'काव्य आणि काव्योदय' या निबंधातील विवेचन बऱ्याच अंशाने केशवसुताच्या नवीन कवितेविषयीचेच आहे यांत मुळीच संशय नाही. आणि १९१२ च्या जानेवारीत केसरीमध्ये 'आधुनिक कवितेचे जनक' या शीर्षकाखाली बालकवि यानीही प्रामुख्याने केशवसुत व इतर आधुनिक कवि यांची तरफदारी करताना 'हरपले श्रेय' 'झपूर्झा' 'म्हातारी' 'वातचक्र' या कवितांचा मुद्दाम उल्लेख केला आहे.

'तुतारीचे पडसाद' हे केशवसुतांच्या कवितेचे रसग्रहण करणारे पुस्तक लिहिणाऱ्या श्री. वि. वर्तकानी आपल्या पुस्तकाच्या अखेरीस केशवसुतांच्या पंचवीस कविता दिल्या आहेत. त्यांत 'नवा शिपाई' ही कविता घेतलेली नसली तरी 'नैर्ऋत्येकडील वारा,' 'एक खेडे' 'सृष्टि आणि कवि' 'गोष्टी घराकडील' 'वातचक्र' 'फुलपांखरू' 'म्हातारी' 'घुबड' 'भृंग' 'पुष्पाप्रत' 'सतारीचे बोल' 'झपूर्झा' 'हरपले श्रेय' 'रूढि-सृष्टि-कलि' 'मूर्तिभंजन' 'तुतारी' 'आम्ही कोण?' 'स्फूर्ति' 'पद्यपंक्ति' 'गोफण' 'प्रीति' 'समृद्धि आणि प्रीति' 'माझा अंत' 'रुष्ट सुंदरीस' व 'मनोहारिणी' या कविता निवडल्या आहेत. यांत 'थकलेल्या भटकणाराचे गाणे' ही कविता घेतलेली नाही. 'नवा शिपाई' या कवितेचे विवेचन थोडेसे तरी वर्तकानी आपल्या पुस्तकांत केलेले आहे. परंतु 'थकलेल्या भटकणाराचे गाणे' या कवितेचे विवेचनही त्यांनी केलेले नाही. त्यांच्या विवेचनांत 'मजुरावर उपासमारीची पाळी' 'आगबोटीच्या कांठाशी' 'शब्दांनो मागुते या' 'कल्पकता' इत्यादींचे रसात्मक विवेचनही आहे. 'हरपले श्रेय' या कवितेचे वर्तकानी केलेले विश्लेषण आता तरी थोडेसे कृत्रिम व ओढाताण करणारे वाटले तरी भिड्यांच्या दृष्टीहून वेगळी दृष्टि या विवेचनात स्पष्टपणाने प्रतीत होते. केशवसुतांच्या एकविसाव्या पुण्यतिथीपर्यंत नवीन रसग्रहणाची दिशा निश्चित व्हायची होती, हाच याचा अर्थ होतो. ती दिशा त्या आधीच्या महत्त्वाच्या टीकालेखांनी बरीचशी सूचित केली होती; तरीही भिडे ते वर्तक असा या रसग्रहणाचा एक कालखंड होऊ शकतो.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम .................... दि: ....................
क्रमांक .................... नों. दि. ....................

♧ ♧ ♧

# केशवसुतांचे व्यक्तिमत्त्व

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम........................ दि: ....................
क्रमांक ........................ नों दि: ....................

आचार्य भागवत यांनी १९४८ साली मुंबईत केशवसुतांवर काही व्याख्याने दिली त्यांचा विस्तृत गोषवारा त्या वर्षीच्या सत्यकथा या मासिकाच्या फेब्रुवारी अंकांत दिला आहे. त्यांत एके ठिकाणी असे म्हटल्याचे नमूद आहे की, केशवसुत प्रचलित अर्थाने देव मानणारे नव्हते; एकदा तर ते नास्तिकतेच्या पराकोटीला जाऊन महादेवाच्या पिंडीवर नाचले होते असे म्हणतात. केशवसुतांच्या कविता वाचणाऱ्याने त्यांच्या हृदयांत जे तांडव तेव्हा निर्माण झाले होते, जी घरघोर मानसिक द्वंद्वे त्यांना खेळावी लागली होती, तत्कालीन समाजाच्या अग्रभागी असणाऱ्यांना तेव्हा ज्या विचारमंथनातून वाट काढावी लागली होती आणि वादळांचे तडाखे सोसावे लागले होते त्यांची योग्य जाणीव ठेवल्याखेरीज त्या कविता किंवा त्या कवितांचा कवी यांचा उलगडा होणार नाही. देव आहे असे सवंगपणाने मानणे किंवा देव नाही असेही तितक्याच सवंगपणाने बोलणे हे आजच्या आपल्या उथळ व निर्लेप आणि संवेदनाशून्य मनोवृत्तीला सोपे वाटले तरी; किंबहुना, त्या प्रश्नाचे गांभीर्यच आजच्या बधिर मनोवृत्तीला प्रतीत होण्याचे थांबले असले तरी केशवसुतांचा काळ हा रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, मलबारी शेट, रानडे, भांडारकर, दयानंद, देवधर व देवधरांच्या सुधारकी

मतासाठी त्यांना लोखंडीच्या सळीने मारणाऱ्या व रँडचा खून करणाऱ्या चाफेकरांचा काळ होता हे ध्यानी आणले पाहिजे.

केशवसुत देव मानणारे नव्हते असा याचा अर्थ होत नाही. त्यांच्या कवितेमधून एका ठिकाणी देवाचा धावा केला गेला आहे तर दुसऱ्या ठिकाणी कर्तव्यनिष्ठ माणसाला उद्देशून ईश्वर तुझ्या द्वाराने तुझ्या मागून इतरांना सुफले देईल, तूं मात्र भली कृत्ये करण्यांत दिवसभर दंग रहा व श्रमाने थकून गेल्यावर धरणीवर विश्रांतीसाठी अंग टेक असे म्हटले आहे. परंतु इंग्रजी शिक्षणाच्या परिणामामुळे ईश्वराविषयीची रूढ कल्पना त्यांच्या कवितेत बदललेली आढळते. सृष्टीची महती, अज्ञेयाची सगुण व साकार अशा ईश्वर तत्त्वाऐवजी केलेली योजना, परिपूर्ण व दोषरहित अशा स्वर्गकल्पनेचे आकर्षण, बाल्यांतील निरागसतेची कल्पना यावरून त्यांच्या इंग्रजी वळणाची साक्ष सहजच पटते. आणि समकालीन कवीहून ते व टिळक निराळे वाटतातच. येथे जो त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विचार करावयाचा आहे तो निव्वळ एवढ्याच सृष्टी किंवा ईश्वरविषयक विचारसरणी संबंधींचा नसून आणखी काही दृष्टींनी करावयाचा आहे.

आगरकर आणि केशवसुत यांच्या गुरुशिष्य नात्यामुळे निर्माण झालेल्या समान विचारसरणीबद्दल कांही वेळा ठोकळ स्वरुपाचे लेखन झाले आहे. तथापि आगरकर आणि केशवसुत यांच्यात देवकल्पना आणि स्त्री सुधारणा या दोन बाबीत बरीच तफावत आहे हे आपल्या चटकन् ध्यानी येत नाही. आगरकर अर्थातच मोठे विचारवंत, श्रेष्ठ पदवीपर्यंतचे शिक्षण संपवितांना अनेक विचारसरणीतील मथितार्थ समजून घेतलेले व वेगवेगळे सिद्धांत पचविलेले सुधारक तर केशवसुत त्या मानाने पांडित्यहीन; स्वाभाविकच देव मानणे आणि न मानणे या दोन बाजूंतील गुणावगुणाधिष्ठित फरक आगरकराएवढा केशवसुताकडून अपेक्षिला जाणे योग्य नव्हे. आणखीही एक महत्त्वाचे कारण असे की, केशवसुत हे कवी तर आगरकर हे तर्कसंगतीच्या आधारे युक्तिवाद करणारे गद्यलेखक व विचारवंत. कवीकडून युक्तिवाद, पूर्वपक्ष-उत्तरपक्ष ही अपेक्षिली जात नाहीत. इतकेच नव्हे तर एका कवितेत

एक मनोभूमिका तर दुसऱ्या कवितेत त्या मनोभूमिकेशी विरोधी वा विसंगत अशी मनोभूमिका आढळणे हे काव्याच्या स्वरूपाशी सुसंगतच आहे. कविता किंवा ललितलेखन म्हणजे हृदयतरंगांचे आविष्करण होय. हार्डीने तर कादंबरीलेखन म्हणजे लेखकांच्या भावनांचे प्रतिबिंब आहे, ते तार्किक समर्थन नव्हे असे आपल्या सुप्रसिद्ध 'टेस्' या कादंबरीच्या छोट्या प्रस्तावनेतच म्हटले आहे. अगदी थोडे कवी असे असतात की त्यांच्या श्रद्धा दृढ स्वरूपाच्या, एका विशिष्ट वळणाच्या व एका संप्रदायसरणीच्या बनलेल्या असतात. डॅन्टीसारखे वा रामदासासारखे हे कवी निराळे. भावकविता लिहिणारे अनेक कवी त्या त्या क्षणी ज्या चित्तक्षोभाचे किंवा प्रसन्न मनोवृत्तीचे चित्रण करतील त्या चित्रणातील आविष्कार कलापूर्ण व प्रतीती निर्माण करणारा आहे किंवा नाही हेच तेवढे पहावयाचे असते. म्हणून केशवसुतांच्या कवितेतील देवविषयक कल्पना आगरकर पठडीशी सर्वांशाने जुळणारी असलीच पाहिजे अशी अपेक्षाही कटाक्षाने बाळगणे योग्य नाही. स्थूलमानाने ती तशी केव्हा केव्हा आढळते एवढेच आपणास दिसते.

यापेक्षाही केशवसुत आणि आगरकर यांच्या मनोधारणेत मोठा फरक आढळतो तो त्यांच्या स्त्रीविषयक दृष्टिकोनात. आगरकरांची स्त्रीसुधारणा ही व्यावहारिक सुधारकाची आहे. केशवसुतांची दृष्टी शिलेदाराने दाखवावयाच्या स्त्रीदाक्षिण्याची व स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीचे स्थान देण्याची आहे. आगरकर स्त्रीला स्वावलंबी बनवण्याचा ध्यास धरतात तर केशवसुत स्त्रीच्या सन्मानाची जपणूक पुरुषाने निर्धाराने केली पाहिजे असा ध्यास घेतात. 'पण लक्ष्यांत कोण घेतो'च्या कर्त्यास त्यानी युरोपांतील इतर राऊताप्रमाणे एक राऊत कल्पिलेला आहे. आगबोटीच्या काठावर उभ्या असलेल्या तरुणीस उद्देशून लिहिलेल्या कवितेतील गाळलेल्या ओळी व इतर नेहमी छापल्या जाणाऱ्या ओळी यामध्येही त्यांची हीच भावना दृष्टीस येते. रांगोळी घालणारी मुलगी ही स्वर्ग आणि पृथ्वी यांतील मांगल्याचे नाते सुरक्षित ठेवते अशी त्यांची धारणा आहे. स्त्रीसुधारणेची व्यावहारिक बाजू कवी काव्यमय रीतीने मांडू शकणार नाही हे अर्थातच या ठिकाणी आपण गृहीतही धरले पाहिजे. जोगांच्यासारखे काही टीकाकार

केशवसुतांनी सामाजिक क्रान्ति घडवून आणलेली नाही असे सांगताना म्हणतात की, "आगरकरांनी ज्याप्रमाणे वेषभूषा, मरणोत्तर आचार व क्रिया, प्रियाराधन, घटस्फोट, स्त्रीशिक्षण, केशवपन, विधवाविवाह इत्यादि विचारांबाबत नेमके इष्टानिष्टत्वाचे प्रतिपादन केले आहे, तसे केल्याशिवाय नुसत्या रुढीविरुद्ध बंडाला वाचकाच्या दृष्टीने निश्चित अर्थच येऊं शकत नाही व तो न आल्यास या क्रांतिप्रवचनाने क्रांति घडवून आणली हे म्हणणेहि निश्चितार्थक होऊ शकत नाही." वास्तविक जोग हे ओळखून असावेत की कविता हे प्रवचन नव्हे. ती प्रथम कविता असली पाहिजे व ती पुढील पिढ्यांनाही कविताच वाटली पाहिजे. या दृष्टीने केशवसुत कवितेच्या अस्सल स्वरूपाची जाणीव असणारे कवी होते हे त्यांनी तुतारी मधील असल्या तपशिलांची जी कडवी आधी लिहिलेली होती ती पुढील-वेळी गाळून टाकली यावरुन स्पष्ट होते. सुधारणेचा तपशील कवितेत देण्यात काहीच हशील नाही. म्हणून स्त्रीसुधारणा या विषयासंबंधी केशवसुतांनीं आगरकरांच्या किंवा आपट्यांच्या विचारांचा अंगीकार केला तरी घटस्फोट आणि केशवपन व इतर बाबी याबद्दल त्यांनी कविता लिहावयास पाहिजे होत्या असे कोणीही सुबुद्ध इसम म्हणणार नाही. मात्र त्यांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन आणि आगरकरांचा दृष्टिकोन यात फार तफावत आहे हे मात्र ध्यानी घेणे जरूर आहे. एक प्रेमिक, एक शिलेदार, एक पूजक, एक भक्त, एक याचक अशा स्वरूपांत हा कवी पुष्कळदा स्त्रीकडे पाहातो. कवितेत कदाचित् हीच भूमिका घेणे अपरिहार्यही असेल. इतर भूमिका घेणे काव्यहानी करणारे होईल अशी सांकेतिक समजतही असेल. काही कवींनी प्रेमाविष्कार करीत असताना अधिक व्यवहारी भूमिका, बौद्धिक समानतेची भूमिका प्रगट केली आहे. जीवनातील वास्तवाची जाणीव ठेवून या भूमिकेचे प्रकटीकरण करणे अशक्य नाही. तथापि केशवसुतांमध्ये आणि आगरकरांमध्ये हा फरक मोठा आहे हे नजरेतून सुटू नये.

केशवसुतांच्या व्यक्तिमत्त्वाची यातूनच दृग्गोचर होणारी आणखी एक बाजू म्हणजे त्यांच्या प्रेमाची तऱ्हा. ही तऱ्हा धीटपणाची, उघडपणाची आणि प्रसंगी उद्दामपणाचीही आहे. काले आणिक कष्टदशेने ।

क्षीणत्वाला होते जाणे । सगळ्यांचेही, परी प्रीतीचा । जोम वाढतो उलटा साचा! — अशी या कवीची स्थिती आहे. प्रणयकथन या कवितेत तर तीनचार वेळा व्यवहारी शहाणपण गुंडाळून ठेवून, सूज्ञपणाला झुगारून देऊन, लौकिक रीती बाजूला सारून प्रियेने आपल्याला जिवलग म्हणावे असे एक प्रेमिक म्हणतो. ‘समृद्धी आणि प्रीती’ या कवितेतही अशीच उघड अभिव्यक्ती आढळते. आणि स्फुट रचनेच्या लहान लहान कवितांमधून तर अगदी स्पष्टपणे ही उत्तानता प्रत्ययाला येते. या सर्व कविता ‘स्फुट’ अशा शीर्षकाखाली दिल्या आहेत. संस्कृत कवितेत अशा उत्तानतेच्या भराऱ्या बऱ्याच आहेत. त्यांचा परिणाम म्हणा किंवा केशवसुतांच्या व्यक्तिमत्त्वाची एक बाजू म्हणून म्हणा, परंतु या कामुक आणि शृंगारिक उघडपणाची प्रतीती येथे आपणांस येते. ‘बायानी धरुनी बळे’ ही आजपर्यंत असंग्रहित राहिलेली १८८७ मधील कविता विशेषत्वाने हे दाखविते.

ज्या ज्या महत्त्वाच्या विवेचकांनी केशवसुतांवर लिहिले आहे त्यांनी त्यांच्या इहलोकनिष्ठेवर लिहिलेले आहेच. एवढेच नव्हे तर आजच्या कवितेचा उहापोह करताना त्या कवितेची वैशिष्ट्ये सांगणारेही केशवसुतापासून सुरुवात करून म्हणतात की, ‘मराठीत त्यांनी आत्मलेखनपर भावगीते व इहलोकनिष्ठा हे दोन मुख्य विशेष आणले.’ ही इहलोकनिष्ठा ‘विद्यार्थ्यांप्रत’ आणि ‘उत्तेजनाचे दोन शब्द’ या कवितेत सरळच मांडलेली आहे. ‘मूर्तिभंजन’ या कवितेत ती वेगळ्या रीतीने व्यक्त होते. ‘तुतारी’ अशा ओजस्वी इहलोकनिष्ठेचे उत्कृष्ट उदाहरण ठरेल. ‘फुकट दवडलेला तास’, ‘कवितेचे प्रयोजन’ ‘समृद्धी आजि प्रीती’ ‘जगामध्ये या तुला कशाला परमेशे धाडिले!’ इत्यादि अनेक कवितांतूनही प्रवृत्तिमार्गावरील निष्ठा आणि पृथ्वीलाच स्वर्ग समजून कर्तव्य करत राहाण्याची, इहलोकांतील सौंदर्य, उपभोग, देशसेवा यात निमग्न होण्याची वृत्ती दिसते काही कवितांमधून स्वर्ग आता पृथ्वीपासून दूर गेल्याबद्दल हळहळ जशी प्रगट झाली आहे तशी काहीमधून पृथ्वीला सुरलोकसाम्य आणण्यासाठी झटण्याची प्रतिज्ञाही घोषित केली गेलेली आहे.

या अंगाबरोबरच केशवसुतांच्या व्यक्तिमत्त्वातील जगरहाटीच्या यथायोग्य जाणिवेचे आकलन हेही अभ्यासण्यासारखे आणखी एक अंग होय. ध्येयवेडा, स्वर्गसमक्षतेसाठी हपापलेला, प्रीतिसाफल्यासाठी सूज्ञपणा झुगारून देणारा असा जरी हा कवी असला तरी त्याला जगाच्या व्यवहारांची, दैनंदिन कार्याची, गर्दीची, जबाबदाऱ्यांची व धडपडींची जाणीव आहे. नीच लोकांपुढे नमल्याखेरीज गर्दीच्या आणि दाटीवाटीच्या जगांत आपला मार्ग निघणार नाही हे 'एक खेडें' यांत एका ठिकाणी ध्वनित केले आहे. वास्तविक जग कसे आहे हे मला पुरे माहीत असूनही, जर मी एका खेड्यांत तिथल्या लहानशाच गरजा पुऱ्या करून समाधानाने राहू शकेन तर येणाऱ्या पाहुण्याला विस्मयाने विचारीन,--

'असे जग तें एवढें का अफाट !
त्यांत इतुका का असे थाटमाट !'

जगांत शहाणपण कशाला म्हणतात ते स्फुट रचनेतील एका लहानशा कवितेत केशवसुतांनी अत्यंत भेदक अशा उपरोधाने वर्णिलेले आहे.

स्वयें भयापासुनि पळणें,
भयसमयीं साहस करिती
त्यां अपजय येतां हंसणे,—
हे विकत असे या जगतीं —
शहाणपण या नांवानें !

लग्नमंडपांतील थाट चालतो, भोजन, वादन, नर्तन, गान चालू असते त्या वेळी काळ मात्र ओटीवर हळू बोलत असतो की, 'आला क्षण–गेला क्षण !' गुलाबाच्या कळीला निष्ठुर मुलगा खुडणारच हेही त्या कवीला स्वच्छ दिसते. निद्रामग्न मुलगी आज जरी स्मित करीत असली तरी संसारातील दुःखानें तिचे स्मित काळवंडणार हेही कवीला खुपत आहे. प्रबल राष्ट्रे दुसऱ्या राष्ट्रांतील संपत्ती बळाच्या जोरावर लुटण्यासाठी आपली जहाजे पाठविणारच, गुलामांचा व्यापारही अशा निर्घृण जगात चालणार, याची दाहक जाणीव या कवीला आहे. भिक्षुकाला दक्षिणा घेताना अत्यंत हर्ष होतो, मद्यपी बेहोष होऊन मद्याचे सेवन करतो, याचेही दाखले केशवसुतांच्या

कवितेत आढळतात. 'पर्जन्याप्रत' या कवितेत तर सृष्टीचे पर्जन्य काळाच्या सुरुवातीचे वर्णन फार बारकाईच्या अवलोकनाची साक्ष देणारे आहे. 'खाणावळीतील घृतधारा' ही अशा जगरहाटीच्या जाणिवेची एक खुमासदार कविता आहे. 'झपूर्झा' या कवितेत देखील या व्यवहार-ज्ञानाचा दाखला एका कडव्यात आढळतो. ते कडवे 'सनदी शेतकऱ्या'चा संदर्भ देणारे आहे. 'दिवस आणि रात्र' या कवितेतील 'स्पर्धा लावी दिवस जनी,' किंवा दिवसाच्या वदनांत केवळ गद्यच असते या उल्लेखां-वरून दुसराही कोणता निष्कर्ष निघण्यासारखा असला तरी केशवसुतांच्या व्यवहारी जगाच्या ज्ञानाचे ते सूचक आहेत. 'पद्यपंक्ति' कवितेतील एक चार ओळींचा चुटका असा आहे,

> जे शिकलो शाळेमाजी,
> अध्याहृत ही टीप तया—
> "द्वितीय पुरुषी हे योजीं,
> प्रथम पुरुष तो सोडुनियां !"

आजच्या जगात कुणी शाप दिला तरी तो निष्प्रभ ठरतो, कुणी आशीर्वाद दिला तरी तो तारक ठरत नाही हे या कवीला पक्के ठाऊक आहे. 'दिवाळी' या कवितेतील विस्तृत वर्णनाची निराळी आठवण वाचकांना करून देणे केशवसुतांच्या या संसारविषयक ज्ञानाचे अंग दर्शविणाऱ्या व्यक्तिमत्त्वाच्या दृष्टीने आवश्यक नाही असे वाटते. 'गोफण' हे रूपकच मुळी उत्कृष्टपणे केशवसुतांनी वाढवीत नेले असून ती वळणे, तिला पीळ भरणे, आणि तिच्यातून धोंड्यांची हाणाहाण करणे यासाठी गोफणीचे ज्ञान जेवढे आवश्यक आहे त्याहून कितीतरी पटीने अधिक असे थप्पड बसता गाल चोळीत बसणाऱ्यांचे, पूर्वीच्या आर्यांचा बडिवार सांगणाऱ्यांचे, वैऱ्यांच्या पायधुळीत लोळून प्राप्त तूपपोळीतच कृतार्थ होणाऱ्यांचे, तोंऱ्यांतच बडबडणाऱ्यांचे आणि जगातील अशाच इतर आळसात लोळणाऱ्यांचे ज्ञान त्यांच्या विषयींची चीड प्रकट होण्यासाठी आवश्यक आहे. हरपले श्रेय धुंडणारा, ध्यास तोच भास असे वेड असणारा हा कवी जगाची रीत पूर्ण जाणून होता असेच यावरून दिसते.

रसिकता, इतर ललितकलांचे ज्ञान, तासच्या तास एकलेपणाने केलेले चिंतन, तेजाची पूजा, निःसंगपणा, मित्रांविषयींचा आणि स्वजना-विषयींचा कमालीचा जिव्हाळा, छोट्या ‘मी’चे कुंपण तोडून सर्वांना भुावंडे लेखण्याची हृदयाची विशालता, निसर्गप्रेम, साधेपणाचे पूजन, अन्यायाच्या प्रतिकाराची शिकवण, कर्तव्यप्रेम या इतर कित्येक गोष्टी अशाच विस्ताराने मांडण्यासारख्या आहेत.

◆ ◆ ◆

# केशवसुतांच्या कवित्वाची कांही वैशिष्ट्ये

'सुषमा' दिवाळी अंकाच्या (१९५५) एका लेखात सुप्रसिद्ध कवी व टीकाकार वा. ना. देशपांडे यांनी 'केशवसुत–कल्पित कथांचे निर्माते' हे केशवसुतांच्या प्रतिभेचे एक नवे अंग वाचकांच्या नजरेस आणून देण्याचा यत्न केला आहे. कल्पित कथा म्हणजे इंग्रजीत ज्याला Myth म्हणतात ती. असा खुलासा करून त्यांनी Rilke च्या सुनीतमालेपैकी एका सुनीतात Lamentation या अगोचर मनोभावनेला समूर्त करण्यांत Rilke ने Myth चा प्रभावी वापर केला असल्याचा अभिप्राय ज्या टीकाकाराने व्यक्त केला आहे त्याचाही निर्देश केला आहे. वा. ना. देशपांड्यांचा हा लेख पुढे १९५६ साली 'केशवसुत–स्मृतिग्रंथ' या पुस्तकातही घेण्यात आला आहे. परंतु नवा दृष्टिकोन अंगिकारून केलेली ही रसिकपणाची टीका पृष्ठस्पर्शी वाटते. केशवसुतांच्या कवित्वाची वैशिष्ठ्ये नजरेत येतात त्यापैकी हे वैशिष्ठ्य खऱ्या अर्थाने भासत नाही. देशपांड्यांनी केशवसुतांच्या अकरा कविता निवडल्या आहेत. त्यात 'दिव्य ठिणगी', 'कल्पकता', 'शब्दांनो मागुते या', 'चिन्हीकरण', 'क्षणात नाहीसे होणारे दिव्यभास', 'तहान आणि भूक' यांचा समावेश आहे.

Myth या शब्दाचा कोशांतील अर्थही देशपांड्यांनी दिला आहे व आपले म्हणणे अस्थानी नाही असे सुचविले आहे. परंतु Myth या

कल्पनेचा अर्थ व्यापक, आशयघन आणि प्राक्कालीन स्वरूपाचा आहे. Myth शब्दाची कल्पना स्पष्ट व्हावी म्हणून एक लहानसेच इंग्रजी अवतरण देतो.

"This is an art alongside and included within poetry (the two fields overlap), an art with a special assumption as regards its subject matter. A particular kind of material determines the art of mythology, an immemorial and traditional body of material contained in tales about Gods and god-like beings, heroic battles and journeys to the Underworld–mythologems is the best Greek word for them–tales already well-known but not unamenable to further reshaping. Mythology is the *movement* of this material, it is something solid and yet mobile, substantial and yet not static, capable of transformation ... (quoted in *Harvest of Tragedy* p. 80-81).

**T. R. Henn** – (Methuen)

या कल्पनाविस्तारावरून कोणाच्याही ध्यानी येणाऱ्या Myth मधील आवश्यक घटकांची मालिका अशी होईल: प्राक्कालीनत्व, परंपरागत अर्थवाहित्व, देव वा देवसदृश कोटीतील लोकांविषयी संबद्धता, वीरकथाधिष्ठितता आणि सर्वपरिचितता व नवनवीन रीतीने पुनर्रचना करण्याची क्षमता. याखेरीज युंग यानी Collective Unconscious किंवा येटस् यांनी 'Great Memory' या संज्ञा वापरून Myth शब्दाचा जो अर्थविस्तार करून दाखविला आहे किंवा वांशिक इतिहासाच्या आधाराने मनाची सुप्त महाद्वारे उघडून दाखविली आहेत त्यांचा विचार वेगळाच. या संदर्भात केशवसुतांच्या कवितांमधून

पूर्व संचिताचा उपयोग करणाऱ्या प्राक्कालीन अर्थमालिकांचा आढळ होतो असे म्हणणे फारसे पटण्याजोगे वाटत नाही.

वा. ना. देशपांडे हे स्वतः कवी आहेत व त्यांनी आपल्या कांही कवितांमधून कल्पित कथांचा वापर फार समर्पकपणे केलेला आहे. अशा कविसमीक्षकाला केशवसुतांच्या कल्पनावैभवाचा व तीव्र भावनावेगातून स्फुरलेल्या कवितांचा विचार करतांना ही मीमांसा करावीशी वाटली तर ते साहजिक आहे हे मात्र कबूल केले पाहिजे. केशवसुतानीच असा कल्पित कथांचा वापर प्रथम केला हे धाष्टर्याचे विधान मी करू इच्छित नाही असेही ते सावधगिरीने म्हणतात ते योग्यच आहे. कारण केशवसुतांच्या समकालीन व त्यांच्या थोड्याशा आधी होऊन गेलेल्या कवींनीही अशा कल्पित कथांचा वापर आपल्या कवितांत केलेला आहे हे त्या कविता वाचल्यास कुणालाही दिसेलच. किरात, माधवानुज, इतकेच नव्हे तर कदाचित् कवि चंद्रशेखर यांचेही नाव या संदर्भात आठवण्यासारखे आहे. नमुन्यासाठी माधवानुजांची 'काल, कीर्ति आणि विस्मृति' ही अभिनव काव्यमाला भाग १ ला यात प्रसिद्ध झालेली कविता खाली देतो --

> माते भव्य अशी इमारत पुढे विच्छिन्न झाली दिसे;
> कोणाच्या करण्या चिरंतन यशा ही बांधियेली असे ?
> काला प्रश्न विचारिला, मज परी देतां न तो उत्तरा
> गेला पंख उभारुनी उडुनिया व्योमी करोनी त्वरा !
> व्हावे स्मारक हे म्हणोनि कवणे प्रासाद हा बांधिला ?
> केला प्रश्न असा फिरोनि, बघुनी मार्गी उभी कीर्तिला;
> माझा प्रश्न तिने जसा परिसिला, दुःखी बुडाली सती,
> वेगे निश्वसुनी बघे निज मनी लाजूनी ती खालती !
> गेलो चालत मी तसाच पुढती तो देखिली विस्मृति
> प्रासादावर एकली विहरतां स्वच्छंद गर्वे अती;
> केला प्रश्न तिला न जो मज करी ती सत्वरा उत्तरा
> पूर्वी बांधियला कुणास्तव असो हा आज माझा खरा !

केशवसुतांच्या 'फुकट दवडलेला तास' 'चिन्हीकरण', 'सृष्टि, तत्व आणि दिव्यदृष्टि' इत्यादि ज्या कवितांचा निर्देश वा. ना. देशपांड्यांनी या संदर्भात केला आहे त्या माधवानुजांच्या या कविते सारख्याच आहेत. त्यांच्या आशयाचा विचार येथे साम्य दाखवितांना अभिप्रेत नाही हे निराळे सांगावयास नकोच.

थोडक्यांत म्हणजे Myth-maker म्हणून केशवसुतांच्या कवित्वाचे वैशिष्ठ्य शोधण्याची दिशा आकर्षक असली तरी जास्त कांही हाती लागू देणारी नाही.

कोणत्याही महत्त्वाच्या कवीच्या अंगी प्रतिमा सार्थतेने आणि अनेक संदर्भ सूचकतेने वापरण्याची शक्ती असते हे मान्य होण्यास हरकत असू नये. केशवसुतांच्या अंगी ही प्रतिमांची योजना करण्याची शक्ति मुळांत जेवढी होती तेवढीच न राहातां उत्तरोत्तर ती विकसित होत गेलेली दिसते. मुळांत ती होती हे 'दुर्मुखलेला' या कवितेतील 'मुंग्या' 'राखेची ढिपळे' आणि वाङ्निष्यन्द' या प्रतिमावरून सहजच दिसते. तिचे विकसित रूप 'गोफण' या कवितेत जसे प्रत्ययाला येते तसेच स्वतःला 'शिपाई' म्हणवून घेण्यात किंवा आपण एक तुतारी फुंकीत आहोत असे आवेशाने म्हणण्यातही दिसते. ही प्रतिमानिर्मिती हे सृजनशील प्रतिभेचे लक्षणच्च आहे. केशवसुतांच्या ज्या अकरा कविता वा. ना. देशपांड्यांनी वेचल्या व त्यातील कल्पित कथांकडे रसिकांचे लक्ष्य वेधण्याचा यत्न केला आहे त्यांच्यातही प्रतिमानिर्मिती आहे आणि ती स्पृहणीय रीतीने समाधानकारक झाली आहे असे फार तर म्हणावे.

मग केशवसुतांचे कवित्ववैशिष्ठ्य कशात आहे?

ते माझ्या मताने चार गोष्टीत आढळते. त्या नमूद करावयाच्या झाल्यास मूर्तिकरण साधताना मनाची उड्डाणझेप; विरोधी कल्पनांचा वा विरोधी स्थितीचा अवलंब; बौद्धिक विलासाचे मिश्रण; आणि भ्रमिष्ट अवस्थेचा साक्षात्कार असा त्यांचा उल्लेख करता येईल. याखेरीज शास्त्रीय ज्ञानाचा काव्यात्मक वापर हेही त्यांच्या कवित्वाचे पाचवे वैशिष्ठ्य नोंदण्यासारखे आहे.

त्यांच्या उड्डाणझेपेचा प्रत्यय वाचकाला त्वरित येतो. 'गोष्टी घराकडील' ही कविता घ्या. या कवितेत कवी म्हणतो की, मी घराकडील गोष्टी बोलू लागलो तोच विपरीत घडले आणि मी घरातच आहे असा भ्रम मनास होऊन इथल्या सगळ्या वस्तु याच भासमय झाल्या. त्या इतक्या त्वरेने की दुसऱ्या कडव्यापासूनच ही पडवीतली म्हैस, पलीकडच्या शेतभातातून ओरडणारे बेडूक, टकटका करणारे ओसरीचे घड्याळ, डाव्या बाजूचा माचा, त्यावर निजलेले आपले वडील, त्यांच्या कुशीत झोपलेला या 'आप्पा'चा धाकटा बंधू बापू– अतिशय जलद अशा मनोगतीने कवीच्या पुढे ठाकतात. इतर कवींना असा परोक्षाला सजीव करण्याचा यत्न हळुहळु साधतो परंतु केशवसुतांच्या बाबतीत 'असत्याचे नसते होणे' व 'नसत्याचे असते होणे' ही जी कवित्वाची महत्त्वाची खूण तिची साक्ष झटकन् येते. वासुदेव बळवंत पटवर्धन यांनी प्रतिभा म्हणजे काय या विवेचनात हेच शब्द वापरलेले आहेत. प्रत्ययकारी मूर्तिकरण त्वरेने साधण्याचा हा वरदहस्त केशवसुतावर निःसंशय शारदेने ठेवला होता.

अमूर्ताला गोचर करणे ( To give a local habitation and a name to ariy nothings ) हे कोणाही प्रतिभावंतांचे कार्य असतेच. परंतु ते अगदी थोड्या अवधीत आणि तरीही अतिशय प्रत्ययकारी रीतीने करणे व मानवी भावनांची उत्कटता, अनावरता, खळबळ आणि हृदयाचे कल्लोळ गडद तऱ्हेने चित्रित करणे हे केशवसुतांचे वैशिष्ट्य आहे. देवयानीची प्रीतिभावना असो किंवा स्वतःच्या मनाला जाचणारी उद्विग्नता असो ती तीव्रतेने त्यांनी मांडलेली आहे. पुण्यास शिकायला राहिल्यानंतर सोसाव्या लागणाऱ्या विरहव्यथेचे चित्रणही त्यांनी अशाच व्याकुळतेने केले आहे. पत्नीला देखील असाच उत्कट विरह जाणवत असेल हेही या कविमनाच्या प्रत्ययास येते. या आठवणीचा परिणाम म्हणजे कवि पुण्यांत असून देखील आपल्या अंकावर आपली पत्नी बसली आहे असे मानतो व जणू तिचे अश्रू आपल्या वक्षावर पडत आहेत अशीच त्याची भावना होते. या कविमनाची घडणच अशी आहे की, उद्विग्न मनःस्थितीत सतारीचे बोल कानी पडताच त्वेषाने ती सतार

फोडून टाकावी असे त्याला वाटते. आणि पुढे ती मनःस्थिती हळूहळू पालटल्यावर स्वतःच्या अस्तित्वाचाही विसर पडतो.

'तो मज गमले विभूति माझी
स्फुरत पसरली विश्वामाजी ;
दिक्कालासहि अतीत झालो ;
उगमी विलयी अनन्त उरलो;
विसरुनि गेलो अखिलां भेदां
ऐकत असतां दिड दा, दिड दा !'

या अनावर मनोगतीच्या रेखाटणासाठी काही वेळा शब्द अपुरे पडले किंवा खडबडीत शब्दांची योजना होत गेली, कठीण शब्दांच्या धोंड्यांची हाणाहाण करावी लागली तरी या उत्कटतेला आणि गतिमानतेला कवितेत अतिशय महत्त्व आहे. मूर्तिभंजन करण्याला हात एकदा पुढे धजावला की स्वाभाविकच कविमन म्हणते की आम्ही आडदांड आहोत, परंतु जे मूर्ति विकून टाकतात ते 'हरामखोर' आहेत, तेच 'खरे चोर' आहेत. या कविमनाला जी गोष्ट सहत होत नाही ती उच्छेदून टाकण्याची घाई होते. काही वेळां जरी अत्युक्ति केली जात आहे असे इतर कोणास वाटले तरी आत्मविश्वासाचे उद्गारही असेच जोमदारपणाने प्रगट होतात. कवींची महती वर्णिताना 'आमच्या वाचून तारांगणे निष्प्रभ होतील' असे बजावण्याची या कविमनाची रीत आहे. अशा आविष्करणाची तऱ्हा प्रतिमांच्या सुबकतेपेक्षा तीव्रतेकडे लक्ष देणारी असल्यामुळे साखरेकडे झणी जाणाऱ्या डोंगळ्याची उपमा, साईकडे मांजर ज्या लालसेने जाते ती उपमा, दक्षिणा घेणाऱ्या भिक्षुकाची तृष्णा व्यक्त करणारी उपमा यांचे तिला वावडे नाही. एखादा तास फुकट दवडला की तो पाठमोरा चालू लागलेला गोचर होतो व त्याच्या पाठीवर ज्वालेने लिहिलेले शब्द आढळतात. आयुष्यांतील दुःखद प्रसंगाची सार-रूपाने जाणीव व्हावयाला लागताच 'आमुचा पेला दुःखाचा डोळे मिटुनी प्यायाचा' अशी समजूत या कवीची ताबडतोब होते. भावना अनावर झाली म्हणजे तिचा पहिलाच उद्गार किती प्रभावी व झपाट्याचा असतो

ते पहायचे झाल्यास केशवसुतांच्या कविता उत्कृष्ट नमुना ठरतील. मुलास झोडपणाऱ्या एका पंतोजीला उद्देशून कवी पहिल्या दोन ओळीतच म्हणतो,

कोणे मूर्खपणे गुरुपण तुला क्रूरा ! असे रे दिले ?
का खाटीक न जाहलास ? – तुजला ते शोभते चांगले !

देवलांच्या संगीत शारदा नाटकांत ज्याप्रमाणे 'मांग आहेत हे, बाप कसचे' हा त्वेषाचा उद्गार पदातून येतो तशी स्थिती पुष्कळशा केशवसुतांच्या कवितातून दिसून येते. नाट्यरचनेत पराकोटीचा भावनोत्कर्ष झाला असतांना येणारी पदाची रचना जेवढी प्रभावी होते तशी मनाची पार्श्वभूमि कवीचीही या कविता रचतांना झालेली आहे असे जाणवत राहाते. प्रत्यक्ष बाह्य परिस्थिती तेवढ्या कल्लोळाला कारणीभूत होणारी नाही असे इतरांना वाटण्याची बरीच शक्यता असूनही केशवसुतांचा भावनावेग किंवा त्यांच्या मनाला तीव्रतेने जाणवणारी संवेदना अतिशय अस्वस्थ करणारी असते. या कविमनाला ही अस्वस्थता, हे पाऱ्यासारखे चापल्य आणि थोड्याशा हवामानातील फरकाची त्वरेने नोंद करण्याची आंतरिक सवय आहे आणि ती बालसुलभ आहे, कदाचित् वक्तृत्वाकडे झुकणारीही ती आहे. तिच्यात चिंतनशीलता त्या मानाने कमी आहे.

त्या वेळच्या समाजांत जी जडता, रूढीचे दास्य, संवेदनारहितता, दाक्षिण्याचा अभाव, बाजारी वृत्ती या कविमनाला जाणवली ती तेवढ्या तीव्रतेने इतरांना जाणवली नाही. 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' किंवा 'मजुरावर उपासमारीची पाळी' या कविता अशा व्याकुळ होणाऱ्या आणि विशाल माणुसकीची तहान लागलेल्या मनाच्या द्योतक आहेत. प्रत्यक्ष परिस्थितीची दाहकता इतरांना जेवढी भासे, त्यापेक्षां शतपटीने अधिक केशवसुतांच्या कविमनाला भासे, हेच त्यांच्या 'तुतारी', 'नवा शिपाई', 'गोफण' या कवितांतील आवेशाचे व व्यापक मानवतेचे अधिष्ठान आहे आणि 'हरपले श्रेय' लिहिणाऱ्या केशवसुतांच्या कविमनालाही या उललेल्या हृदयाच्या स्पंदनांची तीव्रता असह्य होते हे सरळ दिसण्यासारखे आहे. एका पत्रात ते दुसऱ्या होतकरू कवीला लिहितात की 'तुमचे हृदय उलले आहे काय ?' व्यावहारिक तडजोडीचे समाधानकारक जीवन

जगणाऱ्यांनी केव्हा केव्हा आपल्या कविता लिहीत असताना ही तगमग अनुभवली असली तरी केशवसुत हे कवी त्या वर्गात सहजपणे पडणारे नव्हेत. स्वतःच्या हातून कृती जरी झाली नाही तरी 'सल्ते काय', 'मोहरून टाकणारे काय', आणि 'हृदयाची श्रीमंती कशात आहे' याविषयी सतत विचारमग्न असणारे असे केशवसुत कित्येक कवितांतून दिसतात. हा भावनात्मक मूल्ये शोधण्याचा कवीचा प्रयत्न किती विशुद्ध होता हे पहायचे झाल्यास 'कर्तव्य आणि प्रीति' ही साधी कविता पहावी. या कवितेत केशवसुत स्पष्टच सांगतात की, एक यशस्वी संसारी गृहस्थ म्हणून आपल्या पत्नीला जे सोन्याचे दागिने करता आले ते मी केले असले व त्या दृष्टीने जरी नित्याच्या जीवनांत विशेषशी उणीव मी माझ्या प्रेमीजनाला भासू दिली नसली तरी सोन्याच्या दागिन्यापेक्षाही मी रानांतून आणलेल्या पुष्पांची माला हीच माझ्या अस्सल प्रीतीची द्योतक आहे असे प्रियेने समजावे. अशा आंतरिक भावना-मूल्यांनी रंगलेले केशवसुतांचे कविमन आहे.

त्यानी भावनांचा किंवा मनोगतांचा सावकाशीने उमलत जाणारा विकास दर्शविणाऱ्या कविता लिहिल्या नाहीत असा याचा अर्थ नव्हे. 'एक खेडे,' 'नैर्ऋत्येकडला वारा' 'अढळ सौंदर्य' 'अपर कविता-दैवत' 'गांवी गेलेल्या मित्राची खोली लागलेली पाहून' 'मुळा मुठेच्या तीरावर, 'रा. वा. ब. पटवर्धन यांस' 'निद्रामग्न मुलीस' 'भृंग' 'पर्जन्याप्रत' 'शब्दांनो मागुते या' 'विद्यार्थ्याप्रत' या व आणखी अशाच कांही कविता चित्तवृत्तीमधील उद्दीपनांचे थोड्या संथपणाने चित्रण करणाऱ्या आहेत. कांही ठिकाणी हे उद्दीपन सुद्धां भावनात्मक तपमान फार चढलेले असल्याचे सुचवत नाही. तथापि संथ भावनांचे किंवा लहान प्रसंगांच्या लहानशाच चमकदार अनुभवांचे चित्रण करून थांबणारी केशवसुतांची कविता नाही. 'अमेरिकन मुलगी' ही टिळकांची निव्वळ वर्णनात्मक कविता प्रासादिक आहे यात संशय नाही किंवा 'आकाशांत फुले धरेवर फुले' हीही दिव्य आनंद अनुभवणारी कविता आकर्षक आहे. परंतु अशा वर्णनात्मक किंवा शांत स्थायीभावाच्या कविता लिहिण्याची केशवसुतांच्या मनाची प्रेरणा नव्हे. अंतर्यामातील तळमळ, भीति,

क्रांतिकारक बदल व्हावी ही तृष्णा, हर्ष, अशा भावनांची दाट छाया केशवसुतांच्या कवितेत आहे.'

त्यांनी आपल्या एका पत्रांत इंग्रजी कोणातरी कविमित्राला लिहिले आहे की दीर्घ कविता किंवा एखादे खंडकाव्य लिहिण्याची अतिशय गरज आहे व म्हणून ते लिहू शकणाऱ्या आपल्या माहितीच्या कविमित्राने ते लिहावे. ते स्वतः दीर्घकविता लिहू शकले असते असे त्यांच्या प्रकृतिधर्मावरून वाटत नाही. एडगर ॲलन पोची जी कवितेविषयीची कल्पना होती किंवा शेली कवीची जी कवितेच्या स्वरुपाविषयीची 'fading coal' ही कल्पना होती तीच त्यांची होती असे म्हणावयास हरकत नाही. दीर्घकाव्य कोणीतरी लिहावे असे पत्रांतून म्हणणारे केशवसुत आपल्या 'चुटक्या' वर समाधानी नव्हते हे त्यांच्याच त्या पत्रातील उद्‌गारांवरून दिसत असले तरी आपण येथे कवीच्या प्रकृतिधर्माचा विचार करीत आहोंत. तसा विचार केला तर ही दीर्घ कविता वा खंडकाव्य त्यांनी तेवढ्याच प्रभावीपणे लिहिले असते काय, याची शंका वाटते. 'आगबोटीच्या काठाशी' या कवितेच्या प्रारंभी 'तरंग पहिला' असे म्हटले आहे म्हणून ही कविता अनेक तरंगांची अशी दीर्घ कविता त्यानी कल्पिली असावी असे वाटते. परंतु तीव्रपणाने संवेदना प्रगट करणाऱ्याच्या हातून ही दीर्घ कविता पूर्ण होणे कठीणच होते. त्यांची मनोरचना वेगळीच होती हेच मुख्यत्वे येथे सूचित करायचे आहे. त्यांनी आपल्या कवितासाठी 'भृंग,' 'फुलपांखरू,' 'रांगोळी घालणारी मुलगी,' 'दिवा आणि तारा,' 'संध्याकाळ,' 'नैऋत्येकडला वारा,' 'घराकडील गोष्टी,' 'मजूर,' 'अंत्यजाचा पोर' असे साधे विषय घेतले आणि त्यांना आशयसंपन्न केले हे म्हणणे नीट पारखून घेतले पाहिजे. त्यांचे विषय साधे असले तरी 'महान् आशय' त्या विषयांशी चिकटल्यावाचून त्यांना हा साधा विषय काव्यविषय झालासे वाटत नव्हते. त्या दृष्टीने विचार केल्यास त्यांचे विषय साधे नाहीतच.

हा मनाचा कल लक्ष्यात घेतला म्हणजे 'रांगोळी घालतांना पाहून' या कवितेत कवी वर्ण्य विषयात किंवा परिस्थितीत किती मनःस्पंदनाचा समावेश सुलभपणे होणं शक्य आहे किंवा सुसंवादी होणे सयुक्तिक आहे हे

पाहाण्याचा यत्न करीत नाही असे एखादा टीकाकार म्हणू शकेल. व्यवहार वादी माणूस हे तपासेल तर त्याला या मनःस्पंदनांचा अतिरेक झाला आहे असे वाटेल. मुलांना मारणारे पंतोजी इतराप्रमाणे केशवसुत स्वतःही होते. काही अंशी अशा शिक्षा अपरिहार्य ठरतात. अशा वेळी शिक्षकाला एकदम खाटीक म्हणून संबोधणे औचित्याला धरून नाही. अंत्यजाच्या मुलाला दूर हो म्हणणे त्या वेळच्या समाजात इतरांना इतके खुपण्यासारखे नसताना या कवीने एवढ्या जोरात ती तक्रार मांडावयाचे काही कारण नव्हते असेही कोणी तेव्हा म्हटले असेल. राजवाड्यासारखे टीकाकार तर विद्यार्थीदशेतील केशवसुतांच्या पत्नीविरहाने व्याकुळ झालेल्या अवस्थेचा विचार करतांना देशांतील तरुण विद्यार्थ्यांना हा स्त्रैणपणा शोभतो का असे मोठ्या खेदाने उद्‌गारतात. त्यांचे केशवसुतविषयक लेखन जितके रसग्राही आहे तितकेच उपयुक्ततावादी ध्येयवादी आणि समंजस तडजोडीच्या महत्त्वाचे गुणगान करणारे आहे. 'हरपले श्रेय' या कवितेवरील त्यांचा अभिप्राय अशा व्यावहारिक दृष्टिकोनाने केलेल्या टीकेचे उदाहरण आहे. टीकाकाराने अशी भूमिका घेणे वा न घेणे हे त्याचा मनोधर्म कसा आहे यावर अवलंबून आहे. केशवसुतांचा मनःपिंड तीव्र संवेदनांचा आहे हे ध्यानी घेतल्यावर त्यातील ही वस्तुस्थिति व कवीच्या तिजविष-यींच्या संवेदना यांतील प्रचंड तफावत काही वेळा आपल्या ध्यानी येईल.

केव्हा केव्हा केशवसुतांच्या कविता अशा एका मनाच्या अवस्थेत लिहिल्या सारख्या वाटतात कीं ते या झपाटलेल्या स्थितीतच असावेत. अशा वेळच्या उद्गारात काही गूढार्थ भरला जातो. तो उलगडण्याला अतिशय कठीण नसला तरी 'अवकाशाच्या ओसाडीतील मुके पडसाद' कोणते यावर मग श्री वि. वर्तकांचे म्हणणे अधिक प्रकाश टाकणारे वाटते. 'नांगरल्याविण भुई बरी' याही चरणाचा अर्थ अनेक रीतीने करण्याची शक्यता निर्माण होते. 'झपूर्झा' गाण्याचे खरे रहस्य काय याविषयी प्रत्येकाला काही वेगळे वाटू लागते. 'हरपले श्रेय' या कवितेचा वर्तकांचा अर्थ ओढाताणीचा आणि खुद्द वर्तकांच्याच मनः-प्रवृत्तीचा द्योतक आहे असे वाटले तरी राजवाड्यांच्या मीमांसेपेक्षा तो कितीतरी साभिप्राय वाटतो.

परंतु केशवसुतांच्या एवढ्याच उद्गारात ही मनाच्या शब्दांना मागे टाकून उड्डाणझेप घेण्याच्या प्रवृत्तीची उदाहरणे सापडतात असे नव्हे. ‘पुष्पाप्रत’ या कवितेत स्वतःला ते कवितादेवतेच्या भ्रमिष्ट बालकांपैकी एक असे संबोधतात. ‘कविच्या हृदयी जसे गुंगती’ या लहानशा कवितेच्या अखेरीस आपले मन सखीच्या सौंदर्यविचारामुळे भ्रमिष्ट झाले आहे असेही सांगतात. ‘प्रीति आणि तू’ या कवितेत ‘डोक्याच्या भ्रमणामुळे’ आपली गाणी बिघडून विक्षिप्त झाली आहेत असे ते म्हणतात. पण हे म्हणणे खऱ्या अर्थाने कोणीच घेणार नाही. केशवसुतांची शब्दयोजना समर्पक असते. कवितेतून जी आशयमूर्ति साकार व्हावयास पाहिजे तिची अंगे प्रत्यंगे त्यांना बरोबर हेरता येतात व त्यामुळे पहिल्यापासून अखेरपर्यंत त्यांचा कवितेच्या रचनेवरील ताबा कधी सुटत नाही. त्यांच्या कवित्वाचे वैशिष्ट्य म्हणजे एकंदर आशयाच्या अभिव्यक्तीसाठी अवश्य असलेला हा मनावरील ताबा न सुटतांही जणू सहजपणाने कांही शब्द आपोआप त्यांच्या लेखणीतून उतरतात हे होय.

‘विद्यार्थ्यांप्रत’ या कवितेतील प्रत्येक कडव्याच्या अखेरीस ‘हे वच बहुमोलाचे’ असे तीन वेळा लिहून चौथ्या म्हणजे अखेरीच्या चरणाच्या अंती तेच न लिहिता त्यांनी ‘जग हे बदलायाचे’ हे जे लिहिले आहे ते अशा अनाहूत प्रतिभाबलाचे लक्षण आहे. याहीपेक्षा अगदी सहजपणे आलेल्या ओळी म्हणजे

‘ तिमिरामध्येच तिमिरामधून
घडीभर पडे मध्येच ऊन
अभ्री तेही जाते उडून,
हृदय हे उले त्यामुळे निराशा जडून !’

या होत. प्रतिभा ही अत्यद्भुत गूढ शक्ती अंगी संचारल्यानंतर मुक्तात्मा गगनांत उडतो व त्याला एकाच वेळी दैत्यांचे बल आणि देवांची सात्त्विकता प्राप्त होते हेही वर्णन अशाच धर्तीचे आहे.

केशवसुतांच्या कवित्वाची दोन महत्त्वाची वैशिष्ठ्यें थोडक्यात पाहून झाल्यानंतर आतां त्यांची त्या मानाने कमी महत्त्वाची परंतु तरीही त्यांच्या समकालीनांचा विचार केल्यास खास त्यांचीच अशी दोन वैशिष्ठ्यें उरतात. त्यातील पहिले म्हणजे विरोधी रचनेचा किंवा एक-मेकांना तोलून धरणाऱ्या शक्तींचा त्यानी कवितेत केलेला वापर. काळाच्या कल्पनेने नव्या वाङ्मयसेवकांना आणि टीकाकारांना आताच्या आपल्या कालखंडात जे आकर्षक आव्हान दिले आहे, त्या कल्पनेच्या अनुषंगाने 'घड्याळ' या कवितेचे बेडेकरांनी रसग्रहण केले आहे. त्या रसग्रहणांत जाता जाता त्यांनी या विरोधी रचनांच्या ताणाचे महत्त्व आपल्या नजरेस आणून दिले आहे. 'तोल', 'ताण', इत्यादि शब्दांचा वापर न करता मला म्हणावयाचे आहे की केशव-सुतांच्या पुष्कळ कवितांमधून जाणतेपणी किंवा अजाणतेपणी अशी रचना झालेली आहे. सुनीतात तर प्रथम एक विचार अथवा भाव विकसित होतो आणि नंतर दुसरा विचार विकसित झालेला असतो, हे सर्वांनाच आतां परिचित झालेले आहे. परंतु सुनीताप्रमाणेच इतर इंग्रजी कविता वाचून केशवसुतांना तिचे आकर्षण वाटले असावे. म्हणून 'मयुरासन आणि ताजमहाल' व 'आम्ही कोण ?' या सुनीतातील उघड दिसणाऱ्या विरोधी रचनेबरोबरच 'दिवाळी' कवितेचा शेवट, 'संध्याकाळ' या कवितांचा शेवट अशा विरोधी वातावरणात नेतात. याखेरीज कित्येक कविता याचा दाखला देणाऱ्या आहेत. 'जास्वंदीची फुले आणि पारिजातकाची फुले' 'समृद्धि आणि प्रीति' 'माझा अन्त' 'दिव्य ठिणगी' 'दिवा आणि तारा' 'दिवस आणि रात्र' 'दोन बाजी' 'मूर्तिभंजन' यांची उदाहरणे ही सहज सुचण्याजोगी आहेत.

दुसरे लहानसे वैशिष्ठ्य म्हणजे केशवसुतानीच प्रथम शास्त्रीय ज्ञानाचा काव्यलेखनात कवित्वाला पोषक होईल असा केलेला वापर होय. 'कवि' या कवितेत हा प्रयत्न सुंदर रीतीने साधलेला आहे. केशवसुत लिहितात.

श्वासोच्छ्वास करी परी नवल हें-जीवित्वसंहारक
वायू घेउन आंत, तो त्यजितसे वायूस त्या पोषक !

नेहमीच्या प्रकृतिधर्माच्या उलट अशी ही क्रिया झाडांच्या बाबतीत दिवसा घडत असते असे शास्त्रज्ञ सांगतात. ‘काल आणि प्रियेचे सौंदर्य’ या कवितेत काळ मोठ्या उच्च शिलासमुच्चयांना चुरून टाकतो, हे भूगर्भशास्त्रातील सत्य असेच काव्यभावनेच्या पुष्ट्यर्थ मांडले गेले आहे. जीवकोटीची सुरुवातीची जी ‘अमीबा’ ही अवस्था तिची कवितेसाठी केलेली समर्पक योजना ‘तहान आणि भूक आरंभी नव्हती’ या त्यांच्या अगदी छोट्या कवितेत केलेली आहे.

यातून निर्माण होणारी क्लृप्तिप्रधानरचना कांही कवितांत आढळते. यासाठी बौद्धिक विलासाची आवड वाटू लागते. ‘प्रयाणगीत’ या कवितेत कापड विणतांना धागा डावीकडे ढकलला जातो परंतु तो परतून उजवीकडे येतो या कल्पनेचा वापर, किंवा पर्वत जरी पृथ्वीला सोडून उंच नभात चढलेले असले तरी कालगतीने ते खालीं येतात हा शास्त्रीय ज्ञानाचा वापर असाच कांहीसा क्लृप्तिप्रधान झाला आहे.

परंतु भावनिक सत्य मांडण्याच्या प्रयत्नांत असतांना केशवसुत कधीही वेगळ्याच क्लृप्त्यांच्या आहारी जाऊन मूळ अर्थगर्भतेला धक्का लागेल असा बौद्धिक विलास करीत बसत नाहीत.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १६६२८

# केशवसुतांच्या तीन कविता

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.......................... दि: ....................
क्रमांक .......................... नोंद दि: ...............

**निद्रामग्न मुलीस, रूढि, सृष्टि** आणि **कलि** आणि **नवा शिपाई** या केशवसुतांच्या तीन कवितांना तत्कालीन सामाजिक परिस्थितीची पार्श्वभूमि निश्चितार्थाने आहे हे केशवसुतांच्या अभ्यासकांच्या निदर्शनास आणावे म्हणून त्या तीन कवितांच्या आशयाचा उहापोह करावा लागणार आहे. वैजनाथ काशीनाथ राजवाडे, श्री. वि. वर्तक, रा. श्री. जोग, भ. श्री. पंडित इत्यादि भाष्यकारांनी केशवसुतांच्या जवळ जवळ प्रत्येक कवितेसबंधी कांही टीपा किंवा रसग्रहण नोंदले असल्याने त्यांच्या टीपातून वा रसग्रहणातून हा मूळ आशय लुप्त झालेला आहे हे वाचकांच्या नजरेस आणणे आवश्यक ठरते.

**निद्रामग्न मुलीस** या कवितेत एका निद्रामग्न मुलीच्या हसणाऱ्या गालांकडे, तिचा कौमार्यावस्थेतील साधेपणा, नम्रता, मधुरता व स्वर्गसदृश मुग्धतरलता यांच्याकडे पाहून कवीच्या मनात तिची सुखस्वप्ने काय असतील याविषयीचे विचार येतात व प्रत्यक्ष तिची पुढची अवस्था काय होईल याबद्दलच्या काळजीने अस्वस्थता व व्याकुलता येते. ही

निष्पाप मुलगी थोड्याच दिवसात तारुण्यात पदार्पण करील आणि मनाशी अशी स्वप्ने रंगवीत राहील की संसार फार गोड आहे. ईश्वराने जन्मापासूनच संसारात आम्हांला का घातले नाही अशीसुद्धा कल्पना संसाराच्या सुखस्वप्नामुळे ती करीत असावी. तिच्या गाली अजाणतेपणाची शोभा आहे. परंतु पुढे कटु जाणतेपण जेव्हा येईल तेव्हा तिच्या चेहऱ्यावर त्या भेसूर जाणतेपणाने ओढलेल्या नांगराच्या तासांचे जे ओरखडे उठतील, त्यांचा विचार येऊन कवि खिन्न होतो. मग स्वतःलाच सावरून तो अशी शुभेच्छा व्यक्त करतो की, दिवसामागून दिवस दुःखाचेच चटके जरी आम्हांला बसत असले तरी तुला मात्र सुखच भेटावे.

केशवसुतांच्या डिसेंबर १८८९ च्या या कवितेशी इतर कांहीं कवितांचे जवळचे नाते आहे. त्यातली पहिली म्हणजे त्यानी १० ऑक्टोबर १८९२ या तारखेस लिहिलेली '**पण लक्षांत कोण घेतो? च्या कर्त्यास**' ही कविता होय. दुसरी **गुलाबाची कळी** ही कविता होय. गुलाबाची कळी ही कविता भाषांतरित आहे. परंतु भाषांतरित कवितेमध्ये कवीची स्वतःची भावना प्रतिबिंबित झालेली नसते असे मानणे गैर आहे. ज्या कवितेचे भाषांतर करण्याला कवी उद्युक्त होतो त्या कवितेमध्ये त्याच्या समुत्सुक भावनांचे आविष्करण प्रभावी रीतीने घडलेले असते म्हणूनच त्या भाषांतरांत त्याला स्वारस्य वाटत असते. या दोन कवितांच्या संदर्भात जर 'निद्रामग्न मुलीस' ही कविता वाचली तर आपणांस असे दिसते कीं, या मुलीचे भवितव्य तेव्हांच्या रूढिप्रधान हिंदुसमाजामध्ये केशवसुतांना भयप्रद वाटले असल्यामुळेच ते शंकित झाले. बालविवाहाच्या चालीमुळे समाजात जो अनर्थ तेव्हां घडत होता त्याची जाणीव झाल्यामुळे या निष्पाप बालिकेचे भवितव्य हरिभाऊंनी रंगविलेल्या यमूप्रमाणे होणार नाही कशावरून, अशी करुणामय व असहाय्य मनःस्थिति कवीची झाली आहे असे मला वाटते. संसार दुःखमय आहे हे सांगण्यासाठी, किंवा आमचा पेला सदैव दुःखानेच भरलेला आहे हे सांगण्यासाठी त्यानी इतर कविता लिहिल्या. परंतु हिंदु समाज रूढीच्या दास्यात पडल्यामुळे स्त्रियांवर जी अनर्थ परंपरा

कोसळते, तिच्या जाणीवेचे सूचक चित्रण 'निद्रामग्न मुलीस' या कवितेत आले आहे.

**रूढि, सृष्टि आणि कलि** या कवितेचा रचनाकाळ लक्ष्यात घेतला तर ती कविता स्पष्टपणे त्या वेळच्या संमति वयाच्या कायद्याच्या अनुरोधाने लिहिलेली आहे हे समजण्यास अडचण पडू नये. या कवितेसंबंधी विचार करताना 'कलि' या कल्पनेचे आकलन नीट होत नाही म्हणून आपल्याला सुचेल तो अर्थ देण्याचा भाष्यकारांनी प्रयत्न केला आहे. ही कविता दादर येथे ९ मार्च १८९१ रोजी लिहिली असून करमणूकच्या ४ एप्रिलच्या अंकांत ती प्रसिद्ध झाली आहे. तात्कालिक महत्त्व विलक्षण असल्यामुळे ती लगेच प्रसिद्धीला पाठविली गेली हे उघडच आहे. केशवसुतांच्या कवितांपैकी पुष्कळ कविता लिहून झाल्यानंतर बऱ्याच अवधीने प्रसिद्धीला दिल्या गेल्या आहेत. परंतु या कवितेच्या बाबतीत तसे न घडता ती लिहिल्याबरोबर करमणूक पत्राकडे पाठविली गेली याचा अर्थच हा संभवतो की, त्या वेळच्या संमति वयाच्या वादाच्या धुमश्चक्रीत कवि केशवसुतांना जे म्हणावयाचे होते ते सुधारणापक्षाला अगत्याचे वाटत होते.

संमतिवयाच्या कायद्याला सनातनी पक्षाने अतिशय विरोध केला. तो विरोध करताना रूढीचा आधार हाच बळकट पाया त्यांनीं धरला होता. ही रूढी अज्ञानाने फुगली होती व सृष्टीपासूनच दूर चालली होती. सृष्टिनियमाला धाब्यावर बसवून रूढीचे दास झालेले आपले बांधव इतके अंध बनले की त्यांना त्या रूढीमुळे होणारे सगळे अनर्थ हीच आशीर्वचने वाटू लागली. अशा वेळी सृष्टीने आपला एक सेवक कली बलवान रूढीचा नाश करण्यास पाठविला आणि या कलीने कागदी अस्त्र रूढीवर फेकताच ती निष्प्रभ झाल्यासारखी दिसू लागली होती व तिचे सिंहासन डळमळू लागले होते.

हे कलि, तुझ्या त्या कागदी अस्त्राला त्वरित विजय मिळो; तुला 'कलि' असे न म्हणता तुझे नाव आम्ही बदलूं; सृष्टीचा जयजयकार करून आम्ही सृष्टिनियमांचेच पालन करण्यात धन्यता मानू, असे कवि या कवितेत म्हणतो.

रूढीविरुद्ध शेली व वर्डस्वर्थ–आणि विशेषतः शेली या रोमँटि-सिझमच्या काळातील आंग्लकवींनी जी बंडखोरी आरंभिली तिचे महत्त्व ध्यानी घेऊन केशवसुतांनी स्वतःच्या कवितेमध्ये रूढिभंजनाचे व्रत घेतलेच. परंतु या कवितेत रूढि, सृष्टि आणि कलि अशा तीन निर-निराळ्या संज्ञा वापरतांना त्यांना संमतिवयाचे आंदोलन अभिप्रेत होते. मलबारी शेटनी इंग्रजसरकारला कायदा करण्याची विनंति केली, स्वतः त्याविषयी पुस्तिका लिहिली, शेवटी विनंतीअर्जाच्या कागदी अस्त्राने रूढीचा बंदोबस्त केला गेला या गोष्टी ध्यानी घेतल्या म्हणजे या कवितेतील ‘ कलि ’ कोण ते समजते. माझ्या समजुतीप्रमाणे मलबारीशेट यांचे प्रयत्न हा तो ‘ कलि ’ होय. सर्व सुधारकमंडळी त्यांच्या पाठीशी होती व सरकारने अखेर तो कायदाही २० मार्च १८९१ रोजी पास केला. रूढीचा नायनाट पूर्णपणे जरी तेव्हा झाला नाही, तरी अशा रूढीवर हल्ला चढविणाऱ्या निर्भय वीरांचा जयजयकार करण्यास केशवसुत या कवितेत पुढे सरसावलेले आहेत.

वर्तकानी ‘ रूढि, सृष्टि आणि कलि ! ’ या कवितेचा सामाजिक संदर्भ मांडण्याचा प्रयत्न त्यांच्या प्रसिद्ध ‘ तुतारीचे पडसाद ’ या पुस्तकांत केला आहे पण तो पूर्णपणे फसला आहे. संमतिवयाचा वाद चालू होता तेव्हा संमतीचे वय दहाच्या ऐवजी बारा करण्याचे प्रयत्न सुधारणावादी वीर करत होते. वर्तक १९२८ मध्ये सारडा कायद्याच्या त्यावेळच्या चळवळीच्या अनुषंगाने विवेचन करीत असा-वेत; म्हणूनच इतर अनेक सामाजिक दुष्ट रूढींबरोबरच ते म्हणतात, “ चौदा वर्षांची स्त्री म्हणजे केवळ अजाण अर्भक ! तिला मातृपदावर जबरदस्तीने आरूढ करणे म्हणजे अमानुषपणाची कमाल होय. ’ असे या नवीन सेवकाने बजावताच त्याला रुढिभक्तांचे उत्तर एकच.— ‘ कालिकाल ! कलिकाल !! ”

हा सेवक कोण याचा उलगडा त्यांनी केला नाही. १८९० पासून व खरे म्हणजे त्याच्याही आधीपासून मलबारीनी जो ध्यास संमति-वयाच्या कायद्याबद्दल धरला होता व मॅक्स मुलर, सर विल्यम हंटर प्रभृति इंग्लंडातील वजनदार व्यक्तींच्या पाठिंब्याने भारतीय महिलांच्या

अर्जाची दाद भारत-मंत्र्याकडून लावून घेण्याचा प्रयत्न केला होता, आणि अखेरपर्यंत निराश न होता हिंदुस्थानच्या वरिष्ठ कायदे कौन्सिलमध्ये रावबहादुर नूल्कर यांच्याकरवी जो अव्याहत प्रयत्न चालविला होता त्याची कसलीच जाणीव वर्तकांच्या लेखनांत नाही. इतर जे या कवितेचे भाष्यकार आहेत त्यांना तर ती नाहीच नाही. परंतु मुंबईतली २२ फेब्रुवारी १८९१ रोजी भरलेली सभा, त्या सभेने तयार केलेले ठराव व अर्ज आणि या प्रश्नाला तेव्हां आलेली तीव्रता यांचा केशवसुतांच्या या कवितेतील किती तरी ओळीशी अगदी जिव्हाळ्याचा संबंध आहे. मलबारीनी जे कागद रूढीकडे फेकले त्यामुळे तिचे सिंहासन आता डळमळू लागले आहे. हे कले, तुझ्या त्या कागदी अस्त्रांना त्वरित (तूर्ण) विजय प्राप्त होवो असे कवि तेथे ९ मार्च १८९१ रोजी म्हणत आहे. आणि स्कोबल साहेबानी हे बिल पास करून घेण्याचे ठरविले होते त्याप्रमाणे २० मार्चला ते पास झाले हे सर्वांना माहीतच आहे.

केशवसुतांची 'नवा शिपाई' ही कविता ८ मार्च १८९८ या तारखेस लिहिलेली आहे. तिच्या विषयी रसग्रहणात्मक विचार करणाऱ्या सर्व सुप्रतिष्ठित टीकाकारांनी केशवसुतांच्या मोजक्या श्रेष्ठ कवितांमध्ये तिला स्थान दिले आहे. ज्या टीकाकाराने तिच्याविषयी फारसे काही लिहिले नाही अशी व्यक्ति म्हणजे मा. त्रिं. पटवर्धन होय. माधवराव म्हणतात, " 'नवा शिपाई' या १८९८ साली लिहिलेल्या कवितेत त्यानी युरोपात नवीन निघालेल्या जगच्छांतिवादाचा अनुवाद केलेला आहे." (अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक, खंड १ ला, पृष्ठ १४६). परंतु माधवरावांच्या या ओझरत्या विधानाकडे आजपर्यंत कोणाचे विशेष लक्ष गेलेले दिसत नाही. किंबहुना माधवरावांचा लेख पुन्हा एकदा वाचेपर्यंत माझ्याही नजरेला हा उल्लेख ठळकपणाने प्रतीत झाला नव्हता. तोपर्यंत मी ही कविता वाचून स्वतांशी विचार करू लागे की, यांतील विचारसरणी केशवसुतांना कोणत्या तरी प्रबळ अशा तत्कालीन पाश्चिमात्य चळवळीतून स्फुरली असली पाहिजे. परंतु

कोणत्याही टीकालेखामध्ये तसे कोणी ध्वनित केलेले नसल्यामुळे आणि कवितेची श्रेष्ठता सर्वमान्य असल्यामुळे, मनात येणारे विचार पुरे पडताळून पाहिल्याखेरीज निव्वळ अंदाजाने काही मत मांडण्याची घाई करायची नाही असे ठरवून ही प्रेरणा केशवसुतांना कोठून मिळाली असावी याचा शोध मी पुढे चालू ठेवला. सहजच 'मुक्तिफौजे'च्या चळवळीचा विचार या संदर्भात माझ्या मनात बळावला.

तो का व 'मुक्तिफौजे'चे तेव्हाचे भारतातील कार्य कोणत्या स्वरूपाचे होते यासंबंधी थोडे विवेचन अवश्य आहे.

'नवा शिपाई' ही कविता वाचताना प्रथम जे जाणवते ते हे की, या कवितेतील शिपायाची भाषा शिपाईगिरीची नसून अजिबात वेगळी आहे. हा शिपाई नव्या मनूतला आहे, नव्या दमाचा आहे, त्याला कोणी वठणीला आणू शकणार नाही असा जबर आत्मविश्वास त्याच्यापाशी आहे. तो शूर आहे परंतु त्याची मनोगते अगदीच निराळी आहेत. त्याचे युद्धक्षेत्र असे नाहीच. त्याचे शौर्य पूर्वी कुठे प्रगट झाल्याचे तो सांगत नाही हे एकवेळ समजू शकले तरीही नेहमीच्या शिपायासारखा तो सर्वांना अपेक्षित असा कोणता नवा पराक्रम करण्याची मनीषा बाळगतो ते या कवितेत कुठेच दिसत नाही. हा शिपाई लष्करी भाषा वापरतो ती फक्त स्वतःला 'शिपाई' म्हणून संबोधण्यापुरती. तो जी दिव्य स्वप्ने सत्यसृष्टीत अवतरलेली पाहत आहे ती विशाल मानवी बंधुत्वाची आहेत. जाति, हिंदुधर्म व कुठलाही एक पंथ, यांच्या कुंपणातून बाहेर पडून, कूपमंडूक वृत्ती सोडून, सर्वसमावेशक अशी उदार दृष्टी बाळगून, सर्वत्र आपली भावंडेच आहेत, परकेपणा कुठेही प्रत्ययाला येत नाही अशा जाणिवेने एका धर्मोदात्त कोमलपणाचा आविष्कार हा शिपाई करीत आहे. या कवितेचा मनाला खऱ्या अर्थाने उन्नत करणारा आशय अनेकांच्या भाष्याचा विषय झाला असल्याने त्यासंबंधी काही विस्ताराने लिहिण्याची गरज नाही.

कवितेतील शब्दयोजनेकडे पाहिल्यास, 'ब्राह्मण नाही, हिंदुहि नाही, न मी एक पंथाचा' असे तर केशवसुत सरळच या शिपायाला म्हणायला लावतात; परंतु त्याचबरोबर 'पतित', 'लहान-मोठे', 'साधु-अधम'

यासारखे शब्द आणि काही दीर्घ पंक्ति किंवा ओळींचे भाग आपले लक्ष वेधून घेतात व मनावर असा एक परिणाम करितात की, कुठल्यातरी नव्या धर्मकल्पनेच्या सूत्राशी ही कविता निगडित आहे.

'कलह कसा जाइल मिटुनी'

अथवा 'शांतीचे साम्राज्य स्थापू बघत काळ जो आहे ।
प्रेषित त्याचा नव्या दमाचा शूर शिपाई आहे ॥'

या ओळी व त्यातील 'प्रेषित' हा शब्द पुन्हा हाच विचार दृढ होण्याला मदत करतात.

शांतीचे साम्राज्य स्थापू इच्छिणारा तो काळ होता असे १८९८ च्या सुमारास मानावयाचे झाल्यास 'युरोपात नवीन निघालेल्या जगच्छांतिवादा'चा जो उल्लेख मा. त्रिं. पटवर्धनांनी उडत उडत केला आहे त्याचा शोध घेणे आवश्यक ठरते. परंतु असा कोणता नवा जगच्छांतिवाद तेव्हाच्या काळात आढळत नाही. जे आढळते ते इंग्लंडात मुक्तिफौज स्थापन झाली होती व तिच्या शाखा युरोपात आणि आशियात व विशेषतः भारतात आणि ब्रिटिश साम्राज्यामध्ये जोमदारपणे या काळांत काम करू लागलेल्या होत्या हेच होय.

मुक्तिफौजेची ( Salvation Army ) जी माहिती केतकरांच्या ज्ञानकोशात दिलेली आहे तिच्यावरून असे म्हणता येते की, १८९० पासून फार वेगाने हिंदुस्थानात या चळवळीचा प्रसार झाला. एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका या कोशात तर अशी माहिती आढळते की, हिंदुस्थान आणि सीलोनमध्ये मिळून या फौजेच्या पाच हजार शाखा काम करीत होत्या. १९२८ च्या आवृत्तीतील ही माहिती आहे. म्हणून केशवसुतांच्या काळांत कदाचित् यापेक्षा कमी शाखा असतील. तरीही त्यांची संख्या बरीच मोठी असली पाहिजे हे उघड आहे.

याविषयी थोडी विशेष यत्नाने मिळविलेली माहितीही संक्षेपाने येथे देतो. या चळवळीचे काम हिंदुस्थानात करणारा फ्रेडरिक बूथ-टकर हा बंगालमधील मोंघीर येथे १८५३ मध्ये जन्मलेला इंग्रज होता. विलायतेहून शिक्षण संपवून त्याने हिंदुस्थानातच पुन्हा असिस्टंट

कमिशनर म्हणून नोकरी धरली होती. परंतु जनरल बूथ यांच्या मुक्तिफौजेच्या चळवळीने त्याला जे आकर्षित केले ते एवढ्या प्रभावीपणाने की त्याने आपली नोकरी सोडली, वडिलार्जित संपत्तीच्या वाट्यावरही पाणी सोडले आणि फकिरी पत्करली. हिंदी लोकांच्या प्रमाणे साधा संन्यासी वेष धारण करून तो भारतीय भाषेचा अवलंब करून लोकात मिसळू लागला. शिखांच्या मेळाव्यात, मुसलमानांच्या मेळाव्यात आणि हिंदूंच्याही मेळाव्यात, धर्मपंथ यांचा विचार न करता तो प्रेमाचे स्थान संपादू शकला होता. ख्रिस्तीधर्मप्रसार हा त्याचा हेतु होता यात शंकाच नाही. तथापि मुक्तिफौजेचे जे मुख्य ध्येय गरीब, अपंग आणि खिन्न किंवा पोरके अशांना ममत्वबुद्धीने जवळ करणे, त्यांना चरितार्थाची साधने उपलब्ध करून देणे आणि सर्वांभूती एकच परमेश्वर वास करीत असतो याचा आचरणद्वारा सक्रिय मदतीने प्रत्यय आणून देणे, या ध्येयाशी तो अतिशय समरस झालेला होता.

मुंबईतले तेव्हाचे चळवळीचे केंद्र खेतवाडीत होते. ब्रिटिश सरकारचा फ्रेडरिकबूथ-टकरला सुरुवातीच्या दिवसात मोठा विरोध झाला. रस्त्यात गाणे म्हणत जाणे, मिशनऱ्यांनी हिंदी पोषाख वापरणे, इत्यादि बाबी सरकारला अमान्य होत्या. सरकारने यावर बंदी घातली. फ्रेडरिकबूथ-टकरला आणि त्याच्या कट्ट्या अनुयायांना यासाठी प्रतिकार करावा लागला आणि नियमभंग केल्यामुळे कैदही भोगावी लागली. त्यांचे निशाण काढून घेण्यांत आले व बऱ्याच जणांना ताकीदही देण्यात आली. बूथ-टकरने जेव्हा या बाबतीत गव्हर्नरची भेट घेण्याचा यत्न केला, तेव्हा गव्हर्नरने त्यांची भेट घेण्याचे नाकारले. पोलिसांनी त्यांच्या मिरवणुकी "राणीच्या हुकुमावरून" बंद करण्यात आल्याचे जाहीर केले. बूथ-टकरने या हुकुमाला न जुमानता 'कोण मला वठणीला आणू शकतो ते मी पाहे' असाच जणू आव्हानात्मक पवित्रा घेऊन तो हुकूम मोडला. त्याच्याप्रमाणे इतरही स्त्रीपुरुषांनी तेव्हा अल्प मुदतीचा कारावास भोगल्याचे दिसते. बाबू केशवचंद्र सेन यांनी बूथ-टकरचा त्या वेळी या धैर्याबद्दल गौरव केला आणि सरकारचा निषेध केला असेही बूथ-टकरच्या लहानशा चरित्रांत नोंदलेले आहे.

यातील तपशील तपासून पाहिले आहेत असे मी म्हणत नाही. बूथ-टकरच्या या धार्मिक स्वरूपाच्या सत्याग्रहाचा काळ केशवसुतांच्या ' नवा शिपाई ' या कवितेच्या आधी कितीतरी वर्षांचा आहे. पण बूथ-टकरचे कार्य हिंदुस्थानांत पुढेही कित्येक वर्षे चालू राहिले होते आणि ती प्रेरणा जोर धरत होती.

भारतीय भाषांमध्ये मुक्तिफौजेची नियतकालिके प्रसिद्ध होत असत. इंग्रजी मुखपत्र War Cry या बरोबरच त्या त्या विभागातील भारतीय भाषांमधून मुक्तिफौजेचे एक मुखपत्र प्रसिद्ध होई. मराठीत ' सिंहनाद ' आणि ' तरुण शिपाई ' या नांवाची नियतकालिके प्रसिद्ध होत असत असे पुण्याच्या साल्व्हेशन आर्मीच्या कचेरीत चौकशी केल्यानंतर मला समजले. ही नियतकालिके केव्हापासून सुरू झाली असावीत याचाही मागोवा घेण्यासाठी मुंबईच्या साल्व्हेशन आर्मीच्या कचेरीला पत्र पाठविले त्यावरून समजले की, ' सिंहनाद ' १८८८ मध्ये प्रथम प्रसिद्ध होऊ लागले. ' नवा शिपाई ' – आता ' तरुण शिपाई '– त्याच सुमारास प्रसिद्ध होऊ लागले असावे असे याच पत्राच्या उत्तरात म्हटले आहे.

हा थोडासा विस्तार झाला तो, ' नवा शिपाई ' या कवितेची पार्श्वभूमि मुक्तिफौजेच्या कार्याने केशवसुत प्रभावित झाले होते ही असावी, हा माझा तर्क सबळ ठरावा यासाठी झाला.

आता प्रश्न पडतो की, समजा ही पार्श्वभूमि समजली अथवा न समजली तरी त्यामुळे मूळ कवितेच्या आनंददायी रसग्रहणात काय फरक पडणार ? कविता, कविता म्हणून अनुभवीत असताना हे संदर्भ, स्फूर्तिस्थाने, कवीच्या अंवतीभंवती चाललेल्या घटनांचे त्या लेखनात उमटलेले पडसाद, कवीच्या व्यक्तिगत जीवनांतील संशोधनपूर्वक जुळू शकणारी माहिती, कवीच्या वाचनांत येणारे विषय या गोष्टींचे महत्त्व गौण नाही काय ? कविता हे सामाजिक घडामोडींची नोंद उपलब्ध करून देणारे साधन म्हणून पाहणे हे अरसिकपणाचे आहे एवढेच नव्हे तर चांगल्या कवितेच्या बाबतीत तर तो त्या श्रेष्ठ कलाकृतीवर अन्यायच ठरण्याचा संभव असतो.

ही विचारसरणी वाङ्मयीन टीकेचे प्रधान उद्दिष्ट ध्यानी ठेवण्याच्या दृष्टीने शंभर टक्के बरोबर आहे. मात्र त्याचबरोबर कुठल्याही काळांतील कविता आपल्याला त्या काळांतील संदर्भ आवश्यक न वाटता किंवा भाषाविषयक संकेत ध्यानी न आणता खऱ्या अर्थाने समजू शकेल असा भ्रम बाळगणेही योग्य नव्हे. परिपक्व विचारसरणीच्या टीकाकाराला वाङ्मयाची योग्य रसवत्ता प्राप्त होण्यासाठी अशा संदर्भ साहाय्याची गरज पटल्याखेरीज राहाणार नाही.

माधव ज्यूलियन यांची ' प्रेम होईना तुझ्याने प्रेम माझे राहु दे ' ही भावपूर्ण कविता डेक्कन एज्युकेशन सोसायटीला उद्देशून लिहिलेली आहे हे कळणे अवश्य आहे किंवा नाही ? ते कळले नाही तर वाचकाला अनुभवता येणारे भावकंप कमी मोलाचे ठरतील असे नव्हे. परंतु हे न समजल्यामुळे इतर काही विचित्र अनुमाने काढण्याची त्याची दिशाभूल होण्याचा संभवही ध्यानी ठेवला पाहिजे. आणि हे समजल्यामुळे पूर्वी जी कविता भावसंपन्न वाटत होती ती एकदम थोडीशी रूक्ष वाटण्याची भीतीही उत्पन्न होते. वास्तविक अशी प्रतिक्रिया हे ज्ञान झाल्यामुळे होण्याचे कारण नाही. कविता स्फुरण्यासाठी आधार किंवा मध्यवर्ती भावकेंद्र असा जरी एखादा विषय असला तरी कविता ' त्या विषयांत ' नसते. त्या भावकेंद्राभोंवती जे फार मोठे आशयवलय कवि निर्माण करतो, त्यामुळे कवितेची कविता म्हणून थोरवी कायम राहते. उघड उघड प्रासंगिक कविता देखील तात्कालिक स्वरुपाची केवळ न ठरतां सार्वकालीन स्वरूपाची ठरते, ती या विशाल आशयवलयासह भावान्वित होण्यामुळेच होय. अशा वेळी ज्या संभाव्य संदर्भातून कविता स्फुरली व काव्यबंध निर्माण झाला तो संदर्भ समजल्याने रसिक वृत्तीला धक्का न लागता उलट अधिकच झळाळी येते.

' नवा शिपाई ' या कवितेची पार्श्वभूमि मुक्तिफौजेची असलीच पाहिजे असे सुचविण्याचा माझा आग्रह नाही. मला जे प्रतीत होते ते हे की, असा काही तरी सामाजिक संदर्भ त्या कवितेच्या मागे उभां

आहे आणि तो कोणता असावा याचा अंदाज बांधण्यामध्ये त्या कवितेला कसलाही कमीपणा येण्यासारखा नाही.

गेले कित्येक महिने मनाशी मी करीत असलेला विचार आता केशवसुतांच्या कवितांची हस्तलिखित यथामूल आवृत्ती महाराष्ट्र सरकारने प्रसिद्ध केली आहे तिच्यातील या कवितेचे हस्तलिखित पाहाता आपोआप सिद्ध होतो असे मला खात्रीपूर्वक म्हणता येते.

त्यासाठी केशवसुतांनी केलेली पहिली शब्दयोजना व नंतर छापील स्वरूपात आपणासमोर आलेली कविता यांत फरक कोणकोणते आहेत ते थोडक्यात दाखवितो.

नव्या मनूतिल नव्या दमाचा शूर शिपाई आहें,
कोण मला वठणीला आणूं शकतो तें मीं पाहें !

ब्राह्मण नाहीं, हिंदुहि नाहीं, न मी एक पंथाचा,
तेच **बाडगे** जे आंखडिती प्रदेश साकल्याचा !

असे केशवसुतांनी हस्तलिखित यथामूल आवृत्तीत लिहिलेले पहिल्याने आढळते. नंतर मात्र छापील कवितेत '**बाडगे**' या शब्दाऐवजी '**पतित कीं**' अशी शब्दयोजना त्यांनी केली आहे. मला जी शंका ही कविता वाचत असतांना पहिल्या कडव्याच्या बाबतीतच आलेली होती व 'ब्राह्मण नाहीं, हिंदुहि नाहीं, न मी एक पंथाचा' ही ओळ वाचतांना व कवितेतील इतरही ओळी ख्रिस्ती धर्माच्या आकर्षणाचा प्रादुर्भाव कविमनांत झाला असावा असे वाटत होते त्याचे प्रत्यंतरच येथे सरळ मिळते. ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करणारे 'बाडगे' म्हणून संबोधले जात होते. केशवसुतांचे ज्येष्ठ मित्र नारायण वामन टिळक १८९५ मध्ये ख्रिस्ती झाल्यानंतर त्यांच्याविषयी हिंदु समाजात व विशेषतः ब्राह्मणवर्गात जी घृणा निर्माण झाली होती, तीच वास्तविक आकुंचित प्रवृत्तीच्या लोकांच्या, कुंपणामुळे साकल्याचा प्रदेश आखडून घेणाऱ्यांच्या, कूपमंडूक मनोरचनेची द्योतक होती असे केशवसुतांना निखालस वाटले असले पाहिजे. जातिभेद, पंथभेद, अस्पृश्यता,

पोटजाती यामुळे हेवेदावे आणि मत्सर यांचाच हिंदुसमाजांत आढळ होतो, कोणीही विशाल बंधुप्रेम प्रगट करीत नाही, सगळीकडे स्वतःच्या घरच्या खुणा आहेत असे कोणालाही वाटत नाही, आपल्यापुरते पाहाणाऱ्यांनी खऱ्या 'मी'ची ओळखच करून घेतलेली नाही; व्यर्थ 'अधम', 'पतित', 'पापी', 'उच्च-नीच', जवळचे दूरचे' असे काल्पनिक भेदांचे तट उभारून हिंदु लोक सामाजिक बंधुभावाला मुकलेले आहेत याची त्यांना वाटणारी उबग या कवितेत नव्या तऱ्हेच्या आध्यात्मिक समतेच्या आविष्कारामुळे येथे अतिशय प्रसन्न रूपाने प्रगट झाली आहे. चीड व्यक्त करण्याचा उद्देश न धरता केशवसुतांनी ख्रिस्ती धर्मात गेलेल्या 'बाडग्यांना'च खरा धर्म कळतो असे म्हणण्याची तयारी या कवितेत दर्शविली आहे. ख्रिस्ती झालेले 'बाडगे' किंवा 'पतित' नसून जे धर्माचा टेंभा मिरवितात परंतु साकल्याचा प्रदेश आखडतात तेच 'पतित' होत असे त्यानी म्हटले आहे.

या कवितेतील आणखीही काही बदल मोठे लक्षणीय आहेत. त्या प्रत्येकाची दखल येथे घेत नाही. परंतु काहींचा विचार उद्बोधक होण्यासारखा आहे.

तिसऱ्या कडव्याची सुरुवात नेहमीच्या छापील कवितेत

पूजितसे मी कवणाला? -तर मी पूजीं अपुल्याला,
आपल्यामध्ये विश्व पाहुनी पूजीं मी विश्वाला;
'मी' हा शब्दच मजला नलगे; ...

अशी आहे. हस्तलिखितांत मात्र केशवसुतांनी आधी या कडव्याची सुरुवात

"देवहि नाही माझ्यावरता, मी पूजीं आपुल्याला,"

या ओळीने केली होती. 'स्फूर्ति' ही कविता २३ मे १८९६ या तारखेची आहे. त्या कवितेतील

"अडवितील जर देव तरी। झगडू त्यांच्याशी निकरी
हार न खाऊ रतीभरी!
देवदानवा नरे निर्मिले, हे मत लोकां कळवूं द्या!"

या ओळींतील देवविषयक उद्‌गार आणि 'नवा शिपाई' या कवितेतील 'देवहि नाही माझ्यावरता' हे केशवसुतांचे पहिले परंतु नंतर बदललेले उद्‌गार यांतील साम्य फारच बोलके आहे.

विशेष ठळक फरक 'नवा शिपाई' या कवितेच्या शेवटच्या म्हणजे चौथ्या कडव्यात आढळतात. छापील कवितेत ज्या ओळी आहेत त्या अशा—

अशी स्थिति ही असे जनीं!
कलह कसा जाईल मिटुनी?—
चिन्ता वागे हीच मनी

शांतीचे साम्राज्य स्थापू बघत काळ जो आहे.
प्रेषित त्याच्या नव्या दमाचा शूर शिपाई आहे!

परंतु हस्तलिखितांत आधी लिहिलेला याच पद्य पंक्तीचा मजकूर पुष्कळच निराळ्या आशयाचा आहे. प्रथम केशवसुतांनी या ओळी अशा लिहिल्या होत्या—

"अज्ञ जनांचा हा हलवा
मिटविल का तो कलह-लवा?
दंड भेद ते दुरि पळवा,
शान्तीचे साम्राज्य स्थापिति सामदाम दोघे हे
प्रेषित त्यांचा नव्या दमाचा शूर शिपाई आहे?"

यांतील 'साम-दाम-दंड-भेद' या चतुष्टयांचा वापर दुरुस्त केलेल्या व छापलेल्या कवितेत केशवसुतांनी बदलला आहे. दंड आणि भेद यांच्या-ऐवजी साम-दामाचा उपयोग करून शांतीचे साम्राज्य स्थापले जात आहे. त्या प्रयत्नाचा अग्रदूत म्हणून हा नवा शिपाई येत आहे असे येथे प्रथम सूचित करण्याचा कवीचा उद्देश होता. हे साम-दामाचे प्रयत्न कोणते ते निश्चितपणाने सांगणे कठीण आहे. रॅन्डच्या खुनामुळे १८९७ मध्ये महाराष्ट्रात जे दहशतीचे वातावरण निर्माण झाले त्याचा विचार या संदर्भात करता येईल काय हे मला सांगता येणार नाही.

इतर बदल कोणते आहेत ते ठळकपणाने सूचित करण्यासाठी त्यांच्याविषयीही थोडेसे लिहिले. परंतु मुख्य गोष्ट जी मला प्रतीत होत होती व गेले कित्येक महिने या कवितेच्या संदर्भात वारंवार अभ्यासू चिकित्सकांच्या पुढे मांडावी असे वाटत होते ती 'नवा शिपाई' ही कविता 'मुक्तिफौज' किंवा तत्सम कोणत्या तरी ख्रिस्ती धर्मसंघटनेच्या प्रेरणेतून स्फुरली आहे ही होय. मुक्तिफौजेत प्रत्येक सदस्य हा 'शिपाई' असतो; त्यांचे 'नवा शिपाई' असे नियतकालिक तेव्हां निघत होते, त्या संघटनेचा प्रमुख बूथ-टकर हा 'कोण मला वठणीला आणू शकतो ते मी पाहे' अशा निर्धाराने आपल्या मानवताप्रेमी कार्याला ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्याच्या उद्देशाने लागलेला होता, टिळकांनी धर्मांतर केल्यामुळे त्यांची सुरवातीला अतिशय अवहेलना होत होती– या सर्व बाबींचा सामग्र्याने विचार केल्यावर असा अंदाज योग्य होता. तो हस्तलिखितांतील 'बाडगे' या मूळ शब्दामुळे पूर्णपणे खरा ठरला आहे असे मला वाटते.

ही कविता केशवसुतांच्या श्रेष्ठ कवितांपैकी एक अशी मानली जाते. ती मात्र केवळ तिच्यातील तात्त्विक आशयामुळे नसून एका अतीव मनोहर अशा तिच्यातील पद्यबंधामुळेही होय. मुक्तिफौजेच्या आधारभूत कल्पनेवर भारतीय आध्यात्मिक विचारसरणीचे बेमालूम कलम करण्यात आणि कोमलपणाची काव्यपूर्ण उभारणी करणाऱ्या प्रतिमा साकार करण्यात केशवसुतांचे या कवितेतील यश सामावलेले आहे. संपूर्ण हल्ल्याचे रूपक थोडेसे क्लिष्ट काही जणांना वाटले तरी ख्रिस्ती धर्माची परकी परिभाषा टाळणारे झाले असून भारतीय जीवनांत मुरलेले आहे.

कोठेही जा-पायाखाली तृणावृता भू-दिसते,
कोठेही जा-डोईवरते दिसते नीलांबर ते

सांवलीत गोजिरी मुले,
उन्हांत दिसती गोड फुले,
बघत मन हर्षून डुले,

तीं माझीं, मी त्यांचा,– एकच ओघ अम्हांतुनि वाहे ।
नव्या मनूतिल नव्या दमाचा शूर शिपाई आहे ।

हा जो दुसरा पद्यबंध या कवितेत आहे तो या कवितेला अविस्मरणीय टवटवीतपणा प्राप्त करून देणारा ठरला आहे. एकूण चार पद्यबंधांपैकी हा दुसरा इतका रसरशीत आणि स्वयंपूर्ण उतरला की, यात कुठेही खाडाखोड केलेली आढळत नाही. या कडव्याचे ‘ नवा शिपाई ’ या कवितेतील महत्त्व ध्यानी आणावयचे झाल्यास तो वगळून ही कविता किती निष्प्रभ होईल ते पाहावे. वास्तविक तात्त्विक आशयाच्या दृष्टीने यात इतर कडव्यापेक्षा तसा मजकूर अगदीच थोडा आहे. परंतु कवितेला गोडी निर्माण करून देण्याचे सामर्थ्य या कडव्यातच आहे.

◆ ◆ ◆

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.................... वि: ....................
क्रमांक .................... नोंद दि: ....................

*विभाग २ रा*

# गेल्या साठ वर्षांतील केशवसुतविषयक टीकालेख

**'यांची कविता बरी आहे.'**

आपली कविता प्रसिद्धीला पाठविल्यानंतर तिच्याविषयी संपादक मंडळींनी प्रगट केलेला उत्तेजनपर अभिप्राय, दाखविलेले अगत्य आणि जाहीर रीतीने त्या अभिप्रायाची प्रसिद्धी एवढेच केशवसुत स्वतःच्या हयातीत पाहू शकले. काव्यरत्नावलीच्या जून १८९९ च्या अंकात वामन दाजी ओक यांच्यावरील मृत्युलेख लिहिताना संपादक म्हणतात, 'रत्नावलीत ज्या कविता प्रसिद्ध होतात त्या अगोदर काव्यपरीक्षक कमेटीकडे तपासण्यास जातात.' त्याप्रमाणे केशवसुतांच्या कविता या कमेटीकडे पूर्वी पाठविल्या गेल्या असल्या पाहिजेत. त्यांच्याविषयीचे अभिप्राय काय असावेत याविषयी तर्क लढविण्यात येतात. 'कविता आणि कवी' या त्यांच्या ३० डिसेंबर १८८६ सालच्या कवितेत

स्वभावभूयिष्ठ जिच्यात माधुरी<br>
अशी तुम्हाला कविता रुचे जरी<br>
कवीस सोडा कवितेबरोबरी<br>
न जाच वाटेस तयाचिया तरी

हे जे कडवे आहे त्यातील 'स्वभावभूयिष्ठ माधुरी' हा संस्कृतप्रचुर शब्द हरि माधव पंडित व वामन दाजी ओक या परीक्षकांचा आवडता शब्द होता व ओकांना उद्देशून ही शब्दयोजना असावी असे अनुमान करण्यात येते. कमेटीचा आरंभीचा दृष्टिकोन पुढे निवळला असावा. कारण १८९९ च्याच काव्यरत्नावलीत केशवसुतांविषयी लिहिताना संपादक म्हणतात, "केशवसुत कवीच्या चार कविता आलेल्या आहेत. यांच्या कवितेविषयी आमच्या एका बंधूंने लिहिले आहे की यांची 'प्रणयकथन' ही कविता वाचून शेले कवीच्या 'प्रीतिमीमांसेची' स्मृती होते. यांची कविता बरी आहे. अशीच वारंवार केशवसुताने रत्नावलीवर कृपा ठेवली तर तिच्या उन्नतीची दिशा बरीच विस्तृत होईल." १९०० च्या रत्नावलीतही 'या कवीचा परिचय आमच्या वाचकवर्गास आहे. यापुढे ते असेच साह्य देऊन विस्तृत रीतीने मालागुंफन करतील अशी आम्ही आशा करतो.' असे संपादकांनी त्यांच्या त्या वर्षीच्या रत्नावलीत प्रसिद्ध झालेल्या चार कवितांचा उल्लेख करून म्हटले आहे. स्वतःच्या कवितेविषयी प्रसिद्ध झालेले एवढेच त्रोटक लेखन केशवसुतांनी पाहिले. वास्तविक त्यांचा जो निवडक मित्रपरिवार होता त्या मंडळीशी पत्रव्यवहार पुष्कळच झाला असला पाहिजे. परंतु किरातांनी लिहिलेल्या केशवसुतांवरील मृत्युलेखात जेवढे पत्रांचे त्रोटक इंग्रजी उतारे आहेत तेवढेच आता उपलब्ध आहेत. मनोरंजनाचे संपादक मित्र, 'विद्यार्थीमित्र' चे संपादक भांगले, वा. ब. पटवर्धन, ना. वा. टिळक, ह. ना. आपटे यांच्याशी त्यांचा पत्रव्यवहार नक्कीच झाला असला पाहिजे. परंतु तो कालोदरात गडप झालासे दिसते. त्यामुळे या चार पाच संपादक मित्रांचा त्या वेळचा अभिप्राय पहावयास मिळणे असंभवनीय आहे. तथापि केशवसुतांना इतर थोडे मागाहून येणारे कवी फारच मान देत असत, ही गोष्ट रहाळकरांच्या मनोरंजनातील १९०२ च्या 'केशवसुतास' या कवितेवरून आणि ज. वा. हर्षे या बेतशीर कवित्वशक्तीच्या इसमानी १९०५साली त्यांच्याकडून मार्गदर्शन व्हावे म्हणून लिहिलेल्या आर्जवी पत्रावरून उघड दिसते. किंबहुना ना. वा. टिळक यांनी केशवसुतांच्या हयातीत त्यांना आपल्या बरोबरीचे मानले असण्याची

फार शक्यता आहे. केशवसुतांच्या मृत्यूनंतर तर त्यांची श्रेष्ठता उत्कट भावाविष्काराने त्यानी वर्णिली आहे.

केशवसुतावरील मृत्युलेख अनेक नियतकालिकात आले असावेत ही अपेक्षा चुकीची ठरेल. केसरी, विविधज्ञानविस्तार, सरस्वतीमंदिर यातून तर हे मृत्युलेख किंवा वार्ता देखील प्रसिद्ध झाल्याचे दिसत नाही. विविधज्ञानविस्तारांत त्यांचे धाकटे बंधु सी. के. दामले यांच्या कविता 'मार्गण' या नावाने केशवसुतांच्या हयातीतच प्रसिद्ध होत होत्या. सी. के. दामले पदवीधर व वकीलही होते हे त्यांच्या कविता स्वीकारल्या जाण्याचे कारण आणि केशवसुत पदवीधर नव्हते हे त्यांच्या नाकारल्या जाण्याचे कारण असे मानण्याकडे काहींचा कल होतो. परंतु याची उपपत्ति कशीही लावली गेली तरी निदान केशवसुतांच्या निधनाची वार्ता या नियतकालिकांतून यावयास पाहिजे होती असे वाटते. 'सरस्वती-मंदिर' या अनियमितपणे प्रसिद्ध होणाऱ्या मासिकाशी बा. अ. भिडे यांचा अतिशय नकटचा संबंध होता. परंतु केशवसुतांच्या निधनामुळे मराठी वा थाची जी हानी झाली ती लक्ष्यात येण्याएवढी महती केशवसु या नावाला प्राप्त व्हावयाला अवकाश होता.

तरीही प्रत्यक्ष केशवसुतांची कविता हा चर्चेचा विषय नसला तरी काव्यविषयक विचारांची फेरतपासणी त्या कवितेमुळे सुरू झाली होती. त्या कवितेमुळे आणि त्या कवितेला पार्श्वभूमी ठरावी अशी चिपळूण-करांच्या निबंध मालेतील काव्यविषयक विचिकित्सा, इंग्रजी कवितेचा डेक्कन कॉलेज व मुंबईची कॉलेजे येथे सुरू झालेला अभ्यास, आगरकरांचे काव्यविषयावरील विचार, विविधज्ञान–विस्तारातून मधून मधून येणारे काव्य विवेचनाचे लेख, आजगांवकर आणि इतर जुन्या कवितेचे समर्थक यांनी नव्या कवितेवर केलेले केशवसुतांच्या निधनानंतरचे हल्ले आणि या गूढळ झालेल्या वातावरणाला उच्च तात्त्विक बैठक प्राप्त करून देणारे वासुदेव बळवंत पटवर्धन यांचे 'काव्य आणि काव्योदय' हे लहानसे पुस्तक या सर्वांचा विचार येथे अभिप्रेत आहे. वर्डस्वर्थला आपण काव्य-प्रांतात नेमके कोणते बदल घडवू इच्छित आहोत याची बरीच जाणीव होती आणि शिवाय त्याला कोलरिजसारखा समर्थक भेटला. परंतु

केशवसुतांना एकट्यालाच आणि नव्या दिशेची बरोबर जाणीव नसताना काव्य क्षेत्रातील हवा बदलण्याचे कार्य करावे लागले असे आपण मानतो बंडखोरीचे असे आवेशपूर्ण उद्‌गार केशवसुतांना वारंवार काढावे लागले आहेत हे खरेच. परंतु टिळक आणि वासुदेव बळवंत पटवर्धन यांच्या सहविचाराचा हिस्सा ध्यानी घेणे अवश्य आहे हेही खरेच.

केशवसुतांच्या कविता संग्रहरुपाने अवतरण्यापूर्वी त्यांच्या काही प्रसिद्ध कवितांची मोहिनी इतर प्रतिभासंपन्न कवींवर फार काळ पडली होती हे बालकवी आणि गोविंदाग्रज यांच्या उदाहरणावरून कोणीही सांगेल. आपल्या कविता मनोरंजनाकडे प्रसिद्धीला पाठविताना आपण 'तुतारी–मंडळ' असे मुद्दाम लिहीत असतो, परंतु मित्र ते अभिधान छापत नाहीत अशी सौम्य तक्रार बालकवी एका पत्रात करताना आढळतात. गडकऱ्यांनी तर तुतारी-मंडळाला विशेषच स्फुरण आणले. रेंदाळकर यांनी केशवसुतांच्या कवितेवरून स्फूर्ति घेऊन निर्यमक कवितेची कैफियत जोरात लढविली. 'आधुनिक कवितेचे जनक' या आपल्या लेखात बालकवी यानी १९१२ सालीच केशवसुतांच्या प्रसिद्ध कवितांची थोरवी अमान्य होण्याजोगी नाही हे स्वभावजन्य आर्जवाने रसिकांना सांगितले.

## कवितासंग्रहाविषयीची उत्कंठा

'कवींचे कवी' हे रहाळकरांनी १९०२ साली केलेले केशवसुतांचे वर्णन, अशा रीतीने त्यांच्या कवितांचे टीकात्मक लेखरूपाने रसग्रहण होण्याआधी पंधरा वर्षे, वेगवेगळ्या कवींच्या गौरवपूर्ण करभाराने सार्थ होत होते. नारायण केशव बेहेरे यांनी पुण्याच्या विहार मासिकाच्या १९१४ च्या जुलै अंकात एक कविता छापली. तिच्यातही रहाळकरांप्रमाणेच केशवसुतांचा कवितासंग्रह केव्हा प्रसिद्ध होणार याविषयीची उत्कंठा व्यक्त केली होती.

ही उत्कंठा दोन वेगवेगळ्या प्रयत्नांनी पूर्ण होणार होती. परंतु त्या प्रयत्नांपैकी एक लहान प्रयत्न दुसऱ्या मोठ्या संकल्पाच्या मार्गात आल्यासारखे झाल्यामुळे हे कवितासंग्रह उठावदार झाले नाहीत.

याविषयीची हकीकत कै. ना. म. भिडे यांनी मनोहर मासिकाच्या जून १९५९ च्या अंकात दिली आहे. भिडे, अनंततनय, निफाडकर या मंडळींनी चालविलेल्या वीणामंडळाने ठरविले की, केशवसुतांच्या कविता प्रसिद्ध करावयाच्या. वीणामंडळाच्या कल्पनेप्रमाणे फक्त २५-२६ कविताच नारायण वामन टिळक यांच्या प्रस्तावनेसह प्रसिद्ध करावयाच्या होत्या. परंतु त्या संकल्पाची जाहिरात डिसेंबर १९१६ च्या काव्यरत्नावलीत आली तेव्हा केशवसुतांची सर्व कविता छापली जाणार असून तिचे पुस्तक तयार होणार आहे असा मजकूर चुकून आला. हे पाहिल्याबरोबर हरि नारायण आपटे यानी आपल्याजवळ छापून तयार असलेले कवितेचे फर्मे घाईने एकत्र केले व ते पुस्तक प्रस्तावनेशिवायच बाजारात आले. हा काव्यसंग्रह घाईने प्रसिद्ध झाला त्याला हे कारण असावेच. परंतु छापलेले फर्मे आपट्यांच्याकडे पडून राहिले होते याचे कारण काय असावे याचा उलगडा व्हायचा झाल्यास आपट्यांच्या आवृत्तीच्या पाठीमागे शंकर काशीनाथ गर्गे यांचे प्रयत्न चालू होते हे ध्यानी घेतले पाहिजे. केशवसुतांच्या कवितांची पाठभेद तपासून एक शुद्ध आवृत्ती तयार करावी ही गर्ग्यांची मनीषा असल्याने १९११ सालापासूनच ते या शोधात असत. वा. ब. पटवर्धन यांचेही त्यांना साहचर्य लाभले होते व आपटे ही शुद्ध प्रत जेव्हा तयार होईल तेव्हा छापण्यास तयार होते. म्हणून छापलेले फर्मे गर्ग्यांच्या चिकित्सेनंतर कायम व्हावयाचे होते असे अनुमान बळावते. मात्र हे फक्त अनुमान आहे. या विषयी सूचक उल्लेख खुद्द गर्ग्यांनीच पुढे केशवसुतांच्या कवितांतील पाठभेदांवर जे मनोरंजनात लिहिले त्यात मिळतात. माधवराव पटवर्धन यानी या काळांत गर्ग्यांच्याकडून जे कार्य होत होते ते प्रशंसिले असून तांबे यांची कविता संपादित करताना स्वतःच्या नजरेसमोर ठेवले आहे. गर्ग्यांच्या मनाप्रमाणे हे पाठभेद-चिकित्सेचे काम पूर्ण होऊन मग तो संग्रह प्रसिद्ध झाला असता तर त्याची महती आणखी अनेक रीतीनेही वाढली असती. हरि नारायण आपटे यांची प्रस्तावना, वा. ब. पटवर्धन यांचा कविचरित्रावरील लेख यांची जोड त्याला मिळण्यासारखी होती. ( वासुदेवराव पटवर्धन यांनी १९१९ साली ७ नोव्हेंबरला केशवसुतांचा

स्मृतिदिन पुण्यास प्रथम साजरा केला ' आणि व्याख्यानातून ते तरुण-पिढीपुढे केशवसुतांची तरफदारी करण्याची संधी वाया घालवीत नसत.' असे माधवराव पटवर्धन यांनी नमूद करून ठेवले आहे. )

पण ना. म. भिडे यांच्या छोट्या संग्रहाच्या दिशाभूल करणाऱ्या जाहिरातीमुळे या प्रयत्नावर विरजण पडले. मात्र त्यांच्या छोट्या संग्रहाचे माहात्म्य टिळकांच्या प्रस्तावनेमुळे असामान्य आहे. त्यांच्या संग्रहात केशवसुतांच्या नव्हत्या त्या कविताही आल्या होत्या. तरी देखील नारायण वामन टिळक यांनी त्यांचा निर्देश करून या संग्रहाला जी छोटी परंतु मार्मिक प्रस्तावना लिहिली तिचे मोल फक्त आजच समजू शकते.

## केशवसुत-रसग्रहणाचा पहिला मार्मिक प्रयत्न

ती प्रस्तावना ' केशवसुत–समीक्षा ' या ठोकळ प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या पुस्तकात समाविष्ट केली गेली नाही. मात्र ' प्रतिष्ठान ' मासिकाच्या आक्टोबर १९६६ च्या अंकात अलीकडे ती पुन्हा प्रसिद्ध करण्यात आली आहे. १९६२ साली वि. म. कुलकर्णी आणि गो. म. कुलकर्णी या दोघांनी संपादित केलेल्या ' झपूर्झा ' या केशवसुतांच्या कविता संग्रहातील परिशिष्टांत तिच्यातील एक लहानसे अवतरण दिले आहे. केशवसुत-रसग्रहणाचा पहिला मार्मिक प्रयत्न म्हणून तिचा निर्देश करण्यापूर्वी मात्र विठ्ठलराव घाटे यानी इंदूर येथे रहाळकरांच्या-कडून माहिती मिळवून जो एक दीर्घ निबंध तेथील साहित्यसभेपुढे वाचला होता व ज्याचा उल्लेख त्यांनी आपल्या ' दिवस असे होते ' या नमुनेदार आत्मचरित्रात केला आहे तो आता मिळू शकत नाही हे सांगितले पाहिजे. आणि कालक्रमाचाच विचार करायचा तर तांबे यांच्या ' आधुनिक चिंतनपर काव्ये ' या ज्ञानांजन मासिकातील लेखां-कापैकी पहिला मे १९१३ मधील लेखांकही विचारात घेतला पाहिजे. ' ज्ञानांजन ' मासिक आजगावकर चालवीत होते, हे ध्यानी घेतल्यावर त्या मासिकातील धोरण तेव्हाच्या नव्या कवितेला अनुकूल नसावे हे स्वाभाविकच आहे. परंतु तांब्यांच्या लेखात एका विशिष्ट काव्यसंप्रदाया-संबंधी तेव्हांची त्यांची नापसंती व्यक्त झाली आहे व तो संप्रदाय म्हणजे

'झपूर्झा' संप्रदाय होय. 'तांबे-व्यक्ति आणि कला '(१९३५) या पुस्तकात तांब्यांचे गद्य लेखहि दिले आहेत; त्यात ही लेखमाला पुन्हा छापलेली आहेच. तांबे आपल्या १९१३ च्या लेखांत म्हणतात, 'अलीकडे चांगल्या नावाजलेल्या कवींच्या लेखणीतून 'वेडा', 'अश्रुगुच्छ', 'वेडगाणे' इ. इ. सारख्या कविता वारंवार बाहेर पडलेल्या वाचून या कविमित्रांचे ध्येय तरी काय असावे, असा प्रश्न उत्पन्न होऊन यास कविता म्हणजे काय याची नीटशी अटकळ तरी झाली आहे की नाही अशी कुशंका मनात उद्भवते. अशा चिंतनपर ( reflective ) कविता अलीकडे विशेष उद्भवण्याचे कारण काय, सत्काव्यलेखनाचा हेतु काय, त्याचे खरे श्रेय कोणते इ. प्रश्नांचा ऊहापोह होऊन वेळीच त्यांचा निकाल लागणे माझ्या अल्प समजुतीप्रमाणे अत्यंत आवश्यक आहे.

.. माझी अशी समजूत होऊ लागली आहे की काव्यलेखनासंबंधाने आमच्या कविमित्रांचे काही ठाम पूर्वग्रह ( prejudices ) होऊन चुकले असावेत...काव्यात मुख्यत्वेकरून भावजागृति करण्याचे, हृदय हलवून सोडण्याचे सामर्थ्य पाहिजे. रस हा काव्याचा आत्मा होय ... काव्यात मुख्यत्वेकरून भाव पाहिजे. तेव्हा या प्रश्नास उत्तर काय देणार ?' त्या वेळच्या अशा कवितेवर 'भारी फंदी ढोंगी' असा आरोप करून तांबे अशा चिंतनपर काव्यात 'तुमच्या विचाराने की भावाने गूढतेचे ( mysticism ) पांघरूण घेतले आहे .. तुमचे काय म्हणणे असेल ते सरळ शब्दांनी समजावून सांगा.' असे कवींना बजावताना दिसतात. या कवितांनी 'मेंदूस व्यायाम होतो. त्यात समीकरणक्रिया दिसत नाहीत, पृथक्करणक्रिया दिसते' आणि 'पृथक्करणशीलता हा शास्त्रांचा फार झाले तर तत्त्वज्ञानाचा स्वभाव आहे, काव्याचा नाही.' असे ते पुढे म्हणतात. ह्या कवितांची रचना 'गूढ क्लिष्ट असते.' वैणिक गीतांच्या प्रांतात वास्तविक निमंत्रित अधिकारी पुरुषास पाय ठेवण्यासदेखील संकोच वाटावा तेथे हे गायनकलेचा ओनामाहि माहीत नसणारे हस्सूखां आणि हद्दूखां हिंडताना आढळतात याबद्दल तांब्याना अतिशय विषाद वाटत असलेला दिसतो. कवितादेवीची या कवींनी जी 'दुर्दशा' चालविली आहे तिचे स्वरूप

सांगताना ते म्हणतात, 'एक तीवर फिर्याद लावतो तर दुसरा तिच्याशी लाडीगोडी करतो, तिसरा तिला सखी म्हणून आलिंगन देऊ पाहतो. असो. तात्पर्य काय कीं, चिंतनपर कवितांनी वैणिक गीतांचा पेहराव करून त्यात शिरू पाहणे म्हणजे एकाद्या वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध स्त्रीने चंचळ विजेप्रमाणे चमकणाऱ्या कोमल उंची वस्त्रालंकारांनी विभूषित 'रुचिरस्वरवर्णपदा रसभाववती जगन्मनो हरति' अशा नवयुवतींच्या रासक्रीडेत शिरू पाहणे होय.'

तांब्यांचा हा सारा रोख 'झपूर्झा'च्या अनुकरणाने पछाडलेल्या कवितेवर होता, हे निःसंदिग्ध रीतीने सबंध लेखांत प्रतिबिंबित झालेच आहे. परंतु लेखाच्या तिसऱ्या विभागापासून स्पष्टपणेच त्यानी 'झपूर्झा' या कवितेबद्दलची आपली नाराजी व्यक्त केली आहे. "जणू काय विचारगौरव हेच काव्याचे सर्वस्व होय, असे या कवीस वाटत असावे! जळगावच्या कविसंमेलनात प. वा. केशवसुतांच्या 'झपूर्झा'चे देव्हारे चालले असता, एका चांगल्या नावाजलेल्या कवीने मजपाशी उद्‌गार काढलेले आठवतात, 'केशवसुतांच्या कविता म्हणजे अति गहन; अशा तश्या लेच्यापेच्या वाचकाच्या समजुतीत येणे देखील कठीण!' आमच्या कवीस गहनता पाहिजे आहे, पण काव्याची गहनता म्हणजे काय याची त्यास चांगलीशी अटकळ झाली नसावी असे वाटते. काव्याची गहनता म्हणजे काही नीतिशास्त्र किंवा तत्त्वज्ञानाचे प्रदर्शन नव्हे. ... भावाची गहनता म्हणजे त्याचा उदय कसा होतो, प्रकर्ष कसा होतो, त्याचे स्थूल आणि सूक्ष्म व्यापार कसे चालतात, परस्परभिन्न अशा भावांचा संकर कसा होतो, परिणाम काय होतात; याविषयींचे यथास्थित ज्ञान. त्यांत सृष्टिसौंदर्यापासून उत्पन्न होणारे मनोभावदेखील आले...प्रतिभेचा स्वभावच असा आहे की तिला कोणत्याही प्रकारचा बाणा, अभिमान खपतच नाही...' मॅथ्यू आर्नोल्डच्या वडस्वर्थवरील निबंधापैकी काही ओळी आपल्या प्रतिपादनाच्या समर्थनार्थ देऊन तांबे यांनी ही जी मीमांसा केली आहे ती 'रोमॅंटिक' कवितेचे कीटसूला अभिप्रेत असलेले अंग चांगल्या तऱ्हेने विशद करणारी आहे यांत शंकाच नाही. परंतु 'जगाने नीतिमान् शहाणे व्हावे' या

उद्देशाने— उपयुक्ततावादाने— प्रेरित होऊन कविता लिहिणारे हे कवी असे तांबे यांनी त्यांना का संबोधावे ते कळत नाही. विशेषतः 'झपूर्झा' या कवितेवर त्यांनी कडाडून टीका करावी हे त्यांनीच या लेखांकाच्या अखेरीला निरुपायाने 'कालाय तस्मै नमः' असे म्हणून ठेवले आहे त्याच धर्तीचे मानले पाहिजे. तांबे केशवसुतांच्या कल्माची बरोबरी वर्डस्वर्थच्या कलमाशी करतात ते केशवसुतांच्या या ओळी वाचून.

रम्य धुक्याची अंधुक सृष्टि । त्यात उघडसी अपुली दृष्टि ॥
मग तो भास्वान् तुजवरि करितो । तेजाची वृष्टि ॥

आणि 'पुष्पाप्रत' या कवितेतील या रम्य ओळी लिहिणाऱ्या केशवसुतानीच "'झपूर्झा'सारखे नीरस काव्य" लिहावे काय? असा प्रश्न विचारतात. "'कालाय तस्मै नमः' दुसरे काय म्हणायचे?" "'कर्मफलाचा हेतु धरू नको' हा भगवंतांचा अत्युन्नत आदेश कोठे आणि कर्मफलाचा नक्षा तयार करून नंतर कर्मसंकल्प करावयाची आमच्या मनूची दृष्टि कोठे! या अधोगतीचा परिणाम वरील 'झपूर्झा' काव्यात दिसत नाही?"

'झपूर्झा' या कवितेवर आणि विशेषतः चिंतनपर कवितेवर तांब्यानी त्या वेळी जी राळ उडविली तिची ही थोडीशी सविस्तर माहिती माधवराव पटवर्धनांच्या केशवसुतावरील दीर्घ विवेचनाची पार्श्वभूमि तयार करते. 'झपूर्झा' बद्दलची सर्वसाधारण प्रतिक्रिया १९१५ मधल्या विविधज्ञानविस्तारातील एका लेखावरून देखील समजण्यासारखी आहे. 'झपूर्झा' अथवा 'टला ट रीला री' ह्या कवितांसारख्या काही कवितांत खरोखरी काही अर्थ असेल की नाही याचीच आम्हास शंका येते. 'असल्या कवींनी वाचकांस सज्ञान करावयाचे आपले काम सोडून दिलेले असते असे या समालोचकाचे म्हणणे आहे.' 'स्वप्राणांनी तुतारी फुंकून' समाजास जागृत करण्याची इच्छा धरून जर क्वचित् एखाद्याने गोफणीने 'हाणाहाण' केली तर खपेल; पण नुसती हाणाहाण खपणार नाहीं." "ज्या आमच्या समाजांत

अद्याप शेकडा ८०।९० लोक निरक्षर आहेत त्या समाजांत ह्या जातीच्या कवितेपासून तादृश काही उपयोग होण्याचा संभव नाही. ” त्या वेळच्या कविवर्यांना या ‘ आधुनिक व जुनी आणि सयमक व निर्यमक कविता ’ नावाच्या लेखाचा हा उपदेशक आदेशितो की, ‘ महाराज!... कै. केशवसुतानी ज्याप्रमाणे तुतारी फुंकली त्याप्रमाणे तुम्हीही तुतान्या फुंका, व समाजास जागृत करा. ’ ही प्रतिक्रिया तांब्याना अभिप्रेत असलेल्या विशुद्ध काव्यानंदाशी किती विसंगत आहे ते स्पष्ट करण्याची जरूरीच नाही. फक्त या लेखात केशवसुताच्या कवितांची लेखकाला असलेली स्मृति नवलाची वाटते. कारण केशवसुतांच्या कविता काही इतर कवितासंग्रहात असतील तेवढ्याच. त्यांचा कवितासंग्रह अजून प्रसिद्ध व्हायचाच होता.

तो गुच्छरूपाने प्रसिद्ध झाला तेव्हा नारायण वामन टिळक यांनी जी त्या कवितेची ठेवण उलगडून दाखविली ती केशवसुतसमीक्षेतील अतिशय महत्त्वपूर्ण जाणीव म्हणावी लागेल.

“ केशवसुताची बहुतेक सारी कविता स्फुट असून तीही फार नाही; तिचे प्रकाशनही वृत्तपत्रातून व मासिक पुस्तकातून झालेले; आणि हळूहळू आता एक तप होत आलेले; असे असून देहाने अस्तंगत झालेल्या या कविमहात्म्याचा प्रकाश अस्तंगत न होता उलट वाढत्या प्रमाणावर असावा हे आश्चर्य आहे. या आश्चर्याची मीमांसा करणे फारसे कठीण नाही. जिला अलंकार म्हणजे काय हेसुद्धा ठाऊक नाही, जिची आणि उपचारांची ओळख नाही, जिला लोक काय म्हणतील याची पर्वा नाही, साधेपणावाचून दुसरे वस्त्राभरण जिने कधी पाहिले नाही, अशी नुसते ओजस, परंतु अमर्याद ओजस आणि नुसते सौंदर्य परंतु अप्रतिम सौंदर्य घेऊन महाराष्ट्रीयापुढे येऊन उभी राहणारी ही एवढीच कवितावधू असल्यामुळे तिच्या निर्मित्याकडे महाराष्ट्रीय जग आश्चर्याने पहात आहे. केशवसुताच्या कवितेत ओजस भरून उरले आहे, कधी कधी ते इतके प्रकट झालेले आहे की, साधारण माणसाला त्याचे पूर्णपणे दर्शन होणे शक्यच नाही. ”

“ या कवीची प्रतिभा अथपासून इतिपर्यंत जशी होती तशी होती. ती कधी वाढली नाही, कधी कमी झाली नाही, कधी हा ओघ सोडून त्या ओघाकडे वळली नाही. तिच्यावर त्याच्या स्वतःच्या किंवा इतरांच्या परिस्थितीचा काही एक परिणाम झाला नाही. केशवसुताच्या कवितेत ही कविता बाळपणची, ही तरुणपणची अशी वर्गावर्गी कधीही करिता याव-याची नाही.”

“ केशवसुताच्या कविता थोड्या आहेत व ते आणखी जगले असते तरी त्या थोड्याच रहात्या असे मला वाटते. ‘ यदुष्णतेने द्यावा पृथिवी द्रवुनि मिसळती वेगाने ’ असला प्याला ते इतका काठोकाठ प्यालेले असत की, त्याच्या गुंगीत त्यांच्या मुखातून जे निघते ते निघते; मी अमक्याकरता अमकी व इतकी गाणी गाईन असा विचार करून तो सिद्धीस नेणे, त्या गुंगीचेच सुख अनुभवणाऱ्या या कवीला शक्य नव्हते. ‘शब्दासंगे स्वर्गात ’ स्वर्गात उडून जाणारा ‘नव्या शिपायाचा ’ पोवाडा गातागाता ‘सकली मी भरूनी राहे ’ म्हणणारा ‘ ज्ञानाच्या कुंपणावरून उड्डाण करून ’ जाणारी ही ‘ चिद्घन चपळा ’ एकसारखा प्रकाश देत कशी राहणार? ही अशीच मधून मधून चमकली असती, आणि ही अशीच चमकावयास पाहिजे होती. पण हाय ! ‘ ईश्वरेच्छा ! ’

" ...अगदी परिचयाच्या साध्या व सरळ गोष्टी व त्यावरून सुचणारे ईश्वर–शक्तीचे व मानवी कर्तव्याचे विचार काव्यद्वाराने प्रगट करणे केशवसुताचे हातखंडा काम असे. केशवसुत हे मोठे कुशाग्रबुद्धीचे जातिवंत कवि होते, याची साक्ष एकट्या 'म्हातारी' या कवितेवरून होण्यासारखी आहे. ..."

टिळकांची सबंध प्रस्तावना या लेखात देता आली नाही तरी तिचा महत्त्वाचा भाग अंतर्भूत केला आहे. टिळकांच्या महत्त्वाच्या विधानांचा अर्थ त्यानीच विशद केला आहे. तो असा की, उत्स्फूर्त आलेल्या उद्‌गारांखेरीज केशवसुतांनी कविता लिहिण्याची तयारी ते आणखी जगले असते तरी देखील दाखविली नसती. अमुक विषयावर कविता अमक्याकरिता करावी हा प्रासंगिक व किफायतीचा विचार त्यांच्या मनाला अखेरपर्यंत शिवला नसता आणि तो मान्य होण्या-सारखा तर आहेच; पण तो टिळकानी त्या वेळीच पुढे मांडला यालाही महत्त्व आहे. केशवसुतांची कविता बालपणी आणि तरुणपणी एक-सारखीच राहिली असा सपाट अर्थ टिळकांच्या या पूर्वीच्या विधानातून घेणे चुकीचे होईल. केशवसुतांच्या कवितेत प्रतिभा आरंभापासून आढळते हे म्हणणे खरे असले तरी त्या कवितेची अंगे विकसित होत गेलेली आहेत हे पुढील टीकाकारांनी दाखवून दिलेले आहेच. हे दाख-वून देणाऱ्यांच्या कृत्रिमतेवर मात्र टिळकांचे हे मत हा उत्तम उतारा होईल.

## केशवसुत समीक्षेचे पहिले पर्व :

## १९१७ ते १९२६

केशवसुतांच्या कविता संग्रहरुपाने अवतरल्यानंतर पहिल्या नऊ दहा वर्षांत नामवंत कवींपेक्षा नामवंत विद्वानांनी आणि टीकाकारांनी तिचे हार्दिक स्वागत केले. डॉ. गुणे, प्रो. लागू, प्रो. सबनीस, बा. अ. भिडे, प्रो. वै. का राजवाडे, माडखोलकर, शंकर काशिनाथ गर्गे, वि. स. खांडेकर, वा. ब. पटवर्धन, श्री. म. वर्दे यांची नांवे या समीक्षेशी परिचय असणाऱ्याला सहज आढळतील. काही कवी या रसग्रहणात्मक टीकेत स्वतःच्या गौरवभावनेची भर उल्लेखनीय रीतीने घालीत होते, हे रहाळकर यांच्या 'केशवसुत आणि त्यांची कविता' या पुस्तकावरून दिसते; व साधुदास आणि नाथ निफाडकर यांच्या लेखावरूनही दिसते. या लेखनाची अधिक अचूक अशी कल्पना डॉ. केतकर यानी 'महाराष्ट्रीयांचे काव्य परीक्षण' या त्यांच्या पुस्तकासाठी जे साहित्य जमविले होते त्यातील लेख पहावयास मिळाले तर येऊ शकेल. त्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत त्यानी म्हटले आहे की, त्यांचा सुरवातीचा हेतु मासिकातून आणि नियतकालिकातून जे काव्यविषयक अभिप्राय किंवा समीक्षा प्रसिद्ध होते ती पाहून इंग्रजी राजवटीतील आधुनिक वाङ्मयाच्या परीक्षणाचा अभ्यास करण्याचा होता. त्या संकलनात त्यांच्या हाती प्रथमपासून कोणकोणते लेख लागले ते पाहिले गेले पाहिजे. त्यांनी जमविलेले ते साहित्य तसेच राहून गेले आहे. कदाचित् त्यांच्या जवळच्या साहित्यात १९१७ पासून पुढचे काही संकलित झाले नसेलही. परंतु आधीचे किती त्यानी संकलित केले होते ते शोधून काढून त्यांचे अपुरे कार्य करण्यांची गरज आहे. 'अर्वाचीन

मराठी वाङ्मयसेवक ' या खानोलकर यांच्या वेगवेगळ्या खंडातून अशी संकलनात्मक टीका पहायला मिळते हे खानोलकरांच्या परिश्रमाचे फलित. केशवसुतविषयक टीकालेखन संकलित करण्याच्या हेतु बाळगणारे एक त्या वेळचे केशवसुतभक्त म्हणजे बहुतेक मागील वर्षी वयोवृद्ध होऊन वारलेले ना. म. भिडे हे होत.

या कामी गो. गो. अधिकारी यानी जे प्रयत्न आरंभले होते ते फलद्रूप होऊ शकले नाहीत हे त्याना ठाऊक असल्याने १९२४ साली अधिकारी यानी योजिलेले केशवसुतावरील आठ लेखांचे पुस्तक प्रत्यक्षात अवतरले नाही; तेव्हा ' शारदा मंदिर ग्रंथमाला ' या नांवाने त्यानी व अनंततनय यानी ' काव्यचर्चा ' हे पुस्तक १९२५ सालीं प्रसिद्ध केले. या पुस्तकात केशवसुतावरील चार लेख व टिळक, विनायक, गोविंदाग्रज, चंद्रशेखर, बालकवि, लेंभे, दत्त, माधवानुज, तांबे, मोगरे, रेंदाळकर या कवींवर एकेक लेख ( कांहीवर दोन ) असे कविविषयक लेख त्यानी प्रसिद्ध केले. मात्र स्वतःचा संकल्प त्यानी मनाशी कायम ठेवला होता. तो त्यांच्या हातून पूर्ण झाला नाही तरी त्यांनी काही महत्त्वाचे दुर्मिळ असे टीकालेख आपल्या हाताने उतरून घेऊन स्वतःजवळ ठेवले होते. मनोहर मासिकातील जून १९५९ च्या अंकात त्यांनी आपल्या या लेखसंग्रहाची कल्पना वाचकांना दिली आहे.

सर्वसाधारणपणे या पर्वातील टीकेची दिशा केशवसुतांनी मराठी कवितावृक्षावर इंग्रजी काव्याचे कलम केले हे सूचित करणारी; कवितेतील ओजस्वी आशयामुळे समाजक्रांतीची त्यांनी तुतारी फुंकली, त्यांनी ' युगतेज ओळखले ' हे आवर्जून सांगणारी; त्यांच्या सृष्टिवर्णनपर कवितांमधील जडसृष्टि व मानवी भावना यांचा घडून आलेला मिलाफ

निदर्शनास आणून देणारी; मराठी कवितेला भाषा आणि रचना या दृष्टीने नवे वळण त्यांनी लावले हे पुकारणारी आणि महाराष्ट्राच्या लौकिक कवितेचा उदय केशवसुतांच्या भावगीतातून झाला असे निःशंकपणे प्रतिपादणारी अशी आढळते. या प्रत्येक गौरवप्रदानाच्या तपशिलात शिरून मागोवा घेतल्यास काही टीकाकार दिलखुलासपणे तो बहाल करीत आहेत तर काही थोडेसे हातचे राखून या गौरवात भागीदार झाले आहेत असे अर्थात आढळणारच. उदाहरणार्थ, केशवसुतांनी मराठी कविता आणि इंग्रजी कविता यांचा सांधा उत्कृष्ट रीतीने जुळविला हे मान्य करण्याबरोबरच त्यानी आपली काव्यसंस्कृती महाराष्ट्रीय इतिहास परंपरेतून पुरेशा प्रमाणात स्फूर्ति घेऊन जोपासली नाही म्हणून हळहळ व्यक्त करणारे परंतु केशवसुतांच्या कवितेची असामान्य महती गाणारे माधव गोविंद भिडे आपल्या 'राष्ट्रहितैषी' मधील लेखात म्हणतात, 'केशवसुत यांची कविता' हे पुस्तक केवळ बारा आण्यात विकण्यात येते असे जेव्हा मला कळले तेव्हा मला पराकाष्ठेचे वाईट वाटले. केशवसुतासारख्या कविश्रेष्ठाच्या रमणीय कविता प्राप्त करून घेण्यासाठी एक महिनाभर तरी तुपावाचून काढावा लागला पाहिजे अशी जेथे माझी अपेक्षा तेथे बंडगार्डनवर नुसते सोडून देण्यास जितके पैसे टांगेवाला मागतो तितके पैसेसुद्धा माझ्याजवळ पुस्तक विक्रेत्याने मागू नयेत हे पाहून मला माझ्या राष्ट्रीयत्वाची लाज वाटली. मोठ्या खिन्न मनाने मी एक प्रत विकत घेतली व रद्दीच्या भावाने विकण्यात येणारी ही अमूल्य पुस्तके रोज खपतात तरी किती म्हणून पुस्तक विक्रेत्यास वैतागाने विचारले. त्यावेळच्या त्याच्या उत्तराने एकाद्या मोटारीचा धक्का बसावा त्याप्रमाणे माझ्या मनास धक्का बसला. माझ्या वाचकांनी त्याने काय उत्तर दिले असेल हे ताडावे. कारण त्यांनी आणि त्यांच्या इष्टमित्रांनी ज्या प्रती उठविल्या असतील त्यांचाच हिशेब त्याने मला दिला असणार.

"वाचकहो, माझ्यासारख्या चित्रगुप्ताच्या वहीत अनास्थारूपी तुम्ही जोडीत असलेल्या पातकांची नोंद होत आहे ही गोष्ट कळल्यावर तरी काही आपले वर्तन सुधाराल काय ? ..." आपल्या या रसग्रहणात्मक

लेखात भिड्यांनी एके ठिकाणी म्हटले आहे, "केवळ मराठी भाषेत त्यांनी काव्ये लिहिली यापेक्षा जास्त जिव्हाळा मराठ्यांच्याविषयी केशवसुतांच्या ठायी असावयास हवा होता असे कोणासहि वाटणे अगदी साहजिक आहे... मराठी भाषा व मराठ्यांची राष्ट्रीय ध्येये, मराठ्यांच्या समजुती, महाराष्ट्र धर्म वगैरे गोष्टी ज्यांच्या काव्यात प्रतिबिंबित झाल्या असतील तोच खरा मराठी कवी. या दृष्टीने पाहाता मराठी भाषा व मराठ्यांची ध्येये या दोनच गोष्टी केशवसुतांच्या काव्यात प्रतिबिंबित झाल्यामुळे केशवसुतांना मराठी कवी म्हणावे किंवा कसे याचा विचार करण्यासारखा आहे..." परंतु पुढे हा टीकाकार केशवसुतांच्या सुंदर कवितावरील भाष्य पारतंत्र्याच्या जाचक परिस्थितीच्या अनुषंगाने करीत असून— "कोणत्याहि कारणासाठी कोणत्याही मनुष्याने केव्हाही स्वातंत्र्य गमावता कामा नये अशा प्रकारचा केशवसुतांचा ठाम सिद्धान्त होता. त्यांना मराठे परतंत्र दिसले. अर्थात्... केशवसुतांना एक प्रकारचा त्वेष चढला. मराठे रूढिराक्षसीस बळी पडले, त्यांना जातीमत्सराने पछाडले. ते आळशी व पूर्वजांच्या स्तुतिस्तोत्रात दंग झाले. वगैरे गोष्टीमुळेच मराठे स्वातंत्र्यास पारखे झाले...मराठ्यांनी रूढीराक्षसीचे निर्दालन करावे, उद्यमाची कास धरावी, पूर्वजांनी केलेल्या पराक्रमाविषयी बढाया मारणे सोडून द्यावे...असा त्यानी स्वकीयांस बोध केला. मराठे आलस्याच्या अगाध गर्तेत एखाद्या शेणातल्या किड्याप्रमाणे वळवळ करीत असलेले पाहून केशवसुतासारख्या कवीच्या शिव्याच काही जागृति उत्पन्न केली तर करतील ही जाणीव आता कोठे महाराष्ट्रांत उत्पन्न झाली आहे व याच कारणास्तव केशवसुत महाराष्ट्रांस आपलेसे वाटू लागतात." अशी ग्वाही देतो. भिड्यांच्या राष्ट्रहितैषी (२२।१०।१९१९) मधील 'केशवसुतांची काव्यसंस्कृति' या लेखातील उतारा थोडासा विस्ताराने दिला आहे याचे कारण हा लेख केशवसुत-समीक्षेच्या संकलकांना कोठे आढळलेला दिसत नाही. त्याचा उल्लेख माधवराव पटवर्धनांच्या प्रदीर्घ लेखात एकदा आलेला आहे; परंतु त्यांच्या किंवा इतर कोणत्याही केशवसुतविषयक लेखांच्या यादीत तो नावासह व अंकाच्या तारखेसह आलेला नाही. भिडे पुढे म्हणतात,

तुतारी या काव्याची महाराष्ट्राने पारायणे करावी ' असे मी त्यास सांगतो. ' स्फूर्ति व तुतारी ही दोन्ही काव्ये वाचून देशभक्तांच्या अंगी जी " कडकी उत्पन्न होणार ती घालविण्यास उतारा म्हणून ' नवा शिपाई ' हे त्यांचेच काव्य पठन करावे. देशाभिमानाची ज्योत जी अंत:करणात पेटवावयाची ती दुसऱ्यांचे स्वातंत्र्य हरण करण्यासाठी नव्हे..."

याचबरोबर भिड्यांच्या लेखांत केशवसुतांची स्वर्गकल्पना पुराणांतील स्वर्गकल्पनेपेक्षा कशी वेगळी होती याचेही सोदाहरण विवेचन केले असून तो लेख एकंदरीने वास्तविक केशवसुतांचे श्रेष्ठत्व सांगणारा असा असतांना माधवराव पटवर्धन यांनी तो ' विरुद्ध ' परीक्षणाचा ठरविला व " पण फारच थोड्या लोकांच्या ते लक्ष्यांत आहे " एवढेच म्हणून तो बाजूस सारला. याचे कारण तो त्यांना उपलब्ध झाला नसावा एवढेच असावे !

' झपूर्झा ' किंवा ' हरपलेले श्रेय ' या कवितांची विशेष महत्त्वाची स्वतंत्र परीक्षणे या कालखंडात थोडीच आढळतात. माडखोलकरांनी आपल्या पहिल्या लेखांत या कविताविषयी अतिशय रसिकपणाने लिहिले आहे. रहाळकर किंवा वै. का. राजवाडे यांनी केशवसुतांच्या प्रत्येक कवितेसंबंधीची आपली रसग्रहणक्षमता थोडक्यात वेगवेगळ्या लेखांकांनी प्रगट केली. त्या वेळी जे या कवितासंबंधी थोडक्यात म्हटले गेले ते व श्री. म. वर्दे यांचा ' झपूर्झा व म्हातारी ' हा लहानसा लेख यांखेरीज इतर काही दिसत नाही. मात्र एकंदरीने या पर्वातील टीकेचे महत्त्व अशासाठी आहे की, केशवसुतांवरील अभिप्राय थोडक्यात सांगताना राजवाडे, वा. ब. पटवर्धन किंवा गुणे यांनी त्यांची जी प्रशंसा केली त्यामुळे केशवसुतांच्या श्रेष्ठतेचा पाया इतका भक्कम रीतीने उभारला गेला की, पुढील टीकाकारांना वावदूकपणे उद्धटपणा केल्याखेरीज ही सुप्रातिष्ठित किर्ति डागळता येणे शक्य होणारे नव्हते. वासुदेव बळवंत पटवर्धन लिहितात, " केशवसुतांची काही काव्ये इतकी सरस उतरली आहेत की, ती आंग्ल कवीतील चांगल्या कवींच्या काव्यांत मिसळली तरी विशोभित दिसणार नाहीत. " राजवाडे आपल्या लेखांकांच्या अखेरीस लिहितात, " केशवसुत हा पहिल्या प्रतीचा कवि आहे हे मी

आनंदाने म्हणतो. कविप्रतिभेची महती केशसुतानेच गावी; योग्य शब्दांना त्यानेच पाचारण करावे; विरहदशा त्यानेच वर्णावी. मराठी भाषा अस्तित्वात राहील तोपर्यंत स्फूर्ति स्फुरण आणील, हृदयांच्या तातांची बनविलेली गोफण, भेकड, आत्मश्लाघा पूर्वजश्लाघा व हांजी हांजी करणाऱ्या लोकांवर शब्दाशब्दांचा असाच भडिमार करील. तुतारीची किंकाळी सर्वत्र ऐकू येऊन तात्कालिक तरी सुधारणेचा आवेश येईल, नवा शिपाई विश्वकुटुंबत्वाचा संचार करील, पण हरपले श्रेय नेहमी तिळतिळ अंतःकरण तोडील. या हरपले श्रेयाच्या आठवणीने आमच्या डोळयात आसवे उभी रहातात;" 'गुण्यांनी म्हटले,' 'स्वतंत्रतेचे शाहीर या नात्याने ते आंग्लकवि शेली व जर्मन कवि शिलर यांच्या तोडीचे आहेत, यांत बिलकूल संदेह नाही.' केशवसुतांच्या चारित्र्यसंपन्न जीवनाची व ईश्वरी देण्याच्या रूपाने अवतरलेल्या कवित्वाची महती मांडताना रा. प. सबनीस यांना गोखले व केशवसुत या एकाच वर्षी जन्मलेल्या जोडीची आठवण झाली ते लिहितात; 'एकावर मानांचा वर्षाव तर दुसऱ्याला सांधी कोपऱ्याचा शेवटपर्यंत लाभ. कवितेचा नाद लागल्यामुळे त्यांची 'हीन दीन छंदीफंदी' अशी तात्पुरती दुरवस्था होऊन गेली तर त्यांना कालांतराने अढळ पद मिळाले. केशवसुत हेच खरोखर चिरंजीव होणार!'

माडखोलकरांचे 'आधुनिक कविपंचक', रहाळकरांचे, त्यांच्या लेखांकांचे पुस्तक 'केशवसुत व त्यांची कविता', 'काव्यचर्चा' पुस्तकातील केशवसुतविषयक लेख, सी. के. दामले यांनी केशवसुतांच्या कवितांचा संग्रह प्रसिद्ध करताना लिहिलेले कविचरित्र व काव्यविवेचन एवढे लेखन ग्रंथरूपाने १९२६ च्या सुमारास उपलब्ध होते. केशवसुतावरील लेख लिहिणाऱ्यांनी काही वेळा सबंध समाजाच्या एकजिनसीपणाचे, वाङ्मयाच्या परिणामकारकतेच्या दृष्टीने आणि वाङ्मयाच्या स्वतंत्र सृजनशीलतेच्या दृष्टीनेही, महत्त्व ठसविले आहे. वा. ब. पटवर्धन यांच्या 'काव्य आणि काव्योदय' या निबंधात हा विचार पूर्वी आला होता. परंतु केशवसुत-विवेचनात तो ठसठशीतपणे पुढे मांडणारे माडखोलकरांसारखे भाषाभूषण टीकाकार या काळात उठून दिसतात.

लेखांक लिहिणाऱ्यांनी " त्यांच्या कवितांचे विषयानुसार भाग पाडले व त्यांची चर्चा केली. " रहाळकर यांनी थोडेसे कविचरित्रही दिले. परंतु वेगवेगळ्या कवितांची थोडक्यांत चर्चा करतांना या काळांतील विशेष मान्यतेचे विद्वान वै. का. राजवाडे यांनी काय म्हटले आहे ते सविस्तर पाहाण्यासाठी काही नमुने सादर करतो.

'आत्मवृत्त' ( विभाग ) '**एक खेडे**'

'यांत कोकणातील सृष्टीचे वर्णन हुबेहूब केले आहे. खेड्यातील राहणारांची स्तुति वस्तुस्थितीला धरून नाही. खेड्यांत रोगराई नाही, तेथील लोक प्रामाणिक, त्यांना उद्याची काळजी नाही, ते मनोविकारांना बळी पडत नाहीत...हे म्हणणे कितपत खरे आहे ?

**" दुर्मुखलेला— "**

'... अशा आचरट तोंडाळ शिक्षकांना कवितेत गोवणे म्हणजे त्यांचा एक प्रकारचा गौरव करणे होय.'

'**पंतोजी**'–'हीतहि मारक्या शिक्षकावर असाच ताशेरा झाडलेला आहे. अशा शिक्षकांना शाळांतून काढून खडी फोडावयास लावले पाहिजे. पशू बेटे !'

**'सृष्टि आणि कवि'**

'कवि रानावनांत फुकट हिंडतो, असे म्हणणे बरोबर नाही. ... शेतातून बैल एक प्रकारचे पीक आणतात; त्याच शेतात कवींना निराळे पीक मिळते. यांत अरसिकाला चांगला टोमणा मारला आहे. पण अरसिकांनाही विचारता येईल की, जगाचे पोषण कशाने होत आहे ? फोल कल्पनांनी जीवितयात्रा चालेल काय ? 'आधी पोटोबा, मग विठोबा.' ही कविता फार चांगली आहे.'

**'पुष्पाप्रत'**

'फूल नेहमी तरुण, नेहमी रुचिर. त्याचे सौभाग्य गावयाला मनुष्य अपात्र, ते भुंग्यानीच गावे. एकच पुष्प जर नेहमी सुंदर, मधुर वगैरे असते तर हे म्हणणे खरे होते; फुले कोमेजतात, नाहीशी होतात.

उगाच कल्पना लढवून रडण्यांत काय अर्थ!... ही कविता चांगली आहे.'

**'फुलपांखरू'**

'सगळे मरणाधीन हे म्हणणे खोटे; कारण हे पाखरू मेलेले कोणी पाहिले आहे? (असे कवी म्हणतो). याला उत्तर पुष्कळांनी पाहिलेले आहे. फुलपाखराला भय नाही, मरण नाही हे म्हणणे खोटे आहे. ही कविता चांगली आहे.'

**'आम्ही कोण?'**

'आपल्या धंद्याची कोण बडेजावी गात नाही? कवि नसते तर जगाचे काय झाले असते? आनंदाचा एक झरा अस्तित्वात नसता, तर अतिशय मनोहर अशा मनोराज्याला आपण मुकलो असतो. कवीला तत्त्व दिसते हा केवळ पोकळ अभिमान... कवि शब्दांचे चित्र काढून मन रंजवितात, व कधी कधी आनंदाची पराकाष्ठा अनुभविण्यास देतात एवढे खरे! पण हे काम गाणारे, बजावणारे, चितारी, मूर्तिकार हेही करतात. कविता अत्युत्तम, अत्युत्कृष्ट आहे.'

राजवाड्याच्या या टिपणावरून त्यांचा बोधवादी दृष्टिकोन, त्यांचा उपयुक्ततावाद, त्यांचा वस्तुस्थितीचे प्रतिबिंब कवितेत शोधण्याचा हव्यास, त्यांची उपहासबुद्धि या सर्वांचा प्रत्यय येतो. परंतु 'ही कविता फार चांगली आहे' हे पालुपद बऱ्याच टिपणांच्या अखेरीस आले आहे. त्यावरूनच काय तो त्यांचा रसिकपणा कल्पावा लागतो. उपदेशकाची त्यांची भूमिका पाहाण्यासारखी आहे आणि त्या काळाशी ती पूर्णपणे सुसंगतही आहे. एखाद्या विद्यालयाचा वा महाविद्यालयाचा प्राचार्य, अथवा वसतिगृहप्रमुख आपल्या विद्यार्थ्यांच्या जीवनाला कोणते वळण लागते हे पाहाण्यात तेव्हा अतिशय दक्ष असे. अशा विचारांनी भारलेला तो भारताच्या नव उभारणीचा काल होता. जबाबदारीची व नेतृत्वाची अपेक्षा शिक्षित तरुण वर्गाकडून मोठ्या प्रमाणांत त्यावेळी केली जात होती. या पार्श्वभूमीवर व कर्वे, विजापूरकर, ज. वि. ओक, परांजपे, बडोद्याचे माणिकराव यांच्या शिक्षणक्षेत्रातील कार्यरततेच्या

आठवणी मनांत ठेवल्यावर राजवाडे ‘ प्रियेचे ध्यान ’ या केशवसुतांच्या कवितेवर जो अभिप्राय देतात तो योग्य वाटतो. परंतु कवितेवरील अभिप्राय म्हणून कसा वाटतो ते शिल्लक राहतेच. राजवाडे लिहितात, ‘ विद्यार्थीदशा, रतिसुख व विरह-काय ही हिंदु विद्यार्थ्यांची दुःस्थिति ! अभ्यास की रतिसुख हा प्रश्न; हिंदु विद्यार्थ्याला रतिसुख किंवा प्रियासाहचर्य जास्त? कर्तव्याची, जबाबदारीची जाणीव पार पळाली. विद्यार्थीदशेत लग्न करणे हा पहिला गाढवपणा; दुसरा रतिसुखाचा व प्रियासाहचर्याचा अभिलाष. पुरुषपणा कोठे गेला? ‘ स्वाभिमानावर पुरुषपणावर माझी जास्त आसक्ति, नंतर तुझ्यावर.’

I could not love thee, dear, so much
Loved I not honour more

ही Luvelace ची उक्ति सर्वांनी ध्यानांत ठेवली पाहिजे. विरहाकरतां रडत बसला तर ...... देशकार्य कोणी करावयाचे ? अभ्यासाकरता सहा महिने घर सोडून पुण्यास राहतो, केवढा हा विरह ! बाजारात गेला, ऑफिसातून यायला लागला वेळ, झाली विरहव्यथेला सुरवात !... काय या बायका, काय ते नवरे ! विषय जरी हास्योत्पादक तरी कविता चांगली आहे. ’

‘ हरपले श्रेय ’ या कवितेवरील राजवाड्यांच्या टिपणीपैकी शेवटचा भाग असा आहे, ‘ लहानपण देगा देवा, मुंगी साखरेचा रवा ’ असे जरी साधु तुकारामबोवा म्हणतात, तरी लहानपण ही स्थिति नेहमी रहाणार कशी ? मनुष्य वाढलाच पाहिजे. शरीराच्या वाढीबरोबर मन वाढणार, मनोविकार वाढणार. कोणच्या ना कोणच्या रीतीने संसार मागे लागणारच. संसार हा एक धंदा आहे. जसे प्रत्येक धंद्याला शिक्षण लागते तसे संसारधंद्याला पाहिजे. ते कोणी संपादित नाही;... विशिष्ट शिक्षण नसले तर धंदा बुडतो; तसे पुष्कळ संसार बुडतात म्हणजे दुःखमय होतात, कारण विशिष्ट शिक्षण नाही.’

राजवाड्यांची ही टीकाटिपणी देण्यांत काही हेतु आहे. पुढे केशवसुतांवर माडखोलकरांनी, माधवराव पटवर्धनानी आणि इतरांनी

ज्या पद्धतीने टीका केली; किंवा मराठी वाङ्मयांत ' कलेकरिता कला ' की ' जीवनासाठी कला ' या स्वरूपाचा जो वाद दहा वर्षापर्यंत बराच गाजला त्यांची पूर्वपीठिका म्हणून–अर्थातच राजवाड्यांचा दरडावणीचा सूर किंवा टीकाकाराने कवीकडे पाहाताना शाळेतील विद्यार्थ्याकडे शिक्षकाने पहावे ती दृष्टि एवढे वगळल्यानंतर–तिच्याकडे पाहाता येईल असे मला वाटते. एवढेच नव्हे तर रविकिरणमंडळाच्या कवीनी जी मध्यवर्गीय संसारचित्रे रेखाटली, ग्रामीण जीवनावरील कविता लिहिण्याचा थोडासा प्रयत्न केला व गोचरवर्णनाची महति मानली तिच्या बुडाशी जो वास्तववादी दृष्टिकोन बळावला होता तो समजण्यासही या प्रवृत्तीच्या एका अंगाचा उपयोग होण्यासारखा आहे.

परंतु राजवाडे यांनी केशवसुतांच्या कवितेवर सामग्र्याने जो अभिप्राय दिला तो ' ( या संग्रहातील ) सुमारे चाळीस बेचाळीस कविता जगांतील कोणच्याहि रसकाव्याची बरोबरी करतील ' असा होता. माडखोलकर यांनी केशवसुतांची व्हिटमनशी तुलना करून म्हटले, ' व्हिटमनप्रमाणे केशवसुतहि आपल्या कवितेविषयी म्हणू शकतील की, रसिकहो ही कविता नाही, हिला जो हाती घेईल तो कवीच्या काळजालाच हात घालील.' ज्ञानप्रकाशमधील एका लेखांत ' केशवसुतांच्या स्त्रीदाक्षिण्यावर ' लेख लिहिणाऱ्या त्या वेळच्या एका उत्साही समर्थकाने लिहिले, " सर्वसाधारण समाजाला प्रिय असणाऱ्या राष्ट्रीय चळवळीचा ध्वनि आपल्या काव्यात उमटविणारे कवि अनेक आढळतात. त्याच्या सुराशी आपला सूर जुळता घेऊन कविता करणे काही विशेष नाही. अशा प्रकारची राष्ट्रीय कवने गाणारे आज लोकप्रिय झालेले आपण पाहत आहो. पण समाजाने ज्या समजुती शतकानुशतके आपल्या उराशी बाळगल्या त्यावर शब्दशस्त्र उचलावयाला मात्र विशेष प्रकारचे धैर्य लागते. अशा तऱ्हेचे मनोधैर्य केशवसुत व इतर आधुनिक कवी यांनी आपल्या कवितांतून समाजसुधारणेची तरफदारी करतांना दाखविले आहे. राष्ट्र उन्नतीच्या मार्गावर आहे की अधोगतीच्या उतरणीला लागले आहे याची पर्वा न करतां महाराष्ट्राच्या प्राचीन कवींनी केवळ स्वतःपुरते पाहून परमार्थ पिकविण्याचा धंदा केला.

त्यांच्या कवितेने भाषेच्या घटनेला हातभार लावला असला तरी राष्ट्राच्या घटनेला कदाचित अपकारच केला असेल. महाराष्ट्राच्या इतिहासात त्यांच्या कवितेला महत्त्वाचे स्थान मिळण्याचा संभव नाही. उलट आपल्या अवनत देशबांधवांची हितबुद्धि मनात सदैव वागवून आधुनिक कवींनी काव्यरचना केली. महाराष्ट्राच्या विचारविकासाचा किंवा स्वराज्य साधनाचा इतिहास लिहिण्याचा ज्यावेळी प्रसंग येईल त्यावेळी आधुनिक कवींनी केलेल्या या निरपेक्ष समाजसेवेची बूज झाल्याशिवाय राहणार नाही. महाराष्ट्र शारदेच्या प्रदेशात हे अगदी अभूतपूर्व असे परिवर्तन आधुनिक कवींनी घडवून आणले आहे." 'हे लेखन ज्ञान-प्रकाशच्या ता. २३–९–१९२३ च्या रविवार पुरवणीतले आहे.'

केशवसुतांच्या माहात्म्याची चढती कमान या पहिल्या पर्वाच्या अखेरीस म्हणजे १९२६ च्या श्री. वि. वर्तक यांच्या 'तुतारीचे पडसाद' या पंचवीस कविता व सुरुवातीची १३४ पृष्ठांची प्रस्तावना असलेल्या पुस्तकाने पूर्ण केली.

वर्तक कवींचे दोन प्रकार सांगतात; एक सौंदर्याचा भोक्ता व दुसरा तत्त्ववेत्ता. दोहोंचीही योग्यता श्रेष्ठ दर्जाची असते. परंतु 'तत्त्ववेत्ता कवि निर्माण होणे हे राष्ट्राच्या भाग्योदयाचे पूर्वचिन्ह समजले पाहिजे.' आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ वर्तकांनी इमर्सनचे एक सुप्रसिद्ध वचन दिले आहे. हा तत्त्ववेत्ता कवि 'आपल्या युगाची पापे कबूल करून घेणारा, ती पापे ज्या संप्रदायातून निर्माण झाली असतील ते सारे संप्रदाय नष्ट करून टाकणारा असा महायोगी असतो.' 'ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम व केशवसुत हे सारे एकाच साखळीतील दुवे आहेत.'

केशवसुतांची कविता वाचतांना महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय व वाङ्मयात्मक पुनरुज्जीवनाच्या प्रयत्नांची पार्श्वभूमि विसरून चालणार नाही असे सांगून वर्तक पुढे म्हणतात, आपली कविता लिहीत असतांना केशवसुतांना फार तीव्र स्वरूपाचा मानसिक झगडा करावा लागला. प्रतिपक्ष आप्तवर्गापैकी असला तर लढा चालविणाऱ्या खंद्या वीरालाही तीव्र विषण्णता येते. पण शेवटी तो वीर हा लढा यशस्वी तऱ्हेने पार

पाडल्याशिवाय राहात नाही, असेही केशवसुतांच्या काव्याची रसग्रहणाधिष्ठित श्रेष्ठता पटवून देतांना वर्तक लिहितात.

वर्तकांच्या 'तुतारीचे पडसाद' या पुस्तकाने हे समीक्षापर्व संपते आणि दुसरे सुरू होते ते दोन कारणांमुळे. पहिले कारण म्हणजे या पुस्तकाच्या रूपाने वाङ्मयीन टीकेची बैठक वाढवून प्रथमच केशवसुतांवर कवि या नात्याने ग्रंथबद्ध टीका प्रकाशित झाली; ती पराकोटीची गौरवशाली झाली. व दुसरे कारण म्हणजे वर्तकांच्या पुस्तकांत जरी वेगळ्यावेगळ्या कवितांविषयी बराचसा मजकूर परिच्छेद रूपाने असला तरी तो एकेका कवितेचा स्वतंत्र अभ्यास होण्याच्या दृष्टीने उपकारक असा प्रयत्न झाला. वर्तकांचे सर्वच कवितांचे विवेचन सर्वांना पटण्याजोगे वाटेल असे नाही. काही भाष्ये अप्रस्तुत वाटतात. तरीही एका निराळ्या टीकापर्वाची त्यामुळे नांदी होते असे म्हणता येईल.

## केशवसुत-समीक्षेची पुढची पर्वे : १९२६ ते ४१

हा कालखंड केशवसुत गौरवाच्या दृष्टीने प्रतिकूल तर भासणारा आहेच, परंतु केशवसुतांची विस्मृति व्हावी आणि रविकिरण मंडळाच्या कवितेचा बोलबाला व्हावा, तो ज्यांना अवास्तव वाटला त्यांनी बालकवींच्या कवितेची श्रेष्ठता सरळसरळ रीतीने किंवा कवित्वलक्षणे सांगताना पटवून द्यावी अशा प्रकारचा होता. या दोन्ही पंथांचा फारसा परिणाम न झालेली कुसुमाग्रजांची कविता १९४१ च्या सुमारास आपल्या दीप्तीने तळपू लागली तेव्हां १९४९-५० पर्यंत केशवसुतावर अधून मधून चर्चा होऊ लागून विशेष तोलाचे असे टीकालेखन या काळांत झाले. मर्ढेकरांची कविता नव्या समीक्षकांचे लक्ष्य वेधून घेऊ लागल्याने व तिच्या दुर्बोधतेमुळे, उपहासामुळे, मानवापुढच्या नव्या समस्या आजच्या संभ्रमित करून टाकणाऱ्या यंत्रसंस्कृतीने निर्मिलेल्या आहेत याची विदारक जाणीव करून देणाऱ्या व अनैसर्गिकाला शरण जावे लागणाऱ्या पंगुत्वदर्शनामुळे एकमेव चर्चेचा विषय बनली. तरीही १९५६ साली केशवसुतांचा पन्नासावा स्मृतिदिन फार गाजावाजा

न होतां का होईना साजरा झाला. आणि पुढे महाराष्ट्र राज्याची स्थापना १९६० साली झाल्यापासून राज्य सरकारचे लक्ष्य वाङ्मय-सेवकांच्या जन्मशताब्दि साजरी करण्याकडे लागल्यामुळे, वृत्तपत्रांनीही या समारोहांना उचित प्रसिद्धी देण्याचे ठरविल्यामुळे या शताब्दिवर्षाची आखणी जवळजवळ नमुनेदार झाली म्हटले तरी चालेल.

१९२३ पासून रविकिरणमंडळाची कविता व कवितेविषयीचे विचार यांच्या प्रकाशनास आरंभ झाला असे सर्वसाधारणपणे मानले जाते. माधवराव पटवर्धनांनी वृत्ते व रचना आणि शब्द लिहिण्याच्या पद्धती यात जे बदल केले त्यांचा विशेष विचार या समीक्षा समालोचनात करण्याची गरज नाही. ही कविता रोमॅन्टिक संप्रदायाचीच आहे असे मानताना मात्र थोडी सावधगिरी बाळगली पाहिजे. वास्तविक पटवर्धनांचा आग्रह सामाजिक शिष्टाचार, रूढ नीति आणि तिच्या-खाली दडलेला दांभिकपणा यांना शरण न जाता व्यक्तीच्या अनिर्बंध स्वातंत्र्याचा पुरस्कार करण्याचा होता असे दिसते. मिलने व्यक्ति-स्वातंत्र्याच्या प्रतिपादनार्थ जे म्हटले होते, स्पेन्सरने वैयक्तिक जीवनांत प्रत्येकाला जी मोकळीक पाहिजे असे मत पुरस्कारले होते जॉर्ज इलियट हिने व ब्रेडलॉ व ॲनी बेझंट यांनी जे वैयाक्तिक आचरणात बंड करून दाखवले होते त्याचा आविष्कार हा असावा असे वाटते. व्यक्ति-स्वातंत्र्याची गळचेपी होऊ नये हा जो इंग्लंडातील उदारमतवादी विचारसरणीचा एक भाग त्या विचारसरणीचा आश्रय शक्य तो करावा व आपले मत बहुसंख्य लोकांच्या विरोधाला न जुमानता प्रतिपादावे असा त्याचा आशय असावा. सामाजिक बंडखोरीचा हा विचार रोमॅन्टिसिझमूमध्ये येतो खरा, परंतु पूर्वीच्या स्वरूपांतील रोमॅन्टिसिझम्-पेक्षा हा मतप्रवाह काहीसा वेगळा आहे. प्रीतिभावनेशिवाय विवाह ही 'नाते दृढ' राहिले तरी क्रूर शिक्षा होय अशीही या कवींची विचार-सरणी होती. या सर्वांचा विचार केला तरी हा आविष्कार केशवसुत व बालकवि यांच्या वेळच्या रोमॅन्टिझिमूमध्ये पूर्णतया सामावणारा नाही. यामुळे आणि वैयक्तिक अनुभव किंवा संसारातील यथातथ्य चित्रण व त्यातील कारुण्य रंगविण्याची या मंडळातील कवींची

वृत्ति, यामुळे केशवसुतांच्या कवितासंबंधी विचार करताना माधवराव पटवर्धनांना योग्य ती समरसता अनुभवताच आली नाही.

केशवसुतांची निसर्गसृष्टि चित्र हुबेहुब डोळ्यापुढे उभी करणारी नाही हे सोदाहरण पटविण्यात माधवराव पटवर्धन यांना यश आले आहे यांत शंकाच नाही. किंबहुना त्यांच्या केशवसुतावरील प्रदीर्घ लेखांत जर काही विशेष विचारप्रवर्तक असा भाग असेल तर केशवसुतांच्या निसर्ग कवितेचे त्यांनीं केलेले कठोर परीक्षण हाच होय. बालकवि सृष्टिवर्णन अगदी मोजक्या व शेलक्या सुंदर शब्दयोजनेने करतात, तसे केशवसुतांना ' पर्जन्याप्रत ' या कवितेखेरीज इतर कोठे जमले नाही आणि जेथे ते हृद्य वाटते तेथे देखील ते बालकवींच्यासारखे परिणामकारकपणे जमलेले नाही हेही त्यानी आपल्या विवेचनात म्हटले आहे ते मान्य व्हायला हरकत नाही. ही उणीव निर्माण होण्याचे कारण केशवसुत ' विशिष्ट भावनेची उणीव चमत्कृतीने आणि वर्णनातील जिवंत हुबेहुबपणाची उणीव क्लुप्तीने भरून काढतात.' ' उपमेत योग्य साधर्म्य असले म्हणजे ती मनोरम वाटते; परंतु तिच्यामुळे जर सृष्टि वर्णनांत काही असत्य दृग्गोचर झाले तर ती मौज नष्ट होते. '

परंतु पटवर्धनांच्या या टीकेचा तोंडवळा, ती कवीची कवीवरील टीका आहे, राजवाड्यासारख्या एका व्यवहारज्ञ ध्येयवादी विद्वानाची नव्हे हे लक्ष्यात ठेवल्यास, थेट राजवाड्यांच्या पठडीतीलच आहे हे पाहून नवल वाटते. हा तोंडवळा बऱ्याच ठिकाणी त्याच रीतीचा भासतो. त्याचे एक उदाहरण पहा. " पारिजाताची फुले जास्वंदीच्या फुलांना म्हणतात ' हा रक्तिमा घेऊन शाखांवर का सदैव रहाणार आहात ? मरून याच मातीत पडाल व अज्ञात अशा थडग्यांत जाल ही स्थिति आमच्या भाळी न येवो म्हणून आम्ही थडग्यावर आपले नांव स्वगंधाने लिहायला झटतो ' भाषाप्रयोगावरून ही कविता इंग्रजीवरून अनुवादलेली असावी असा संशय येतो. ते काहीही असो, परंतु वरील कवितेतील विचारसरणी भ्रामक आहे हे खास; कारण बकुळीचे फूल वगळल्यास गंध हा सामान्यपणे रंगाबरोबरच लयाला जातो. "

माधवराव पटवर्धन यांची सामाजिक व वाङ्मयीन मते त्यांच्या टीकेत पुष्कळशी प्रतिबिंबित झाली आहेत. नाशिक येथील महाराष्ट्र कविसंमेलनाच्या वेळचे त्यांचे १९३३ मधील अध्यक्षीय भाषण, १९३४ च्या बडोदे संमेलनातील काव्यशाखेच्या अध्यक्षपदावरून त्यांनीं केलेले भाषण, यशवंत व कवि दत्त यांच्यावरील त्यांचे रसग्रहणात्मक लेख या सर्वांचा विचार मनाशी आणला म्हणजे केशवसुतांची कविता त्यांना उदाहरण किंवा आदर्श म्हणून का नको होती ते अधिक चांगले समजते. नाशिक संमेलनांत 'काव्यविषयक भ्रामक कल्पना' दुरुस्त करणाऱ्या भाषणात एके ठिकाणी त्यांनीं म्हटले आहे, "काव्यात असे काही आहे काय की जे गद्यात व्यक्त करताच येणार नाही? काव्यात असे काही नाही की, ज्याच्यापुढे गद्य फिके पडेल. संस्कृत साहित्यकार आपल्या काव्याच्या व्याख्येत पद्याचा नामनिर्देशही करीत नाहीत. रसात्मक वाक्य, रमणीयार्थ प्रतिपादक शब्द म्हणजे काव्य असे ते म्हणतात. पद्याच्या नियमित आंदोलनामुळे कानाला सुख होऊन वाचकाला एक प्रकारची गुंगी येते; त्या गुंगीत त्याची व्यावहारिक. शक्याशक्यता पाहण्याची मति निष्क्रिय होऊन कल्पनासृष्टीतील आभास वास्तव वाटण्यास साह्य होते. हे सारे खरे. तथापि काव्याची रमणीयता मूलतः अर्थांवर अवलंबून आहे, हे केव्हाही दृष्टिआड होता कामा नये." बडोदे संमेलनात त्यांना असे म्हणावेसे वाटले कीं, 'टेनिसनचा ओढा जिवंत वाटतो, तसा तांबे यांचा झरा वाटत नाही. याचे कारण विशिष्ट अनुभूतीचा अभाव हेच होय. उलटपक्षी बालकवींचा निर्झर कसा चैतन्यपूर्ण वाटतो!' त्यांच्या विचारसरणीप्रमाणे कादंबरी, शब्दचित्र, स्वभावरेखाटन, प्रसंगनिर्मिति हे गद्यलेखनातील प्रकार कवींनी तेव्हा पद्यमय करायला जी सुरुवात केली होती ते योग्य दिशेचे पाऊलच होते. यशवंतांच्या कवितेतील अशा ओळी त्यांनीं हव्यासाने उद्धृत केल्या आहेत. आणि बडोदे संमेलनातील भाषणात म्हटले आहे, 'काव्यप्रांतातील हरिभाऊ आपटे मात्र अद्यापि अवतीर्ण व्हावयाचा आहे!'

त्यांची सामाजिक मते इतर टीकातून व्यक्त झाली आहेतच. केशवसुतावरील परीक्षणात ती पहावयास मिळतात यात नवल काहीच नाही. माधवराव ' निद्रामग्न मुलीस ' या कवितेच्या परक्षिणात म्हणतात, ' कवीला वात्सल्याने त्या १२–१३ वर्षांच्या निद्रामग्न मुलीचे चुंबन घ्यावेसे वाटले तर त्यात स्वाभाविक गैर असे काय होते ? पण आपली कविता वाचून लोक ठपका देतील या भीतीने केशवसुतांना आपले समर्थन करावेसे वाटले ! ते खरोखर धीट सुधारक असले तर त्यांना ही भीति शिवलीच नसती... युवतीविषयी वाटणारी भावना ही नेहमी पापेच्छाच असते का ! एखादी युवती एखाद्या तरुणाच्या मनात प्रणय उत्पन्न करील, तर तीच वडील मनुष्याच्या अन्तःकरणात वात्सल्याचा उद्रेक उत्पन्न करील. कोणती भावना उत्पन्न होईल हे त्या परस्परांच्या वयाच्या प्रमाणावर व मनःप्रवृत्तीवर अवलंबून राहील. ' या अवतरणा-वरून त्यांचा सुधारकी बाणा आणि स्त्री-पुरुषातील नाते अविकृत रीतीने समाजाने समजून घ्यावे हा आग्रह आपोआप दिसतो.

तांब्यानी गूढ गुंजनात्मक कवितेवर जे प्रखर आक्षेप १९१३ साली घेतले होते व केशवसुतांच्या ' झपूर्झा ' या कवितेला रुक्ष तत्त्वज्ञान म्हणून संबोधले होते, त्या विचारसरणीचा प्रभावही माधवराव पटवर्धन यांच्यावर विलक्षण होता असे दिसते. म्हणूनच पटवर्धनांचे ' झपूर्झा ' कवितेवरचे परीक्षण प्रामाणिक भावनेने केलेले असले तरी गूढगुंजना-विषयीच्या पूर्वग्रहामुळे फार दूषित झाले आहे. ते स्वतःच्या काव्य-विषयक मर्यादित दृष्टिकोनाचे फलित आहे हे त्यांना आपल्या केशवसुता-वरील दीर्घ लेखाच्या अखेरी अखेरीस थोडेसे प्रतीत झाले असावे. ते लिहितात, ' आधुनिक मराठी कवितेत केशवसुतांचा नंबर पहिलाच आहे. पण पोकळ स्तुति करण्याची रूढि पडू नये, सोने असले तरी ते किती नंबरी आहे हे ओळखता यावे म्हणून हे विस्तृत व दिसायला जरा निष्ठुर असे परीक्षण केले आहे. याच्या वाचनाने काव्यचिकित्सेस व रसग्रहणास मदत होईल अशी आशा आहे. मतभेद अपरिहार्य आहे; आणि प्रकृतिभेदामुळेही काही कविता आवडल्या नसतील.

तथापि वाङ्मयाची ही चिकित्सा मूलतः आत्मप्रत्यय – निविष्टच असायला पाहिजे. '

पटवर्धनांचा लेख १९३१ चा आहे. त्याआधी केशवसुतावर हिंदीत लेख मागवून घेऊन तो कलकत्त्याला प्रसिद्ध करणारे पं. चतुर्वेदी यांचा व त्यांच्या विनंतीप्रमाणे १९२८ मध्ये तो लिहिणारे न. शं. रहाळकर यांचा केवळ कालानुक्रमणासाठी उल्लेख करून या पर्वातील इतर समीक्षेकडे धावता दृष्टिक्षेप टाकता येईल.

'पद्यमय कादंबरी' लिहिण्याचा हव्यास धरणाऱ्या रविकिरण मंडळाच्या कवींना गूढगुंजनात्मक कवितेविषयी जरी अप्रीति होती तरी माधवराव पटवर्धनांच्या गूढगुंजनपर कवितेवर आघात करणाऱ्या टीकेला आत्माराम रावजी देशपांडे ( कवि अनिल ) यांनी 'फुलवात' या आपल्या कवितासंग्रहाला जी प्रस्तावना जोडली तिच्यात १९३२ सालीच आवर घालण्याचे अवघड काम आत्मविश्वासाने अंगीकारले.

कवि अनिलानी पटवर्धनांच्या 'सायुज्य-वाद' या शब्दाऐवजी 'प्रतीति-धर्म' किंवा अंतर प्रतीति-धर्म. हा ज्ञानेश्वरीतील शब्द जास्त समर्पक ठरवून या प्रतीति-धर्माचे स्वरूप सांगण्यासाठी प्रतीतिधर्मियाचे बोलणे प्रतीकात्मक असणे क्रमप्राप्त कसे ठरते ते विवेचून सांगितले आहे. प्रतीतिधर्मीयाचा 'विश्वास तर्कावर किंवा युक्तिवादावर नसतो, तर अंतःकरणाच्या जाणीवेवर, अंतस्फूर्तीवर असतो. त्याला दिसते, त्याला जाणीव होते. त्याला अनुभव येतो. म्हणून त्याला विश्वास वाटतो. इतरांना त्याचे बोलणे कळंत नाही. आंधळ्यांच्या जगांत जर एकदम एकाद्यालाच दृष्टी आली, त्याने प्रकाश पाहिला, त्या प्रभेने त्याला भारून टाकले म्हणजे त्याची जशी स्थिती होईल तशी प्रतीतिधर्मीयाची होते...' अशा प्रतीतीचे बोल गूढ असणारच. प्रतीकात्मक असणारच. प्रतीकाने जे समजते ते दुसऱ्या कशानेही समजत नाही.

आपण या प्रस्तावनेत प्रतीती-धर्माचे विवेचन का करीत आहोत याचा खुलासा करताना अनिल म्हणतात.

" 'अर्वाचीन मराठी वङ्मयसेवक' या पुस्तकातील केशवसुतावरील निबंधात मूढगुंजना (?) संबंधी लिहिताना श्री. माधवराव पटवर्धन यांनी जी दोषैक दृष्टीने विधाने केली आहेत त्याना उत्तर दिल्याशिवाय राहवत नाही. श्री. पटवर्धन म्हणतात की, 'इंग्रजी कवितेच्या वाचनाने आणि प्रतिभाविषयक गैरसमजामुळे हा प्रकार मराठीत आला.' (पान १५८). अगदी या उलट Mysticism या विषयावर ग्रंथ लिहिणारे Evelyn Underhill व Caroline Spuregon सारखे लोक म्हणतात की, Mysticism चे मूळ पौर्वात्य देशांत आहे," यानंतर Mysticism in English Literature या पुस्तकातील एक थोडेसे लांब अवतरण समर्थनार्थ देऊन अनिल म्हणतात, 'तेव्हा प्रतीतिधर्म इंग्रजीतून मराठीत आला हे निःसंशय चुकीचे आहे. हिंदुस्थान प्रतीतिधर्माचे माहेरघर आहे. .... ... आधुनिक मराठी काव्याला प्रतीतिधर्मासाठी इंग्रजीकडे धाव घेण्याचे काहीच प्रयोजन नाही; कारण ती महाराष्ट्राची परंपराच आहे.' ( माधवराव पटवर्धन देशभक्तीच्या कल्पनेविषयीदेखील ती इंग्रजी वाङ्मयाच्या संस्कारानेच मराठी वाङ्मयात आली आहे असे म्हणतात. केशवसुतांची अशा कवितांची स्फूर्ति 'पुस्तकीच' होती असे त्यांनी लिहिले आहे. **अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक**, पान १४८–१४९ )

केशवसुतांमधील या प्रतीतिधर्म व्यक्त करणाऱ्या पद्यपंक्तींवरील पटवर्धनांचे भाष्य उद्धृत करून अनिल लिहितात, " गूढ गुंजना (?)चे 'अचाट अत्युक्ति' 'चमत्कृतिजनक परस्परविरोध' व 'आत्ममहात्म्य कथन' असे तीन विशेष श्री. पटवर्धनानी सांगितले.

तो मज गमले विभूति माझी ।  
स्फुरत पसरली विश्वामाजी ॥  
दिक्कालासहि अतीत झालो ।  
उगमी विलयी अनंत उरलो ।  
विसरुनि गेलो अखिलां भेदा ॥

हे केशवसुतांचे उद्गार श्री. पटवर्धनांना ‘ अचाट अत्युक्ति ’ वाटतात. गायन ऐकत असताना भान हरपून जाते, आपण आपलेपणा विसरून जातो, गायनाच्या लहरीबरोबर आपण सारीकडे प्रसार पावत आहोत अशी जाणीव होते. हा अनुभव साध्या भावनाप्रधान मनुष्यास सुद्धा येतो; मग केशवसुत तर कवीच होते. माझ्यातली विभूति ( spirit ) स्फुरण पावून साऱ्या विश्वात पसरत आहे असे मला वाटते, या केशवसुताच्या म्हणण्यात ‘ अचाट अत्युक्ति ’ कुठे आहे हेच समजत नाही. एखाद्या अरसिकाला पतंग दिव्यावरच्या प्रेमामुळे त्यावर झडप घेऊन प्राण देतो हीही अचाट अत्युक्ति वाटेल. एवढेच नव्हे तर सर्व काव्यच अचाट अत्युक्ति वाटेल.”

केशवसुत समीक्षेच्या या पर्वातील माधवराव पटवर्धन यांची केशवसुतांवरील बऱ्याच ठिकाणची चुकीच्या दृष्टिकोनातून घडलेली परंतु शंभर टक्के प्रामाणिक हेतूची प्रतिकूल टीका अल्पांशाने पाहिल्यानंतर आता दुसरी, केशवसुतांवर हल्ला करणारी टीका म्हणजे माडखोलकरांची होय. टीकाकाराने कवीला गौरवावे आणि पुढे त्या कवीला वाङ्मयात विशेष स्थान राहू नये. किंवा टीकाकाराने कवीला गौण स्थान द्यावे, त्याचा उपहास करावा आणि शेवटी आपले हंसे करून घ्यावे हा प्रकार वाङ्मयाच्या इतिहासाच्या अभ्यासकांना नवा नाही. आणि आधी गौरविलेल्या कवीला निराळ्या कारणासाठी पुढे तुच्छ लेखावे असाही प्रकार अगदी क्वचित् वाङ्मयात घडून येतो. परंतु आधी ज्या कवीचा गौरव ज्या विशिष्ट गुणांसाठी किंवा कारणासाठी केला, त्याच कवीला पुन्हा त्या गुणांच्या अभावासाठी दूषणे द्यावीत हे फार विलक्षण वाटते. त्याचा उलगडा व्हायचा झाल्यास त्या त्या वेळच्या प्रचलित चळवळी व जनमानसांतील आंदोलने यांच्याशी समांतर राहण्याचा माडखोलकरांचा प्रयत्न होता असे मानणे भाग पडते. माडखोलकर यांच्या केशवसुतांवरील आक्षेपांचे अवलोकन केलं असतां त्यांच्या पुढील मतांना ते स्वतः जितके जबाबदार आहेत त्याहून अधिक त्यावेळची राजकीय व सामाजिक आंदोलनांची हवा जबाबदार आहे असे दिसेल.

माडखोलकरांचे समालोचन आणि माधवराव पटवर्धन यांची पूर्वीच्या दोन संमेलनातील अध्यक्षीय भाषणे यांच्यात काही भाग बराचसा सारखा आहे. माधवरावही म्हणतात की, ‘ श्रेष्ठ प्रतीचे प्रातिनिधिक वाङ्मय निर्माण व्हायला निरनिराळ्या जातीतूनच नव्हे तर निरनिराळ्या वर्गातून लेखक निघू शकतील अशी सामाजिक व आर्थिक स्थिति यायला हवी. ’ परंतु माधवरावांच्या विवेचनांत नवमतवादाचा अतिरेक करणाऱ्यावर जरी टीका असली तरी ‘ कवि आपल्या काळाचा प्रतिनिधि कितपत असावा हे त्याच्या स्वभावावर, त्याच्या प्रवृत्तीवर अवलंबून राहील ’ अशी सावधताही आहे. ‘ कवितेत तत्कालीन समाजाचे प्रतिबिंब असलेच पाहिजे असे नाही. असहकारितेची प्रचंड लाट देशभर खळबळ उडवून देत असतांना एखाद्या कवीने शाकुंतलाच्या प्रतीचे नाटक वा मेघदूताच्या तोडीचे काव्य लिहिले तर त्यात विलायती कापडाचा बहिष्कार, खादीचा पुरस्कार इत्यादि काही नाही म्हणून त्यास आपण टाकून देऊ काय ? ’ असा प्रश्नही विचारायला माधवराव विसरले नाहीत. परंतु माडखोलकर ‘ आधुनिक कविपंचक ’ लिहीत असतांना कालसापेक्ष विचार करीत होते आणि १९३५ मध्येही कालसापेक्ष विचारच करीत होते. म्हणून त्यांच्या दोन मतात एवढे अंतर पडलेले आहे.

माडखोलकर १९३५ मध्ये गेल्या साठ वर्षातील मराठी कवितेचे समालोचन करीत होते. मराठी काव्याच्या आठ शतकांच्या परंपरेमध्ये लोकजीवन आणि काव्य यांचा जो रक्ताचा संबंध होता तो आधुनिक कवि आणि लोकजीवन यांच्यात उरला नाही हे शल्य त्यांना त्या वेळी जाणवणे अगदी स्वाभाविक होते. इंग्रजी राजवटीत गद्याने जो पराक्रम दाखविला, जी युयुत्सु वृत्ती प्रगट केली व जे तेज पसरविले त्या मानाने कविता निष्प्रभ व विषण्ण सूर आळविणारी किंवा स्वयंकेंद्रित आणि कुढणारी, रडणारी, प्रेमगीतेच केवळ गाणारी झाली याबद्दल त्यांना संताप आला. विनायक, टिळक आणि केशवसुत यामध्ये विनायकानेच काय ते ‘ पूर्ण दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भाविकाल ’ हे जाणून

आपल्या इतिहास कालातील वीरमणींची व वीररमणींची गीते गायली. बाकी टिळकांनी तर धर्मच बदलला त्यामुळे जरी ते पारंपारिक कविता-रचनेला व सामाजिक जाणिवेला मुकले नसले तरी ते केवळ सुधारणावादी व निसर्गोपासक झाले आणि केशवसुत जरी ' तुतारी ' फुंकून सामाजिक क्रांतीला आवाहन करीत असले तरी त्यांचा ' सारा भर ', ' जुने जाऊ द्या मरणालागुनि ' या कल्पनेवर होता.

या प्रतिपादनांत विनायकाला केशवसुतापेक्षा श्रेष्ठ ठरविणे, लोकजीवन आणि वाङ्मय यांच्या संबंधाची तेव्हांची तीव्र जाणीव व्यक्त करणे या ज्या गोष्टी आहेत, त्यावरून माडखोलकर कालाच्या हाकेला ओ देण्याचा यत्न करीत आहेत असे दिसते. या विवेचनाच्या सपाट्यात केशवसुतां-विषयींचे त्यांचे उद्‌गार पूर्वीच्या प्रशंसेपेक्षा फारच वेगळे झाले. " ज्याच्या उत्तुंग शाखा अनेक पक्षिकुलांचे आश्रयस्थान होऊन बसल्या आहेत व ज्याच्या असंख्य पारंब्यातून अनेक नवे तरू उद्‌भूत झाले आहेत, असा प्रचंड वटवृक्ष आणि कुंडीत वाढलेला खुरटा गुलाबाचा वेल यात जो फरक, तोच चिपळूणकर आणि केशवसुत यांच्यामध्ये."

माडखोलकरांची राजकीय मते, सामाजिक प्रश्नांवरील त्यांची मते यांत जो बदल घडला तोच त्यांच्या वाङ्मयीन मूल्यमापनातील बदलालाही कारणीभूत आहे असे मला वाटते. ते कसेही असो. त्याची अधिक चर्चा येथे अभिप्रेत नाही.

माडखोलकरांच्या ' अर्वाचीन मराठी साहित्य ' या पुस्तकातील काव्यसमालोचनाची भूमिका ध्यानी येण्यासाठी १९३० पासूनच्या महाराष्ट्रातील नव्या वातावरणाची जाणीव ठेवली पाहिजे. ते म्हणतात, प्राचीन संस्कृत कवितेचे गुणविशेष आत्मसात् करून तदनुसार कवितेची घडण बनविणारे कवि आणि पूर्वपरंकडे अजिबात दुर्लक्ष करून इंग्रजी पद्धतीवर आपला संसार थाटणारे कवि हे दोन परस्पर भिन्न प्रवाह मराठी वाङ्मयात समांतर वाहाताना दिसतात. " सुशिक्षितांना प्रिय असलेल्या कोणत्याही आधुनिक कवीची कविता पहा-ती प्रणयप्रधान, आत्मपर आणि त्रुटित अशी आढळेल. ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास

किंवा श्रीधर यांची कविता ज्याप्रमाणे समाजाच्या अग्रभागी उभ्या असलेल्या ब्राह्मणापासून तो त्याच्या पायदळी तुडवल्या जाणाऱ्या अंत्यजापर्यंत साऱ्यांच्या काळजाला हात घालते, सर्व उच्च नीच वर्गाच्या हाकेला ओ देते, ते सामर्थ्य, ती भावनांची आणि विचारांची विशालता आधुनिक कवितेत नाही. तिची हाक फक्त इंग्रजी शिकलेल्या पांढरपेशा सुशिक्षितापुरतीच मर्यादित आहे." "कचेरीत खर्डे घासणाऱ्या कारकुनाच्या, गिरणीत काम करणाऱ्या मजुराच्या, शेतात नांगर धरणाऱ्या कुळवाड्याच्या, पाण्यांत जाळे फेकणाऱ्या कोळ्याच्या किंवा बाजारात पाट्या वाहणाऱ्या हमालाच्या कष्टमय जीवनात तुकारामाला स्थान आहे, केशवसुतांना नाही. सगनभाऊची बूज आहे, गोविंदाग्रजांची नाही." परंतु आधुनिक कविपंचक या आपल्या १९२१ च्या पुस्तकांत त्यांनी पाच कवीवर जे गौरवपर लेख लिहिले त्याची वैचारिक पार्श्वभूमि व त्यावेळी मराठी कवितेच्या आठ शतकांच्या वाटचालीचे त्यांना प्रतीत झालेले अवस्थांतर यात महदंतर आहे. १९३५-३६ साली त्यांना लावणीकार सगनभाऊ श्रेष्ठ वाटला. मात्र 'आधुनिक कवि-पंचक' यात त्यांची लावणीकाराबद्दलची प्रतिक्रिया अतिशय निराळी आहे. ते तेथे लिहितात, "अध्यात्माच्या अढळ आधारावर उभारण्यात आलेल्या महाराष्ट्रभाषेच्या या भव्य मंदिरावर कामुक मनाच्या कोत्या कल्पनांचे, शबल भावनांचे क्षुद्र मनोरे या स्वराज्य विनाशाच्या विपरीत कालातच लावणी-कवींनी चढविले... आणि महाराष्ट्रशारदा वीणागुण चाळून नामसंकीर्तन करण्याऐवजी डफाच्या तालावर लावण्या आळवू लागली!" १९३५-३६ साली साठ वर्षांतील मराठी कवितेचे समालोचन करतांना माडखोलकरांनी जे सर्वसाधारणपणे म्हटले की, 'प्रत्येक राष्ट्राच्या आयुष्यांत केव्हा ना केव्हा तरी असा एक काळ येत असतो की, ज्या वेळी तत्त्वज्ञ मुत्सद्दी व कवि आणि संशोधक हे भोवतालच्या प्रगत राष्ट्राकडून नवीन कल्पनांची स्फूर्ति घेऊन त्याला आलेले जाड्य आणि जीर्णत्व नष्ट करतात.'—तेच जवळजवळ त्याच शब्दात 'आधुनिक कविपंचक' या १९२१ च्या लेखांत त्यानी म्हटले. परंतु त्यावेळी केशवसुतांनी क्रांति

केली असा त्यांचा व इतर काही जणांचा पक्का समज होता. १९३० नंतर जी नवी राजकीय चळवळ बळावली व लोकजीवनाची, संस्कृतीच्या गाभ्याचे जतन करण्याची, तिच्यापासून आत्मिक बल संपादन करण्याची, आणि तिला सचेतन करून स्वातंत्र्यप्राप्तीसाठी तिच्या सामूहिक आवाहनाला साद घालण्याची जी प्रवृत्ति निर्माण झाली, तिच्या संदर्भात माडखोलकराना केशवसुत व त्यांच्या प्रेरणेने लिहिली गेलेली आधुनिक कविता यांचा निष्प्रभपणा जाणवला आहे. जितांनी जर पुनरुत्थानाला सिद्ध व्हायचे असेल तर नव्या लोकशाही, समाजवादी, संस्कृतीने एकवटून बलशाली समाजाची मनांतील ईर्ष्या प्रज्वलित केली पाहिजे. हा त्यांचा बदललेला दृष्टिकोन बदलत्या काळाचे प्रतीक आहे.

केशवसुतांवर त्यांनी जे या काळांत लिहिले त्याचा मुख्य भर, 'शेक्सपिअरपासून स्विनबर्नपर्यंत इंग्लंडात होऊन गेलेल्या थोर कवींच्या काव्यांतून स्वकीयांच्या आणि परकीयांच्याहि राजकीय स्वातंत्र्याबद्दल जी तळमळ आविर्भूत झाली आहे, तिचा अस्पष्टसुद्धा पडसाद इंग्रजी काव्यात रमलेल्या केशवसुतांच्या काव्यांत ऐकू येत नाही.' या गोष्टीवर आहे. सावरकरांनी साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदावरून लेखण्या मोडा आणि बंदुका घ्या असे जे आवाहन केले ते याच काळात.

पंधरा वर्षाचे अंतर असलेल्या दोन कालखंडात केशवसुताना हा जो अहेर एकाच कारणासाठी म्हणजे त्यांनी 'युगतेज ओळखले' म्हणून व त्यांनी युगतेजाची पर्वा न करता स्वयंकेंद्रित प्रणयगीते रचली म्हणून मिळाला, तो याच टीकाकारांकडून लावणीकारांना 'त्यांनी कामुक शृंगार गीते रचली! आणि अवनतीत भरच घातली' व 'त्यांनी राष्ट्रभावनेला आवाहन केले' असा नेमका परस्परविरोधी मिळाला हे ध्यानी आणले, तर 'त्या त्या काळच्या राष्ट्रीय परिस्थितीचे प्रतिबिंब तत्कालीन वाङ्मयात, विशेषतः काव्यवाङ्मयात स्पष्ट पडलेले दिसून येते.' असे माडखोलकरांनी स्वतःच म्हटले आहे त्या विधानात 'काव्यवाङ्मयांत' या बरोबरच किंवा या ऐवजी 'टीकावाङ्मयात' असे म्हटले म्हणजे ते बरोबर पटू लागते.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १६६२४

माधवराव पटवर्धनांचा केशवसुतांवरील दीर्घ लेख जसा केशवसुत-समीक्षेत ध्यानी घेतला पाहिजे त्याचप्रमाणे अधूनमधून त्यांनी केशवसुतासंबंधी जाता जाता जे म्हटले आहे तेही ध्यानी ठेवले पाहिजे. 'दत्तात्रय कोंडो घाटे' या लेखात माधवराव म्हणतात, " सृष्टिप्रेम, देशभक्ति, प्रेममाहात्म्य वगैरे विषय इंग्रजी कवितांच्या वाचनामुळेच मराठी काव्य-प्रांतात शिरले व आता कायमचे रहिवाशी बनून राहिले आहेत. नवकाव्याविषयी कौतुक वाटल्यास भाषांतरित कविता होते; त्याच्याविषयी प्रीति वाटल्यास अनुकृत कविता होऊन तीत मूळचे प्रतिध्वनि उमटतात. परंतु कवीच्या वृत्तीशी नवकाव्य समरसून गेले म्हणजे जी सहजस्फूर्त कविता होते ती दिसायला थोडी परकी दिसली तरी स्वतन्त्र, पृथगात्म व चैतन्याने मुसमुसलेली अशी होते. केशवसुतांची कविता या तिसऱ्या उच्च कोटीतील आहे. "

माधवरावानी ते हयात होते तोपर्यंत म्हणजे १९३९ पर्यंत असे स्वतःला सावरून घेणारे व केशवसुतासंबंधी अनुकूल होणारे मत मधून मधून प्रकट केले तरी त्या वेळच्या काळात कवितेची हेटाळणी होत होती. रविकिरणमंडळाने संसारी चित्रांची कविता लिहून काही काळ मध्यमवर्गीयांपैकी काही थोड्या गटांची मने रिझविली तरी त्या कवितेतील सत्त्व त्वरित नाहीसे झाले आणि नव्या कवितेची गरज भासू लागली. या अगदी प्रतिकूल काळात केशवसुताविषयींचा विचार विस्मृतीत गेल्यासारखा झाला. केशवसुताविषयी जो विचार होई तो नव्या होतकरू लेखकांना भीतभीत मांडावा लागे. आचरटपणाची टीका करण्याला काहीजण सहज धजत. त्यांना उत्तर देण्याचा प्रयत्न कुठल्यातरी कॉलेजच्या मासिकातून होई. 'केशवसुतांचे अलीकडील टीकाकार' हा मोहरीर यांचा लेख अशापैकीच एक. परंतु एकंदरीने केशवसुतांच्या कवितेला अंग चोरून या काळात वावरावे लागले असे दिसते. मोहरीर यांच्या लेखात विठ्ठलराव घाट्यांच्या केशवसुतांवरील एका प्रतिकूल लेखाचा उल्लेख आहे. तो किंवा राजाध्यक्षांचाही केशवसुतांचे समर्थन करणारा जो लेख त्यांनी निर्देशिलेला आहे तो हे

दोन्हीही माझ्या पाहाण्यात नाहीत. या काळातील केशवसुत समर्थक एखादा संवेदनाक्षम उदयोन्मुख पदवीधर असल्यास त्याला आपल्या प्रतिपादनाच्या अखेरीस १९४१ च्या 'ज्योत्स्ना' मासिकाच्या जानेवारी व फेब्रुवारीच्या अंकात आपली भूमिका मांडताना हळवेपणाने काय म्हणावे लागले ते पाहाण्यासारखे आहे; तो लिहितो, "केशवसुतांच्या दोषांची मला पूर्ण जाणीव आहे. केशवसुत महाकवि नाहीत. कालिदास नव्हेत, भवभूति नव्हेत; केशवसुत क्रांतिकारक नाहीत. शेली नव्हेत, व्हिटमन नव्हेत; केशवसुत युगप्रवर्तक नाहीत – वर्डस्वर्थ नव्हेत, टेनिसन नव्हेत; त्यांचेपाशी अलोट शब्दसंभार नाही. असंख्य कल्पनांचे भांडार नाही. विषयांचे वैपुल्य नाही. लालित्याचा विलास नाही. काव्याला उजळणारा अलौकिक आत्मिक प्रकाश नाही. अमर्यादपणे पसरावा असा असामान्य गुणसौरभ नाही. थोडक्यांत सांगायचे झाल्यास केशवसुत हे एक अगदी मोजक्या प्रतिभेचे कवी आहेत. हे सारे एकदम मान्य. तरीपण त्यांच्यात इतस्ततः आढळणारे काही माणिकमोती वेचायला वर दिलेली स्पेशल कबुली अडथळा कशी करू शकते हे मला उमजत नाही."

## केशवसुत–समीक्षा
## १९४२ ते १९५६

कुसुमाग्रजांचा 'विशाखा' हा कवितासंग्रह १९४२ साली प्रसिद्ध झाला. रविकिरणमंडळाच्या कवितांची धर्ती ओलांडून नव्या मार्गाने जाण्याचा अनिलांचा प्रयत्न यापूर्वी झाला होता. मुक्तछंद वापरून त्यांनी थोडेसे स्वतःकडे लक्ष ओढून घेतले होते व वेगळेपणाची एक कक्षा दाखविली होती. परंतु कुसुमाग्रजांच्या 'विशाखा' या कवितासंग्रहाने जी खऱ्या अर्थाने नवी प्रभावी लाट निर्माण झाली ती केशवसुतांच्या कवितांतील सामाजिक आशय, सामाजिक जाणीव आणि आवेश यांची आठवण करून देण्याला पुष्कळ प्रमाणांत उपयोगी पडली. 'कोलंबसाचे गर्वगीत,' अहि-नकुल,' 'आगगाडी व जमीन' या व यांच्यासारख्या कुसुमाग्रजांच्या दीप्तिमान कविता केशवसुतांच्या

‘स्फूर्ति’ ‘निशाणाची प्रशंसा’ ‘मजूरावर उपासमारीची पाळी’ या कवितांतील उद्‌गारांचा नव्या काळातला आविष्कार भासण्याइतकी आशयघनतेची एकरूपता त्यांच्यात होती. ‘गर्जा जयजयकार क्रांतिचा’ ही कविता त्या वेळी जी एकदा सर्वतोमुखी झाली ती अजूनही राष्ट्रीय भावना चेतवतांना नव्या कवींना स्फूर्तिशाली ठरण्याइतकी जनसामान्यांच्या स्मृतिपटलावर कायम आहे. कुसुमाग्रजांच्या कवितेचे महत्त्व सांगताना स्वाभाविकच केशवसुत–संप्रदायातील हा तेजस्वी आविष्कार आहे असे टीकाकारांना जाणवू लागले. कुसुमाग्रजांची कविता केवळ केशवसुत-संप्रदायाची नाही. किंबहुना केशवसुतांचीच सर्व कविता केशवसुत-संप्रदाय म्हणून ठोकळपणे ज्याला संबोधण्यात येते तशी नाही. परंतु सामाजिक आशय, स्वातंत्र्यलालसा, मानवी श्रेष्ठता, ‘देवदानवा नरे निर्मिले’ हे केशवसुतांचे निर्भय प्रतिपादन यांची त्वरित ओळख कुसुमाग्रजांच्या कवितेत टीकाकारांना पटली. केशवसुत त्यावेळी किती दूरचे झाले होते ते पहायचे झाल्यास खांडेकरांनी ‘विशाखा’च्या प्रस्तावनेत या गोष्टीचा उल्लेख स्पष्टपणे केला नाही यावरून दिसेल. पुढे मात्र खांडेकरांनी केशवसुतांचे नव्या कवीशी असलेले नाते दाखविलेले आहे.

आचार्य जावडेकर यांनी फडक्यांच्या साहित्यविषयक भूमिकेवर केलेली पुरोगामी साहित्य ही टीकाही येथे लक्षांत घेतली पाहिजे. बेचाळीसच्या क्रांतिपर्वामुळेही या उठावाला अनुकूल काळ आला. स्वातंत्र्य संपादनाची शक्यता बळावू लागली. या काळातील समीक्षा हळु हळु पुन्हा केशवसुतांच्या वाङ्मयीन कामगिरीचे महत्त्व ओळखण्याला प्रवृत्त झाली. १९४६ साली राजाध्यक्ष यांचे पांच कवि हे अभ्यासक्रमात नेमण्यासाठी तयार केलेले पुस्तक, रा. श्री. जोग यांचे केशवसुतावरील समीक्षणात्मक पुस्तक, १९४८ साली आचार्य भागवतांनी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात दिलेली केशवसुतांवरील व्याख्याने, आचार्य जावडेकर यांनी व आ. रा. देशपांडे यांनी काव्य आणि क्रांति याविषयी व्यक्त केलेले विचार, या सर्वांची साक्ष अशीच पटते की, या काळांत केशवसुतांच्या कवितेकडे बघण्याची रसिकांची वृत्ति भक्तिभावाची

होती. या काळातले कवि केशवसुतांबद्दल आस्था दाखवोत अगर न दाखवोत, नव्या राष्ट्रीय उत्थापनाच्या वैचारिक आंदोलनांत कवीची जी उणीव होती ती केशवसुतांनी व कुसुमाग्रजांनी भरून काढली. साने गुरुजीनी, सेनापति बापटांनी व इतरांनी कविता लिहिल्या, परंतु खुद्द राष्ट्रीय चळवळीत असलेल्यांनाच त्या केवळ कळकळीच्या द्योतक वाटणाऱ्या होत्या. म्हणून कवीची उणीव केशवसुत भरून काढू शकतील हे भागवत आणि जावडेकर यांना अन्तर्यामी जाणवले. या सर्व बाबींचा आता थोड्या तपशिलाने विचार करू.

'काव्य आणि क्रांति', केशवसुतांची आध्यात्मिक दृष्टि, केशवसुतांचे वाङ्मयीन मूल्यमापन, केशवसुतांच्या व्यक्तिमत्त्वाची थोरवी, त्यांच्या काव्यदृष्टीतील उत्क्रांति, त्यांच्या कांही कवितांचा मार्मिक अभ्यास या दिशेने ही समीक्षा १९४२ ते १९५१ पर्यंत चालली होती.

आपल्या पाच कवी या पुस्तकातील प्रास्ताविक भागांत राजाध्यक्ष मुख्यत्वेकरून माडखोलकरांच्या केशवसुतनिंदेला निरर्थक ठरवतांना दिसतात. केशवसुतांच्या निर्व्यसनीपणाचा त्यांनी 'कटाक्षाने' उल्लेख केला आहे. केशवसुतांवर बरीच 'राठ' टीका झाली. परंतु राजाध्यक्षानी अतिशय भक्तिभावाने आपली प्रस्तावना लिहिली. त्याचबरोबर केशवसुतांच्या शब्दाऐवजी अर्थाला अधिक प्राधान्य देणाऱ्या वृत्तीचे समर्थन करताना ते म्हणतात, 'केशवसुतांच्या काव्याची प्रकृति विचारशील आहे; तांबे–बालकवींची तशी नाही. ज्या काव्यांतील ओळीओळीत विचाराच्या गाभ्याला हात घालावयाचा तेथे नादाची गुंगी हा दोषच ठरेल...भाषेच्या धुंदीत बालकवीसारखा सच्चा कलावंतही क्वचित घसरेल. कल्पना आणि शब्द यांची पुनरावृत्ति होते. केशवसुतात ती होत नाही इतकी त्यांची ओळन् ओळ स्वतंत्र आहे याचे महत्त्व जाणले पाहिजे. आवेश हा ज्या कवितेचा पहिला गुण तिला नरम आणि नखरेल शैली कशी शोभणार? रॉबर्ट ब्राउनिंग या प्रसिद्ध इंग्रज कवीचे केशवसुताशीं या बाबतीत साधर्म्य आहे." राजाध्यक्षांसारखा साक्षेपी टीकाकार केशवसुत भक्तीच्या सपाट्यात सापडल्यानंतर कवितावरील

टीपा देतांना स्वत: कसा घसरतो ते पाहायचे झाल्यास त्यांची तुतारी कवितेवरील टीप पहावी. या कवितेच्या १९ व्या कडव्यांत केशवसुतांनी 'पोरे' हा शब्द वापरला आहे, त्यावरील राजाध्यक्षांचे भाष्य असे. 'पोरे : स्त्रीला 'भूपृष्ठस्थित आद्य दैवत' मानणारे केशवसुत 'स्त्रियांसारखे रडूं नका' असे म्हणणार नाहीत!" केशवसुतांचे स्त्रीदाक्षिण्य मोठे होते किंबहुना तो त्यांच्या कविमनाचा एक अंगभूत भागच होता. परंतु "स्त्रियांसारखे रडूं नका! असे केशवसुत म्हणणार नाहीत" असा त्याचा अर्थ नव्हे. राजाध्यक्षांनी तुतारी याच कवितेचे पुढचे फक्त २१ वे कडवे पाहिले तर त्यांना दिसेल की केशवसुत लिहितात,

'धार धरिलिया प्यार जिवावर
रडतिल रडोत रांडा पोरे;
गतशतकांची पापे घोरे
क्षालायाला तुमची रुधिरे
पाहिजेत रे! स्त्रैण न व्हा तर!

पण केशवसुतांविषयी पराकोटीचा आदर जसा पूर्वीच्या कांही प्रशंसकांच्या मनात वसत होता, तसाच राजाध्यक्षांच्या मनांत असल्याने त्यांना या ओळी दिसल्याच नाहीत. या ओळीमुळे आदर कमी होण्याचे काही कारण नाही. परंतु संपूर्ण भक्तिभाव हा केशवसुत-समीक्षेचाच एक भाग आहे एवढेच सूचित करायचे आहे.

'क्रांतिरस' नांवाचा नवीन एक रस निर्माण होतो असे प्रतिपादन करणाऱ्या आचार्य जावडेकरांनी आपल्या १९४९ च्या साहित्य-संमेलनांत अध्यक्षीय भाषणांत ज्याचा थोडक्यात निर्देश केला त्याचा पुढे जुलै १९४९ च्या नवभारताच्या अंकात त्यांनी उहापोह केला. तेव्हां केशवसुतांच्या क्रांतिकाव्याविषयी त्यांनी म्हटले, "केशवसुतांनी नवी वृत्ते निर्माण केली, नवे काव्यप्रकार प्रचारात आणले, सर्व विषय हाताळले, काव्यांत पूर्वी योजण्यात न येणारे शब्द व शब्दप्रयोग त्यांनी

योजिले, येवढ्याने केशवसुत हे क्रांतिकारक कवि ठरू शकतील असे मला वाटत नाही. त्यांची कविता ही क्रांतिकारक वृत्तीची सुंदर शब्दमूर्ति आहे असे मला वाटते व म्हणून मी त्यांना क्रांतिकारक युगप्रवर्तक कवि, असे म्हणतो. कविप्रतिभेचे क्रांतिकारक सामर्थ्य त्यांच्या शब्दसृष्टीत प्रगट झालेले आहे. त्यांच्या स्वतःच्या अंतःकरणांतील उत्कट क्रांतिरस त्यांची कविता वाचीत असता वाचकांच्या अंतःकरणातही निर्माण व्हावा असे सामर्थ्य त्यांच्या काव्यांत आहे. आपल्या समाजांत एक सर्वांगीण क्रांति घडत आहे व ती घडणे इष्ट आहे याची जाणीव त्यांना झालेली होती. या क्रांतिकार्यास सहाय्यक व पोषक अशा भावना, विचार आणि वृत्ति समाजातील उत्साही अंतःकरणांत जागृत करणे हे त्यांच्या 'कवितेचे प्रयोजन' होते. कवितेच्या या प्रयोजनाची त्यांना जाणीव झाल्यापासून त्यांचा एक नवा जन्म झाला. काव्यप्रतिभेच्या साधनेत त्यांना आपल्या जीविताची कृतार्थता वाटू लागली; याचे कारण तिचा प्रभाव त्यांना कळला होता. ही प्रतिभा जर आपणांला वश झाली, तर एक जग उलथून टाकण्याची, नवे जग निर्माण करण्याची, पृथ्वीवर स्वर्ग अवतरविण्याची आणि सर्व जगांत शांतीचे साम्राज्य स्थापन करण्याची शक्ति मानवी अंतःकरणांत जागृत करता येईल; निदान ज्यांच्या अंतःकरणांत ती शक्ति जागृत झाली आहे त्यांना आत्मस्वरूपाचे दर्शन घडवून देतां येईल, असा विश्वास त्यांना वाटू लागला होता. या त्यांच्या आत्मविश्वासांत नव्या जगाच्या निर्मितीचे सामर्थ्य मानवी अंतःकरणांतील प्रतिभा नांवाच्या गूढ शक्तीत आहे... शांति आणि प्रीति यांच्याच आराधनेत गुंग होणे एवढेच कवितेचे प्रयोजन आहे, अशी त्या वेळेपर्यंत सामान्य समजूत होती. समाजाला क्रांतिकाल प्राप्त झालेला असतो तेव्हा हे शांतीच्या गृहांत विश्रांति घेणारे किंवा प्रीतीच्या कुंजात रममाण होणारे कवी काय उपयोगी, अशी टीका हे सामान्य लोक करीत असत. ही त्यांची टीका कविप्रतिभेचे क्रांतिकारक सामर्थ्य न समजल्यामुळे होत असे. या टीकेचे घाव जिव्हारी बसल्यामुळे केशवसुतांच्या अंतःकरणास वेदना झाल्या आणि त्यांच्या डोळ्यातून लहान

मुलाप्रमाणे अश्रुधारा वाहू लागल्या. या अवस्थेत त्यांनी कवितेचे क्रांतिकारक स्वरूप पुढील शब्दात प्रगट केले.

प्रेते ही उठवील जी निज रवे
ती तो तुतारी करी ।
आता नादवती, निरर्थ तर ती
त्याची कशी चाकरी ? ।

अशा प्रकारच्या क्रांतिकाव्यास लागणारी शब्दसंपत्ति त्यांनी स्वतंत्रपणे निर्माण केली, क्रांतिवृत्तीची स्वतंत्र प्रतीके निर्माण केली, तिला साजणारे नवे अलंकार अर्पण केले आणि तिला नवे छंदही लावून दिले. या त्यांच्या सर्व नवनिर्मितीतून त्यांचा क्रांतिकारक आत्मा प्रगट होत आहे...केशवसुतांत वेदांत आहे आणि शंकरांचार्यातही वेदांत आहे. पण या वेदान्ताला सर्वांगीण क्रांतिकारक स्वरूप केशवसुतांच्या कवितेत लाभलेले आहे. शंकाराचार्यांच्या वेदांताने शांतरस निर्माण केला. ज्ञानेश्वरांच्या वेदांताने भक्तिरस निर्माण केला, आणि केशवसुतांच्या कवितेने मराठीत क्रांतिरस निर्माण केला; आणि त्याचा आस्वाद घेणाऱ्याला ज्ञानयोग्याची शांति, भक्तियोग्याची प्रीति आणि कर्मयोग्याची वीरवृत्ति यांचा एकत्र अनुभव येऊन या वीरवृत्तीचा उपयोग नवी समाजसृष्टि निर्माण करण्यासाठी करता येईल हे दाखवून दिले. ‘ झपूर्झा ’ कवितेत योग्यांच्या समाधीचे वर्णन नसून ते कवीच्या प्रतिभेचे आहे असे अलीकडे काही लोक म्हणतात. पण योग्याची समाधि, कवीची प्रतिभा व संतांचा साक्षात्कार या सर्वांत जे साधर्म्य आहे ते लक्षांत घेऊनच ती कविता वाचावी लागेल. नवी समाजसृष्टि निर्माण करण्यास जी नवी विचारसृष्टि निर्मावी लागते त्या नव्या विचारसृष्टीला केशवसुतांच्या शब्दसृष्टीने मूर्त स्वरूप देण्याचा प्रयत्न केला आहे. ते कवि आहेत, वेदान्ती आहेत आणि क्रांतिकारकही आहेत.”

आचार्य जावडेकरांच्या विवेचनातील थोड्याशा दीर्घ अवतरणाचा प्रभाव वाचकांवर साहजिकच पडेल. परंतु या अवतरणांतील काही भाग

राष्ट्रीय चळवळीतील विचारवंताना क्रांतिकारक कवीची गरज कशी भासत होती हे दाखविणारा आहे; काही भाग कवितांच्या कालक्रमाच्या तपशिलाच्या विचारांत टिकण्यासारखा नाही; आणि शेवटी शेवटी तर अतिशयोक्तीची जणू परमावधीच येथे गाठली गेली आहे असे थोड्या विचारानंतर दिसून येईल. मात्र हा थंडपणाचा विचार स्वतःलाच नकोसा होतो आणि जावडेकरांसारख्या विचारवंताने गायिलेल्या या क्रांतिस्तोत्रात आपणही सहभागी व्हावे असेच मनाच्या एका भागाला वाटल्यावाचून राहात नाही.

" सत्याग्रह हे या क्रांतिवृत्तीचे पूर्ण परिणत स्वरूप. सत्यनिष्ठा व अहिंसावृत्ति या सनातन मानवधर्माचे ते शुद्ध स्वरूप आहे ... या मंगल क्रांतिवृत्तीचा आस्वाद देणारे साहित्य जर आपण निर्माण केले तर मराठीत महाकवी निर्माण होतील व ' महाकवि व धूमकेतु ' या कवितेत केशवसुतांनी जे म्हटले आहे की

जगातील महाक्रांतीचे भविष्य सांगाया
तुम्ही येतसा लावितसाही ते लोका गाया

ते त्यांचे वचन खरे ठरेल. " असे पुढे लेखाच्या अखेरीस जावडेकरांनी म्हटले आहे. हा लेखही केशवसुत समीक्षा संकलनात अतिशय महत्त्वाचा असून ठोकळ प्रकाशनाच्या पुस्तकांत तो घातला गेला नाही याचे फार वाईट वाटते. ज्याप्रमाणे राष्ट्रीय लढ्यातील सत्याग्रहाचे क्रांतिशास्त्र उलगडून सांगणाऱ्यांना व ज्ञानयोग, भक्तियोग आणि क्रांतियोग जीवनांत समन्वित करून लढ्याच्या अग्रभागी राहाणारांना केशवसुतांची कविता आध्यात्मिक समाधान देणारी व चेतना पुरविणारी ठरली, त्याचप्रमाणे लालजी पेंडसे यांच्यासारख्या कम्युनिस्ट विचारसरणीच्या मीमांसकालाही ती एवढी भुरळ घालणारी ठरली की या मीमांसकाला रशियांतील क्रांति त्यांच्या मृत्यूनंतर बरोबर बारा वर्षांनी झाली हे ' महत्तम ' लक्षण वाटले.

या समीक्षापर्वातील दोन वाङ्मयीन दृष्ट्या उल्लेखनीय प्रयत्न म्हणजे जोगांचा ' केशवसुत-काव्यदर्शन ' हा ग्रंथ व कुसुमावती देशपांडे यांचे

‘ पासंग ’ या त्यांच्या टीकासंग्रहातील कित्येक लेख आणि विशेषतः केशवसुतांवरील तीन वेगवेगळे लेख हे होत. आ. रा. देशपांडे यानींही जावडेकरांच्या क्रांतिरसाऐवजी ‘ प्रक्षोभ ’ रस मानावा म्हणजे केशवसुत आणि मर्ढेकर यांच्या कवितांना तो सारख्याच रीतीने वापरता येईल हे सूचित केले होते, त्याचाही उल्लेख येथे अवश्य आहे.

कुसुमावती देशपांडे यांनी केशवसुतांच्या ‘ आम्ही कोण ? ’ या कवितेविषयीचे विवेचन करताना केशवसुत हे केवळ कवींच्याबद्दल बोलत नसून सर्व प्रतिभावंताबद्दल बोलत आहेत. या मुद्याच्या समर्थनार्थ केशवसुतांची ‘ दिवा आणि तारा ’ ही कविताही विचारात घेतली असती तर निःशंकपणे त्यांना आपले म्हणणे पटविण्यांत फार मदत झाली असती. ‘ दिवा आणि तारा ’ या कवितेत केशवसुत म्हणतात,

‘ ज्ञाते आणि भविष्यवादिहि कवी ते चित्रकर्ते तसे
मत्तेजे फिरतात, अन्य जन हे तूझ्या प्रकाशे जसे ’

त्यांनी केशवसुतांच्या ‘ काव्यदृष्टीतील उत्क्रांति या लेखात सुरवातीला कवितेचा विषय हा कवितेच्या बाहेर असतो, हे इंग्रजीतील प्रसिद्ध वाङ्मयविवेचक ब्रॅडले यांचे प्रतिपादन मनाशी धरून आपल्या विवेचनाचा विस्तार केला, ती या समीक्षेच्या दृष्टीने भरीव अशी वाटचाल होती. मात्र त्या लेखातील ‘ कवितेचे प्रयोजन ’ या केशवसुतांच्या कवितेचा लेखनकाल त्यानी बराच पूर्वीचा धरला आहे. ती कविता केव्हा लिहिली हे त्यांना माहीत नव्हते. परंतु आतां ती मे १८९९ मध्ये प्रसिद्ध झालेली आहे असे भ. श्री. पंडित यांच्या ‘ समग्र केशवसुत ’ या संग्रहावरून स्पष्ट दिसते. प्रयत्नाच्या हाटी आणि जीवित्व नावाच्या रणी सर्वांनी झटून सरसावण्याचा प्रसंग प्राप्त झाला असतांना कवीला गाणे कसे सुचते, आपल्या सुजला सुफला भूमीतील लेकरांना पुरते खायला मिळत नाही आणि तनू झाकायला वस्त्र नाही अशा वेळी कवींनी शांतीच्या घरांतच रहावे, प्रीतीच्या निकुंजातच रमावे हे कसे, असा जो त्या कवितेतील प्रश्न आहे तो भयंकर दुष्काळाच्या दुर्दशेला अनुलक्षून आहे. या दुष्काळाची चित्रे बाळकृष्ण अनंत भिडे व इतर

कवी यांनी तेव्हां अतिशय तीव्रतेने रंगविली आहेत. हरि भाऊ आपटे यांनीही ती भीषण स्थिति वर्णिली आहे.

या प्रश्नामुळे कविमनात खेदोर्मी हेलावल्या आणि नेत्रांतून बाष्पसरिता वाहू लागल्या. तो असा रडू लागल्याचे पाहून कुणाला वाटेल की ही त्याची विकलता किंवा स्त्रैणपणा दयनीयच आहे. तथापि कवि धीरोदात्त असतो हे जगाला माहीत आहे. आपली सुजला सुफला भूमि सोन्याच्या ऐश्वर्यात होती तिचे ते दिवस सरले आणि ती दुःखपंकात कशी पडली हे कालक्रीडित बघून तो रडला यात विपरीत काहीच नाही. अशा हळुवार भावना असणे, बालकांप्रमाणे घळघळा रडणे ही कविवृत्तीच होय. 'प्रौढत्वी निज शैशवास जपणे बाणा कवीचा असे.' या केशवसुतांच्या ओळींचा संदर्भ हा असा आहे.

याच कवितेत कवीची थोरवी सांगताना केशवसुत पुढे म्हणतात, त्याच्या काव्यशक्तीचे महत्त्व ओळखून राजेशाही पूर्वी वाकले आहेत. या ओळी जर नीट वाचल्या तर कवीची श्रेष्ठता किंवा 'कवितेचे प्रयोजन' सांगत असतांना 'मी केशवसुत नांवाचा कवि अशा थोरवीचा आहे' हे केशवसुतांना मुळीच म्हणावयाचे नाही हे ध्यानी येण्यास अडचण पडू नये.

जोगांच्या 'हरपलेले श्रेय' या केशवसुतांच्या कवितासंग्रहात 'कवितेचे प्रयोजन' या कवितेवरील टीप शेवटी दिली आहे त्यात हे अवधान सुटले आहे असे दिसते. त्यामुळे अनेक गैरलागू गोष्टी त्या टीपेत आल्या आहेत. मा. त्रिं. पटवर्धनांनी म्हटले की केशवसुतांनी 'गतवैभव' रंगविणारी कविता लिहिली नाही. त्याच विधानाचा अवलंब करून जोग या टीपेत म्हणतात की, या कवितेतील 'गेले वैभव' गाण्याचे काम केशवसुतांच्या कवितेने केव्हाच केले नाही... काव्याचे जे प्रयोजन त्यांना स्वतःलाच नीटसे पटले नसावे त्याचा पुरस्कार त्यांनी करावयास पाहिजे होता काय? 'प्रौढत्वी निज शैशवास जपणें' हा कवीचा बाणा असल्याचा उल्लेख या कवितेत आहे; पण त्याचा आणि पुढील

प्रयोजनाचा लागावा तसा संबंध लागत नाही.' इतकी घसरलेली टीप जोग देतात त्याचे कारण दिसते ते असे की, कवि म्हणजे केशवसुत हे समीकरण त्यांनी मनाशी पक्के करून ठेवले आहे. परंतु या सबंध कवितेत कवि 'धीरोदात्त असेचि तो श्रुत असे हे दूरहि भूवरी'; त्याच्यापुढे राजेश पूर्वी वाकले आहेत; 'गेले वैभव गाउनी स्फुरण' देणारा असा तो आहे, असे केशवसुत म्हणतात. याचा अर्थ माझ्या समजुतीने असा आहे की, ते सबंध कविवर्गाबद्दल बोलत आहेत–पूर्वीच्या, आतांच्या, स्वतः आणि इतरही विनायक, माधवानुज यासारख्या कवींच्या बद्दल; फक्त स्वतःच्या 'कवितेला उत्तेजन द्या हो' असे ते अजीजीने म्हणण्याचा संभव थोडा आहे. "कवितेचे प्रयोजन" या कवितेत 'तुतारी' 'निशाण' यांचा उल्लेख आहे हे खरे. कदाचित तो उल्लेख केशवसुतांच्या या नांवाच्या कविता विषयींचाही असेल. तरी देखील सबंध कवितेत 'घळघळा शिशूसारखे संवेदनाक्षम भावनेने रडणे हे कवीचे लक्षण,' तो धीरोदात्त आहे हे सर्व जगाला माहीत आहे असे वर्णन, त्यानं 'गेले वैभव' गाऊन स्फुरण वाढविले आहे ही त्याची ख्याती, या सर्वांचा विचार केला आणि पूर्वी राजेश त्यांच्यापुढे वाकले आहेत हे ध्यानी घेतले तर या कवितेत वर्णिलेले सर्व केशवसुताच्याच तेवढे कवितेचे प्रयोजन होते असे नव्हे, हे सर्वमान्य असे 'कवितेचे प्रयोजन' होते हे पटावयास अडचण पडू नये.

कवीची निराशा, लोकांनी त्याची केलेली उपेक्षा या सर्व उल्लेखांचा अर्थ केशवसुतांच्या स्वतःच्या कविताविषयी लोकांनी दाखविलेली उदासीनता असा घेतल्यामुळेच पुष्कळसा गैरसमज टीकाक्षेत्रात माजलेला आहे असे मला तरी वाटते.

जोगांचा ग्रंथ महत्त्वाचा आहे खरा, परंतु तो वर्गीकरणाच्या पद्धतीला अनुसरून लिहिलेला आहे आणि जोगांची रसिकताही केशवसुतांची कविता समजूत घेण्यासाठी ज्या वृत्तीची असावयास पाहिजे तशी नसल्यामुळे, जो काही माहितीचा भाग आहे त्या भागांत तो खऱ्या

अर्थाने मार्गदर्शन करील परंतु रसग्रहणात मात्र तो ते खात्रीने करू शकेल असा भरंवसा वाटत नाही. खांडेकरासारख्या रसिकाची या ग्रंथाने जी निराशा झाली ती खालील शब्दात पहावयास मिळेल. " आत्मदर्शन,. समाजदर्शन व जीवनदर्शन ही जी उच्च कलेची प्रमुख अंगे असतात त्यांचा केशवसुतांच्या कवितेत झालेला आविष्कार मोठा हृद्य व अभ्यसनीय आहे; पण त्याकरितां त्यांच्या कवितांच्या वर्गी· करणाची परंपरागत पद्धत सोडून दिली पाहिजे, त्यांच्या कवित्वाला आधारभूत असलेल्या सतेज व स्वतंत्र व्यक्तित्वाशी समरस होऊन त्यांच्या अंतरंगात प्रवेश केला पाहिजे " ( महाराष्ट्र साहित्य पत्रिका, जानेवारी-मार्च १९४८ ).

कुसुमावती देशपांडे यांच्या केशवसुतसमीक्षेचा विचार करू लागल्यावर मात्र वाटू लागते की, आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या सर्व समीक्षांमधील सुवर्णकांतीची समीक्षा त्यांचीच. केशवसुतांचे अंतरंग त्यांनी ज्या उन्नत, प्रौढ, रेखीव सुबकपणाने जागजागी आपल्या अकृत्रिम शैलीने रंगविले आहे ते वाचताना असे वाटते की, केशवसुतासारख्या कवीला खरा भाष्यकार मिळाला. प्रत्येक कवितेवर त्यांनी भाष्य केलेले नाही. परंतु ' वाङ्मयाचा आस्वाद ' ' कवींची काव्यदृष्टि ' ' इंग्रजी काव्य आणि मराठी मनोवृत्ति ' या निबंधातीलसूद्धा केशवसुतांसंबंधीचे जे उल्लेख आहेत ते त्यांच्या प्रगल्भ व संस्कारसंपन्न अभिरुचीचे द्योतक आहेत. केशवसुतासंबंधी आत्मीयतेने, गौरवभावनेने, भक्तिभावाने लिहिणाऱ्या समीक्षकाहूनही ही टीका आपल्या संयत परंतु भारदस्त अभिजाततेने व रसिकतेने उठून दिसते. तपशिलांच्या दोषाकडे लक्ष्यच जात नाही.

केशवसुतसमीक्षेच्या अखेरच्या पर्वाकडे आता आपण वळत आहो. १९५६ ते १९६६–६७ पर्यंतच्या या समीक्षेचे स्वरूप वाङ्मयीन टीकेत आलेल्या नव्या विचारांचे प्रतिबिंब दर्शविणारे आहे; त्याचप्रमाणे स्मृतिदिन आणि शताब्दिमहोत्सव यांच्या अनुषंगाने निरनिराळ्या रीतीने गौरव करणारे असे आहे. येथेच केशवसुतांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणारी सृजनशील टीका म्हणून एका लघुकथेचाही

विचार आवर्जून केला पाहिजे. हे केशवसुतांच्या कविमनाचे दर्शन बऱ्याच अर्थाने समानधर्मी अशा कविवर्य कुसुमाग्रजांनी 'सतारीचे बोल' या आपल्या लघुकथेत घडविले आहे. अशा लघुकथेत तपशिलांचा शंभर टक्के अचूकपणा अभिप्रेत नसतो. केशवसुतांच्या अन्तर्दर्शनाचा हा एकुलता एक परंतु अतिशय लक्षणीय असा या धर्तीचा प्रयोग आहे. खांडेकरांनी पूर्वी 'केशवसुतांची कविता' या नावाची एक लघुकथा लिहिली होती, तिच्यात हे सूत्र प्रधान नाही.

केशवसुतांच्या निराशेची मीमांसा करणारे लेख, त्यांच्या कवितांतील उपमानसृष्टि, त्यांनी कल्पित-कथा निर्मिण्याचा केलेला प्रयत्न, त्यांच्या चरित्रासंबंधी अधिक माहिती मिळविण्याचा प्रयत्न, त्यांनी दीर्घ कविता लिहिली असती काय, याविषयीचे अनुमान करण्याचा प्रयत्न, त्यांच्या वाङ्मयऋणाचा फिरून एकदा अभ्यास हे सारे अलीकडच्या या पंधरा वर्षांतील लेखनही समीक्षा क्षेत्रात योग्य ती भर घालीत आहे आणि पूर्ववत् गैरलागू मुद्यांची चर्चा काही वेळा वाढवीत आहे.

## १९५६ ते १९६६

१९५६ साली केशवसुतांच्या पन्नासाव्या स्मृतिदिनाचा विशेष गाजावाजा झाला नाही. मात्र कॉपीराइटचा निर्बंध नाहीसा झाल्यामुळे त्यांच्या कविता वेगवेगळ्या संपादकांनी आपल्या प्रस्तावनेसह व काही वेळा टीपा देऊन प्रकाशित केल्या. या संपादनातील महत्त्वाचे पुस्तक म्हणजे खांडेकरांचे 'केशवसुत- काव्य व कला' हे पुस्तक होय. स्मृतिदिनानिमित्त परशुराम चिंतामण दामले यांनी केशवसुत-स्मृति-ग्रंथ त्याच वर्षी प्रकाशित केला, तीही केशवसुत समीक्षेत एक भर पडली. भवानीशंकर श्री. पंडित यांच्या 'समग्र-केशवसुत' या कवितासंग्रहांत केशवसुतांच्या कविता मुंबई ग्रंथसंग्रहालयातील मूळ हस्तलिखिताशी ताडून पाहून तपासून घेतलेल्या अशा छापल्या गेल्या, हीही चिकित्स-कांच्या दृष्टीने हितावह व विपरीत तर्कांना आळा घालणारी गोष्ट घडली. मात्र या दृष्टीने महाराष्ट्र सरकारने मूळ हस्तलिखिताच्या ठशांवरूनच

जी आवृत्ति नुकतीच प्रसिद्ध केली आहे ती तेवढ्या कवितांपुरती याहूनही अधिक उपयुक्त झाली आहे. १९६६ ते १९६७ हे सर्व जन्मशताब्दि वर्ष मानले गेल्याने व हा समारोह मोठ्या प्रमाणात राज्यातील महत्त्वाच्या जागी साजरा केला गेल्याने वाङ्मयीन व शैक्षणिक क्षेत्रांत केशवसुतांविषयी विशेष आस्था निर्माण झाली. या वर्षात दोन लहान टीकाग्रंथ मराठीत प्रसिद्ध झाले – एक बेडेकरांचा व दुसरा वसंत दावतर यांनी संपादित केलेला ' केशवसुत गाउनि गेले ' हा. याखेरीज वेगवेगळे प्रदीर्घ वा लहान असे केशवसुतांवरील लेख अनेक नियत-कालिकांतून प्रसिद्ध झाले ते वेगळेच. खेरीज मुंबई विद्यापीठ व नागपूर विद्यापीठ यांनी केशवसुत व्याख्यानमालाही आयोजित केल्या.

इंग्रजीतही आणि हिंदीमधूनही जन्मशताब्दिनिमित्ताने समीक्षणे प्रसिद्ध झाली. खास गौरव म्हणून ज्याचा निर्देश केला पाहिजे ती मानवंदना म्हणजे साहित्य अकादमीने केशवसुतांच्या काही कवितांचा इंग्रजी अनुवाद, त्यांच्याविषयी प्रास्ताविक विवेचनात्मक माहिती थोडक्यात देऊन, प्रसिद्ध केला ही होय.

खांडेकरांच्या ' केशवसुत काव्य व कला ' या पुस्तकाच्या संपादकीय प्रस्तावनेतील केशवसुतांच्या समकालीन कवींबद्दलची व ' काव्यदोहन ' या पुस्तकाच्या स्मृतीची उजळणी करणारी माहिती, केशवसुतांच्या सामाजिक कवितांविषयीची चर्चा आणि केशवसुतांचा पुढील कवींवरचा आजपर्यंत दिसून येणारा परिणाम याविषयीची चर्चा ही उद्‌बोधक आहेत. ' भवानी तलवार ' ही केशवसुतांची न उपलब्ध होऊ शकणारी कविता त्यानीच उल्लेखिली आहे. नेहमीच्या जागरूक रसिकतेने व उत्कटतेने या प्रस्तावनेतील कित्येक विभाग लिहिले गेले आहेत. विशेषतः प्रस्तावनेतील ११ वा विभाग ( **केशवसुतांची सामाजिक कविता**) खांडेकरांच्या जाणिवेचे आणि रसिकतेचे दर्शन त्यांच्या नेहमीच्या शैलीत चांगले घडवतो. " एरवी समर्पक आणि रसपरिपोषक शब्दा-करता अडखळणारे आणि मंद दृष्टीच्या मनुष्याने पायऱ्यांवरून बेताने उतरावे, त्याप्रमाणे एकेक शब्द विचारपूर्वक टाकीत रचना करणारे केशवसुत ' तुतारी ', ' स्फूर्ति ', ' गोफण ' वगैरे कवितांत बेहोष होऊन

गात सुटतात, गर्जत राहातात. उत्कृष्ट पोवाड्यात आढळणारा जोम त्यांच्या या कवितेत आहे... या नव्या पोवाड्यांना कुठलीही पूर्वपरंपरा नव्हती. या सामाजिक कवितेला नाके मुरडणाऱ्या व ‘ काव्य ’ गुणांचा विचार करतांना सामाजिकता हे एक उपरिमूल्य मानले पाहिजे, काव्य हे काव्याकरितां असते, त्याची किंमत केवळ काव्यगुणावरच अवलंबून असते ’ असे आक्षेप घेणाऱ्यांना उत्तर देतांना खांडेकर म्हणतात, ‘ केवळ कुठलाहि विचार काव्याला प्रेरक होत नाही हे खरे आहे. पण जो विचार कविहृदयाच्या रसरसलेल्या भट्टीत पडतो त्याची स्थिति वितळणाऱ्या लोखंडासारखी होते. न कळत तो भावनेचे रूप धारण करतो. ’

बेडेकर यांचे ‘ केशवसुतांची काव्यदृष्टि ’ हे लहानसे पुस्तक ‘ स्वर्गसमक्षता ’ हा १९५५ साली लिहिलेला लेख व इतर जन्मशताब्दिवर्षातील वेगवेगळे लेख यांचे संकलन असून त्यांतील शेवटच्या लेखांत बेडेकर म्हणतात, ‘ केशवसुतांच्या कवितेचे सामर्थ्य व दुबळेपणा त्यांच्या मूलभूत काव्यश्रद्धेच्या आधाराने जोखला पाहिजे. केवळ आत्मपर किंवा सामाजिक जाणीवेची कविता त्यांना लिहावयाची नव्हती. आत्मनिवेदनपर अशी वाटणारी त्यांची कविता कविहृदयाचा ललितभाव सरळ, ऋजु, उस्फूर्त शब्दांत मूर्त करणारी असते. हे कविहृदय एका व्यक्तीचे ( केशवसुतांचे ) भावनासंकुल हृदय नसते, तर सृष्टीशी संवादी झालेले मत्त मानव-हृदय असते; किंवा सृष्टीच्या विरहाने भग्न झालेले मानव-हृदय असते.’ याच लेखांत बेडेकरांनी अज्ञात अशा बाह्य विश्वाविषयी केशवसुतांची काय कल्पना असावी याचे अनुमान करण्याचा-तत्त्वज्ञानक्षेत्रातील विषयाचा-सूचक उल्लेख केला असून टीकाक्षेत्राची कक्षा त्यामुळे बरीच रुंदावली आहे. पुढील विवेचनांत गद्यग्रथित जगाला नवीन रूप देण्याच्या केशवसुतांच्या मनीषेचा उल्लेख हा त्यांच्या आधीच्या ‘ स्वर्गसमक्षता ’ या महत्त्वाच्या टीकालेखातील दृष्टीचा विकसित भाग आहे असे म्हणता येईल.

बेडेकरांच्या पुस्तकातील इतर टीकालेखांमुळे, सध्या जी केशवसुतांच्या एकेक कवितेचा कलात्मक घाट, कलापूर्णता या दृष्टीने अभ्यास करण्याची,

लय व ताल आणि आशय-अभिव्यक्ति यांची एकरूपता रंगवून निदर्शनास आणण्याची प्रथा पडत आहे त्या प्रथेतील आहेत. या कवितांचा असा अभ्यास उपकारक असला तरी बेडेकरांचे हे पिंजण थोडेसे अतिशयित स्वरूपाचे होत आहे काय, अशी शंका केव्हा केव्हा डोकावून जाते.

'केशवसुत गाउनि गेले' हे दावतर यानी संपादित केलेले आलोचना मासिकाच्या खास केशवसुत अंकातील लेखन याच प्रथेचे दर्शन घडविते. यातील 'गोष्टी घराकडिल मी वदता गड्या रे' या कवितेचे ल. ग. जोग यांनी केलेले आटोपशीर रसग्रहण रा. श्री. जोग यांच्या 'केशवसुत (काव्यदर्शन)' या ग्रंथातील या कवितेवरील भाष्यात मधून मधून खटकणारा जो भाग होता त्याचा निरास करणारे आहे. गंगाधर पाटील यांनी 'फिर्याद' या कवितेचे परीक्षण करतांना तिच्यातील धृपद कडव्यांच्या आशयाशी बऱ्याच वेळा विसंगत वाटते अशी तक्रार केली आहे. 'सतारीचे बोल' ही कविता ड्रायडनच्या इंग्रजी कवितेवरून केशवसुतांना स्फुरली असे मानणाऱ्या पूर्वीच्या टीकाकारांनी केशवसुतावर अन्याय केला आहे असे गजानन कामत यांनी आपल्या रसग्रहणात म्हटले आहे. 'केशवसुत-समीक्षा'-(१९०६-१९५६) या टीका संकलनाच्या प्रास्ताविकात जो विचार मांडला गेला आहे तोच येथे कामत यांनी मांडला आहे. 'व्यवहारवादी जाणीव पद्धति व प्रतीकवादी (काव्यात्म) जाणीव पद्धति यांच्यातील भेदाचे केशवसुतांनी वारंवार केलेले प्रतिपादन' हे आगरकरांच्या सुधारणावादाचा केशवसुतांनी अंगीकार केला तरीही त्यांचे वैशिष्ट्यपूर्ण निराळेपण आहे असे कामत या कवितेच्या रसग्रहणाच्या संदर्भात म्हणतात.

कामत यांच्या या प्रतिपादनामागची भूमिका या रसग्रहणाच्या लेखांत आणि 'केशवसुत-समीक्षा-१९०६-१९५६' यातील लहानशा प्रस्तावनेतही आहे; तिच्याविषयी थोडेसे लिहिले पाहिजे. कामतांचे प्रमेय असे की चिपळूणकर आणि आगरकर यांची विवेकवादी व जडवादी तत्त्वज्ञानाची विचारसरणी माणसाला अनुभववादी व काव्यद्रोही

बनविते. ‘संस्कृति आणि काव्य यांच्या परस्पर संबंधासंबंधीचे चिपळूणकरी विचार खोडून काढण्यासाठी’ केशवसुतानी आपल्या ‘कवि’ ‘कवितेचे प्रयोजन’ ‘आम्ही कोण?’ या कविता लिहिल्या. आगरकरांच्या बुद्धिवादामुळे जडवादी तत्त्वज्ञानामुळे आपली काव्य-विषयक दृष्टि पोसली जाणार नाही हे केशवसुतांच्या ध्यानी आले. अशरीरी आत्मा आगरकरांना नामंजूर होता. ही वृत्ति कवितेला फार घातक होती.

चिपळूणकरांच्या ज्या निबंधाचा निर्देश समीक्षा संपादन करणाऱ्या ग्रंथात आहे तो ‘विद्वत्त्व व कवित्व’ हा निबंध पूर्णपणे वाचण्याची अतिशय गरज आहे. चिपळूणकर त्या निबंधात म्हणतात की विद्वत्त्व आणि कवित्व यांचा संबंध नाही. कवित्व हे चांगल्या सहृदयतेने भरलेल्या गद्य उताऱ्यातदेखील असेल; उलट केवळ पद्यात रचले आहेत म्हणून नीरस ग्रंथ काव्यपदवीला पोचणार नाहीत. त्याचप्रमाणे आगरकरांविषयी म्हणावयाचे झाल्यास, मेकॉलेचे मत साहसाचे आहे व ज्ञानप्रसार होऊ लागला म्हणजे कवित्वशक्तीस मांद्य येते हा अभिप्राय खोटा ठरतो असे आगरकर ‘कवि, काव्य, काव्यरति’ या निबंधात म्हणतात. ‘जागृतावस्थेत मन चंचल असता त्यात जे व्यापार चालतात त्यांचे संवदेना, इच्छा व ज्ञान असे तीन वर्ग करता येतील. या तिहीं-पैकी पहिल्याचा काव्याशी विशेष संबंध आहे.’ हे त्यांचे आधीचे वाक्य न देता पुढील अवतरण कामतानी दिले आहे. शिवाय याच निबंधात आगरकर स्वतःला प्रश्न विचारतात. ‘काव्यात वर्णिलेली सत्ये नेहमी अनुकूल संवेदनोत्पादक असली पाहिजेत, हे मत खरे असेल, तर काव्यात दुःखपर्यवसायी नाटकांचा किंवा अवर्षणादि अरिष्टांच्या वर्णनांचा समावेश कधीच करिता येणार नाही. काही अंशी ही शंका बरोबर आहे;’ मात्र त्याचे उत्तर आगरकर देतात ते असे, “सुखदुःखाचा प्रत्यक्ष अनुभव आणि सुखदुःखावर पुनः पुनः विचार करून ती आपणांसच होत आहेत असा भास करून घेण्याचा प्रयत्न, यांत पुष्कळ अंतर आहे.” तरीही हे अंतर अतिशय कमी झाले पाहिजे अशी त्यांना जाणीव आहे. म्हणून पुढे ते म्हणतात,

" विचाराने प्रत्यक्ष सुखदुःखाच्या तीव्रतेचे पूर्ण प्रतिबिंब आपल्यावर उठवून घेणे याचेच नाव तादात्म्य, तंद्री किंवा एकतानता. ज्याला सुखदुःखाचा प्रत्यक्ष अनुभव होत आहे, त्याच्या मनाप्रमाणे कवींच्या मनाची स्थिति झाल्याशिवाय त्याच्या काव्यात तो तो रस पूर्णपणे उतरणार नाही ...कवीला ज्या विषयाशी आपल्या मनाची तंद्री लावून घ्यावयाची असते, तो विषय अनुकूल संवेदनोत्पादक असो, की प्रतिकूल संवेदनोत्पादक असो, त्याला जे कष्ट पडतात, ते उभयपक्षी सारखेच असतात ... कल्पना प्रज्वलित होऊन कल्पनाविषयीशी तादात्म्य होणे- यांतच कवींचा आणि काव्यवाचकांचा आनंद आहे." काव्याविषयीची ही आगरकरांची कल्पना आता अपुरी वाटणारी आहे. परंतु ती ' काव्यद्रोही ' कशी काय ठरते ते समजत नाही. चिपळूणकरांच्या निबंधात दुसऱ्या भागात एवढेच म्हटले आहे की विद्वत्त्व हे कवित्वाला खरे म्हणजे मारकच होण्याची शक्यता फार विद्वत्त्व कवित्वाला आवश्यक मुळीच नाही. कवित्वशक्ति सहृदयतेवर अवलंबून आहे. चिपळूणकर आणि आगरकर यांच्या तत्त्वज्ञानाला एकाच मालिकेत गोवणे हे तर फारच धाष्टर्याचे आहे. निरीश्वरवादी किंवा जडवादी विचारसरणी आगरकरांची बऱ्याच बाबतीत आहे; परंतु ती भारतीय संस्कृतीला सचेतन करण्यासाठी केलेल्या औषधयोजनेसारखी आहे.

आतां फक्त केशवसुतविषयक कांही लेख जन्मशताब्दिनिमित्ताने प्रसिद्ध झाले, त्यांतील एकदोघांचा परामर्ष आणि इंग्रजीतील गौरवपर लेखन यांची धावती दखल घेण्याचे उरले.

केशसुतांची कविता : एक मूल्यमापन हा प्रा. गो. वि. करंदीकर यांचा सत्यकथेतील ( जून १९६६ ) लेख केवळ गौरवभावनेच्या आहारी गेला नाही. 'केशवसुतांच्या कवितेतील शब्दसमरसतेचा अभाव व प्रतिभा-समरसतेचा अभाव ही केशवसुती काव्यशैलीची फार मोठी वैगुण्ये आहेत ' असे कवि म्हणून जाणवणारे आपले मत त्यात करंदीकरांनी मांडले आहे. वर्डस्वर्थमध्ये जी प्रगल्भता, उद्रेकी अनुभवांचा प्रशांत मनःस्थितीतील पुनःप्रत्यय व पुनर्घटना करू शकणारी सृजनशील

अवस्था किंवा तरल चिंतनात्मकता आहे ती केशवसुतांमध्ये सामान्यतः आढळत नाही असेही करंदीकर म्हणतात. मात्र वर्डस्वर्थला लाभलेली इंग्रजी काव्याच्या परंपरेची पार्श्वभूमि आणि वर्डस्वर्थच्या वेळच्या राजकीय, सामाजिक व धार्मिक जीवनातील उलथापालथी यामुळे वर्डस्वर्थला आपली कविता नवीन क्रांतिकारी वळणावर नेणे जेवढे सोपे झाले, तितके योग्य प्रकारच्या काव्यपरंपरेच्या अभावी आणि केवळ बुद्धिनिष्ठ उदारमतवादी सुधारणावादाच्या वातावरणांत केशवसुतांना करता येण्यासारखे नव्हते, ही जाणीव पुन्हा एकदा थोड्याशा विस्ताराने त्यानी करून दिली आहे. केशवसुतांच्या कार्याची तुलना यापूर्वी बऱ्याच वेळा वर्डस्वर्थच्या कार्याशी केली गेली आहे. येथे ती मांडताना करंदीकरांनी लोकहितवादी, रानडे व आगरकर यांच्यामार्फत घडलेल्या वैचारिक क्रांतीचा उल्लेख केला आहे. राजवट उलथून टाकण्याजोगी क्रांति येथे झाली नाही; परंतु फुले, दयानंद आणि वासुदेव बळवंत यांच्या चळवळींचाही ओझरता उल्लेख येथे आला असता तर ते अधिक इतिहासनिष्ठ झाले असते. क्रांति उद्दाम उद्रेकांचा संचार बाह्य वातावरणांत करणारी नव्हती, म्हणून केशवसुतांचे निर्भरशील काव्य सुधारणावादी विचाराशी मेळ घालीत घडवावे लागले, अशी त्यांची मीमांसा आहे.

या लेखांत केशवसुतांची एक अप्रकाशित कविताही करंदीकरांनी ती ' काहीशी उत्तान असली तरी अश्लील नाही ' असा रास्त अभिप्राय देऊन प्रथमच लोकांच्या नजरेस आणून दिली आहे.

स्वतःच्या प्रतिपादनातील वेगळेपण स्पष्टपणे वाचणाऱ्याला जाणवावे म्हणून ' तुतारी ' कवितेविषयी करंदीकर म्हणतात, ' केशवसुतांना क्रांतिकारक कवी ठरवताना आपण ते त्यांच्या या कवितेतील क्रांतिकारक सामाजिक विचारांच्या आधाराने ठरवीत नाही, ही दक्षता सतत घ्यावी लागेल. त्यांच्या काव्यक्रांतीचा व पर्यायाने क्रांतिकारकत्वाचा खरा आधार निर्भरशील कवितेच्या नव्या युगाची प्रस्थापना हाच आहे. माझ्या विधानातील रोख स्पष्ट करण्यासाठी थोडीशी अतिशयोक्ति

करून असे म्हणता येईल की, परंपरागत व रूढ विचारांचा पुरस्कार करणारी निर्भरशील कविता त्यांनी लिहिली असती, तरीही केशवसुतांनी काव्यक्रांति केली असती असेच म्हणणे आपणाला भाग पडले असते. काव्यक्रांतीच्या दृष्टीने वैचारिक क्रांती ही पोषक असली तरी निर्णायक नाही. ''

वर्डस्वर्थच्या आसमंतात जी बाह्यघटनांची क्रांतिकारक मालिका करंदीकरांनी स्वतःच या लेखात निर्देशिली आहे व जिच्याशी वर्डस्वर्थच्या निर्भरशील काव्यक्रांतीचे निःसंदिग्ध नाते आहे–हे कोणालाही नाकबूल करता येणार नाही–त्या संदर्भात 'तुतारी' विषयीचे हे प्रतिपादन 'थोडीशी अतिशयोक्ति' करीत नसून केवळ नव्या साहित्य-विचारापासून आपण दूर गेलो नाही हे सिद्ध करण्याच्या यत्नासारखे वाटते. 'विशुद्ध साहित्य,' 'विशुद्ध कविता' यांना सामाजिक आशयाचे वावडे वाटते हे जे खांडेकरांनी म्हटल्याचे मागे त्यांच्या लेखनाविषयींच्या विवेचनांत वाचकांच्या नजरेस आणून देण्यात आले आहे त्याची येथे त्यांना आठवण होईल.

'तुतारी' विषयी लिहितांना करंदीकर पुढे म्हणतात, "जणू काय 'तुतारी' फुंकल्यावर केशवसुतांचा आवाज साफ झाला, आणि त्यावेळी लागलेला आवाज त्यांना निरनिराळ्या ढंगातील कवितांना कमीअधिक प्रमाणांत उपयोगी पडला...'तुतारी' मधील आदर्श हा सामाजिक जाणिवेच्या कवितेतील पुढील स्थित्यंतरांना सर्वस्वी पोषकच ठरला आहे असे म्हणता येणार नाही.'' ज्या कवितेने केशवसुतांचा आवाज साफ झाला, जी कविता 'भूताऐवजी भविष्यातून प्रेरणा घेणारा एक आधुनिक पवाडा आहे', ज्या कवितेमागील आगरकरी प्रेरणा व प्रत्यक्ष समाजजीवनाचे परिवर्तन घडविण्याचे लक्ष्य स्पष्ट होत आहे त्या कवितेचे 'स्वायत्त काव्यमूल्य' हिरावून घेण्याचा कोणी प्रयत्न करू नये; आणि ते 'स्वायत्त काव्यमूल्य' कोणी हिरावून घेऊ शकणारही नाही. परंतु या कवितेचे सामाजिक क्रांतीचे उद्दिष्टच ध्यानी घेऊन आपण केशवसुतांना क्रांतिकारक कवी ठरवू नये, असे करंदीकरांचे म्हणणे. या कवितेतील सामाजिक क्रांतीचे उद्दिष्ट उलटे

फिरवून 'परंपरागत व रूढ विचारांचा पुरस्कार' तिच्यात आला असता तर त्या कवितेला जे 'स्वायत्त काव्यमूल्य' लाभले असते त्याची किंमत किती झाली असती ?

करंदीकरांच्या प्रतिपादनाचा रोख असा असेल की, बाह्यपरिस्थितीत प्रचंड क्रांतिकारक बदल न घडता सुद्धा वाङ्मयांत क्रांतिकारक बदल घडून येऊ शकतो. इंग्लंडमधील एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या कालखंडांतील फ्रेंच कवितेत, लेखनांत बदल झालेला स्पष्ट दिसतो. मर्ढेकरांनी रविकिरणमंडळाच्या व कुसुमाग्रजांच्या काव्यशैलीत क्रांतिकारक बदल केला, नवसाहित्य असा क्रांतिकारक बदल बाह्य सामाजिक व राजकीय उलथापालथी फारशा होत नसतानाही घडवीत आले आहे. परंतु केशवसुतांच्याविषयी विचार करणाऱ्याला त्यांच्यामध्ये विशेष काही आढळत असेल तर स्वतः करंदीकर म्हणतात त्याप्रमाणे, "केशवसुती काव्य पंडिती काव्यवृत्तीतून जितक्या सफलतेने बाहेर पडले, तितक्या सफलतेने पंडिती काव्यशैलीतून बाहेर पडू शकले नाही." ही नवी काव्यवृत्ति इंग्रजी कवितेच्या हव्यासाने, समाजसुधारणा हे ध्येय कवितारूपाने मांडण्याच्या जोषपूर्ण किंवा विषादपूर्ण छटांनी, तत्त्वचिंतनाच्या उर्मींनी रंगलेली अशीच आहे.

केशवसुत–परंपरेतील कवि म्हणून कविता लिहावयास सुरुवात करणाऱ्या, त्या कवितेच्या सामाजिक, प्रीतिविषयक आणि तत्त्वचिंतनपर अशा अभिव्यक्तींनी आकृष्ट झालेल्या व तिच्या या अंगांचा 'स्वेदगंगा' या कवितासंग्रहातील बऱ्याच कवितांमध्ये यशस्वी पण स्वतंत्र प्रतिभादर्शी अवलंब करणाऱ्या आजच्या आघाडीवरील एका कवीचे हे केशवसुतविषयक मूल्यमापन हा केशवसुत शताब्दिनिमित्ताने झालेल्या सर्व लेखनातील अतिशय महत्त्वपूर्ण असा गाभा होय यात मात्र शंका नाही.

केशवसुतांवरील एक धाडसी लेख 'व्यस्ततावादी प्रस्फुरणे' हा होय. केशवसुतांची आजची आवश्यकता व अर्थवत्ता केशवसुतांच्या कवितांमधील 'व्यस्त' आशयरूपांतच आहे. केशवसुत आजच्या रसिकांना सौंदर्यवादीही वाटत नाहीत, सुधारणावादीही वाटत नाहीत

आणि साक्षात्कारवादीही वाटत नाहीत अशी या लेखाच्या अखेरीस रा. ग. जाधव ग्वाही देतात. वास्तविक घर म्हणजे पिंजरा ही जाणीव ठेवून केशवसुतांनी ‘ गोष्टी घराकडिल ’ ही कविता विकसित करावयास पाहिजे होती अशी जाधवांची मागणी आहे. घर हे अखेर व्यक्ति-जीवनाला विपरीततेचीच प्रचीति देते. कारण व्यक्तीला गुलाम करणारे एक पारंपारिक संस्थारूप साधन म्हणजे घर होय. परंतु या कवितेत सुरुवातीला त्यांनी ‘ विपरीत ’ शब्द वापरला होता तरी घराच्या या दास्याची जाणीव त्यांना झाली तो ‘ दिव्य क्षण ’ त्याना या कवितेत धरून ठेवता आला नाही असेही जाधव निःशंकपणे म्हणतात. हा ‘ विपरीत ’ शब्द कसा आला ? केशवसुतांनी म्हटले,

“ गोष्टी घराकडिल मी वदता गड्या रे !
झाले पहा कितिक हे विपरीत सारे ”

या ‘ विपरीत ’ शब्दाचा विपरीत किंवा व्यस्त अनुभवाशी (absurdity) संबंध जोडणे आणि त्याविषयी “ केशवसुतांचा घरांचा अनुभव ‘ विपरीत ’ च आहे; हे त्यांच्या ‘ गोष्टी घराकडिल ’ या कवितेवरून दिसून येते– ” असे म्हणणे याची सांगड घालायची झाल्यास लेखकाला जी ‘ व्यस्त आशयरूपे ’ प्रत्येक लेखनांतून शोधण्याचा ‘ आजच्या काळा ’ तला हव्यास त्यावरूनच घालता येईल.

प्रत्येक काळांतील नव्या उमेदीच्या टीकाकारांना आपल्या जाणिवेत नव्याने घर करू लागलेल्या भावनांची प्रतिबिंबे पूर्वीच्या वाङ्मयात पाहाण्याची, ती आढळली नाहीत तर लादण्याची हौस असते त्याचेच हे प्रत्यंतर आहे असे वाटते.

इंग्रजीतील दोन प्रयत्नांचा उल्लेख आता करावयाचा. एक साहित्य अकादमीने प्रकाशित केलेले प्रभाकर माचवे यांचे केशवसुत हे पुस्तक व दुसरा दिलीप चित्रे यांनी ‘ क्वेस्ट ’ या त्रैमासिकांत केशवसुतांवर लिहिलेला लेख. ‘ नवा शिपाई, ’ ‘ अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न ’ ‘ मूर्तिभंजन ’ ‘ मजुरावर उपासमारीची पाळी ’ ‘ स्फूर्ति ’ ‘ कोणीकडून कोणीकडे ? ’ ‘ दुर्मुखलेला ’ ‘ सृष्टि व कवि ’ ‘ स्फुट विचार ’, ‘ तहान भूक आरंभी नव्हती तेव्हां ’ ‘ आम्ही कोण ? ’ ‘ तुतारी ’ ‘ झपूर्झा ’

'गावी गेलेल्या मित्राची खोली लागलेली पाहून' या चौदा कवितांचे शक्य तो शब्दशः व ओळी ओळींचे भाषांतर करण्याचा माचव्यानी प्रयत्न केला आहे. आधी थोडक्यात चरित्र देऊन निसर्गविषयक, प्रेमाविषयक, सामाजिक आणि भाषांतरित अशा केशवसुतांच्या कवितांची प्रस्तावनेत ओळख करून दिली आहे. त्यांनी जे नवे प्रयोग केले त्याविषयी आणि त्यांच्यासंबंधींचे टीकाकारांचे अभिप्राय याविषयीही थोडक्यांत माहिती—कवितांच्या भाषांतराच्यापूर्वी दिली आहे. भारताच्या साहित्य अकादमीतर्फे केशवसुतांना ही मानवंदना मिळाली हे मराठी वाङ्मयाच्या दृष्टीने भाग्यकारक झाले. इंग्रजीत कवितेचे भाषांतर करणे हे अवघड आहे. सिद्धहस्त अशा इतर श्रेष्ठ लेखकांनाही ते संपूर्ण समाधान देण्याजोगे वाटत नाही. अशा स्थितीत हा प्रयत्न एवढासा नीटस वठला नाही तर नवल नव्हे.

दिलीप चित्रे यांचा निबंध शैलीच्या बाबतीत व आकलनाच्या दृष्टीने सरस आहे. लेखाच्या अखेरीस त्यांनी थोड्या कवितांचे आपण इंग्रजीत भाषांतर करीत आहोत असे म्हटले आहे. ही आदरांजली आहे. म्हणजे त्यांच्या इंग्रजी भाषांतराची ही प्रस्तावना असावी असे वाटते. परंतु त्या भाषांतरित कविता मला पहायला मिळालेल्या नाहीत. त्यांच्या लेखातील 'The Hindu philosophy of Advaita is not only the basis of Keshavsut's mystical and metaphysical poems, but also of his so-called 'social consciousness' poems. This makes him incidentally, a better Hindu, than the popular image of a Hindu as one who believes in the caste-system, and worships cows. What is more significant about this Advaita philosophy of his is that it is perfectly in consonance with his Romanticism' हे विवेचन लक्षणीय आहे.

◆ ◆ ◆

## टीपः–

केशवसुत–जन्मशताब्दीच्या निमित्ताने प्रारंभापासून १९६६ पर्यंतच्या सर्व उल्लेखनीय टीकालेखांचे संकलन करावे, जे दीर्घ लेख असतील त्यातील निवडक भाग समाविष्ट करून या संकलनात घ्यावा, दृष्टीआड झालेले लेख प्रयत्नपूर्वक मिळविण्याची खटपट करावी आणि अशा लेखसंग्रहाची आदरांजलि केशवसुतांना वाहावी हा माझा उद्देश होता. या प्रयत्नाला थोडासा अवधि लागणार होता. तेवढ्यात पुण्याच्या ठोकळ प्रकाशनाने ' केशवसुत–समीक्षा-१९०६-१९५६ ' हे पुस्तक प्रकाशित केले. त्यामुळे माझ्या उद्दिष्टाला काही काळ तरी विराम पडला. कदाचित् कै० ना. म भिडे यांनी पत्रातून जी भीति व्यक्त केली होती तीच खरी ठरेल. त्यांनी २७ ऑगस्ट ६६ रोजी लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे, "आपला कवीविषयक टीका लेखांचे संकलित प्रकाशन करण्याचा विचार आहे. हेतु स्तुत्य आहे. अमलात येणे मात्र तितकेसे सोपे नाही. ' ना. म. भिडे यांच्या मनांत अशा टीकालेखांचे संकलन करण्याचे होते व त्यासाठी त्यांनी स्वतःच्या हाताने बरेच लेख तीसचाळीस वर्षांपूर्वी उतरून ठेवले होते. त्यांचे मनोगत सिद्धीस गेले

नाही, तरीही ठोकळ यांनी ‘ केशवसुत–समीक्षा ’ हे पुस्तक प्रकाशित करून त्या दिशेने चांगली कामगिरी केली आहे. परंतु या पुस्तकात नसलेले बरेच लेख मी मिळविण्याचा यत्न करीत होतो आणि जे इतरांच्या नजरेतून सुटले होते ते कोणाचे आहेत याचाही शोध घेत होतो. हा लेख प्राध्यान्येकरून या प्रयत्नाचे फलित आहे. म्हणून येथे अतिशय कृतज्ञतापूर्वक मला झालेल्या साहाय्याचा उल्लेख करीत आहे.

( १ ) कै. ना. म. भिडे व त्यांचे अमळनेर येथील बंधू गोविंद महादेव भिडे, वकील यांच्या सौजन्याने मला माधव गोविंद भिडे यांचा ‘ राष्ट्रहितैषी ’ मधील लेख व ज्ञानप्रकाशच्या रविवार पुरवणीतील २३–९–१९२३ चा लेख हे मिळाले आहेत. त्यांचा उपयोग माझ्या लेखात मी केलाच आहे. ज्ञानप्रकाशमधील लेख कोणाचा हे जाणून घेण्यासाठी सुप्रसिद्ध साहित्यिक ग. त्र्यं. माडखोलकर व त्यांनी सुचविल्याप्रमाणे प्रा. श्री. बा. रानडे यांच्याकडे चौकशी केली. परंतु लेखकाचे नांव समजले नाही. कै. ना. म. भिडे यांच्या संग्रहातून आणखी एक लेख मला मिळाला, तो माझे मित्र प्रा. रा. म. मराठे यांचा डेक्कन कॉलेज कार्टर्लीमधील होय. फेब्रुवारी १९२६ च्या षण्मासिकात तो प्रसिद्ध झाला होता.

( २ ) ‘ नवभारत ’ मासिकाचे पूर्वीचे संपादक व भांडारकर प्राच्यविद्या संशोधनमंदिरातील प्राध्यापक वि. म. बेडेकर यांनी आचार्य जावडेकर यांचा नवभारतातील लेख मला मिळवून दिला. हा लेख जुलै १९४९ च्या अंकात आला होता.

( ३ ) खामगावचे प्रसिद्ध कवि श्री. वा. ना. देशपांडे यांनी तांबे यांच्या ‘ ज्ञानांजन ’ मासिकातील लेखांकाविषयीची कल्पना दिली. हे लेखांक पुढे ‘ तांबे-व्यक्ति व कला ’ या पुस्तकांत १९३५ मध्ये समाविष्ट केलेले होते.

( ४ ) प्रा. दि. के. बेडेकर यांनी अनिलांचा ‘ फुलवात ’ हा काव्यसंग्रह मला उपलब्ध करून दिला. हा संग्रह १९३२ चा आहे.

(५) 'काव्यदोहन' 'अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक' 'काव्य आणि काव्योदय' व दोन तीन जुने दुर्मिळ कवितासंग्रह कविवर्य कुसुमाग्रज यांनी आपल्या संग्रही असलेल्या पुस्तकातून मला मुद्दाम दिले.

(६) नासिकरोड कॉलेजमधील मराठी विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. बा. वा. दातार यांनी वर्तकांचे "तुतारीचे पडसाद" हे पुस्तक मिळवून दिले.

(७) जुन्या पिढीतील कवि श्री. म. भि. कुलकर्णी यांनी ना. वा. टिळक यांची केशवसुतांच्या छोट्या कवितासंग्रहाला असलेली प्रस्तावना मला स्वतःच्या हाताने उतरून दिली.

(८) प्रा. व. दि. कुलकर्णी, पार्ले कॉलेज येथील मराठी विभागाचे प्रमुख व एक नामवंत समीक्षक यांनी माझ्या विनंतीला मान देऊन १९६६–६७ मधील केशवसुतसमीक्षा नजरेस यावी म्हणून काही लेखांची नांवे कळविली, त्यांपैकी "केशवसुत आणि मराठी कविता" (पु. शि. रेगे–प्रतिष्ठान, एप्रिल १९६७) व "सतारीचे बोल" (म. वा. धोंड–मराठी संशोधन पत्रिका, मुंबई) हे लेख आणि "केशवसुतांच्या कवितेतील छंदोलय" (ना. ग. जोशी–म. सा. पत्रिका, जुलै १९६६) हाही लेख माझ्या अवलोकनातून सुटले याबद्दल मी दिलगीर आहे.

(९) पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयातील पदाधिकारी, फर्ग्युसन महाविद्यालयातील वाचनालयाचे प्रमुख हं. प्रा. ठा. महाविद्यालयातील वाचनालयाचे व्यवस्थापक यानीही आस्थेने मला लागणारे काही साहित्य मिळवून दिले.

(१०) याखेरीज संकल्पित व आता स्थगित झालेल्या टीकालेखसंग्रहासाठी ज्यांनी ज्यांनी माझ्या पत्रद्वारे केलेल्या विनंतीला मान देऊन मला हवे असलेले लेख पाठविले किंवा पाठवू शकत नसल्याबद्दल दिलगिरी व्यक्त केली त्यांचा निर्देश करायचा झाल्यास वि. द. घाटे;

रा. अ. काळेले; वा. ल. कुलकर्णी; प्र. गो. घाटे—सरचिटणीस महाराष्ट्र साहित्य सभा, इंदूर; आणि श्री. शं. न. रहाळकर-- रतलाम यांची नांवे मला विसरता येण्यासारखी नाहीत. या सर्वांचा मी ऋणी आहे.

मी जो केशवसुतविषयक टीकालेखांचा आढावा या लेखांत घेण्याचा यत्न केला आहे त्यातून अलीकडचे काही महत्त्वाचे टीकालेख सुटले आहेत हे वर एके ठिकाणी म्हटलेच आहे. आणखीही काही सुटले असतील तर त्यांच्याकडे दुर्लक्ष झाले आहे ते जाणून बुजून नव्हे, माझ्या मर्यादित वाचनामुळेच.

♠ ♠ ♠

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १६६२४
मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
क्रमांक ६०१६७ वि: निबंध
१६६६ नों. दि: २४-५-६८
REFBK-0016624
REFBK-0016624

# केशवसुत : काही दृष्टिकोन

**कविवर्य कुसुमाग्रज यांची अत्यंत मार्मिक प्रस्तावना.**

गेल्या साठ वर्षातील केशवसुतविषयक टीकालेखनाचा आढावा घेणाऱ्या प्रदीर्घ लेखांत प्रा. देशपांडे यांनी आजपर्यंत नजरेआड झालेल्या काही जुन्या महत्त्वाच्या टीकालेखांचा प्रयत्नपूर्वक शोध घेऊन वाचकांना त्यांची माहिती करून दिली आहे. केशवसुतांच्या अभ्यासाला हे पुस्तक पूरकच नव्हे तर "आवश्यक" आहे, असे प्रस्तावनेच्या अखेरीस कुसुमाग्रज म्हणतात. त्याचे हे जसे कारण आहे त्याचप्रमाणे लेखकाने केश सुतांच्या कविता अभ्यासकांना समकालीन कवींच्या कवितांची दिलेली उदाहरणे व "नवा शिपाई" किंवा "रूढि, सृष्टि आणि कलि" या कवितांचा प्रथमच उलगडून दाखवलेली सामाजिक संदर्भ हेही महत्त्वाचे कारण होय. साहित्य-क्षेत्रातील मौलिक कामगिरी हाती घेण्याच्या प्रा. देशपांडे यांच्या मनोवृत्तीचे आणखी एक महत्त्वाचे प्रत्यंतर.

**महाराष्ट्र ग्रंथभांडार,**
महाद्वार रस्ता, कोल्हापूर – २.